
# शब्द रुची

४६

ऑगस्ट २०२१
मूल्य १० रुपये
पृष्ठे ६८

पत्र नव्हे, स्मार्ट मित्राची साठी...



# ग्रंथाली पुस्तकप्रकाशन



ज्योती दाते




ज्योती दाते लिखित 'लाजवाब' पुस्तकप्रकाशनसमयी धनश्री धारप, डॉ. मृण्मयी भजक, दीपाली सोमैया-दाते, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल, ज्योती दाते, अभिनेते सचिन पिळगावकर, समीर दाते, धनंजय गांगल आणि सुदेश हिंगलासपूरकर



अ.पां. देशपांडे



अ.पां. देशपांडे संपादित 'गणिती अध्यापक आणि प्रसारक' पुस्तकप्रकाशनसमयी अ.पां.देशपांडे, खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर, डॉ. मंगला नारळीकर, माजी राज्यपाल उत्तरप्रदेश राम नाईक, प्रा. म.रा. राईलकर, सुदेश हिंगलासपूरकर, धनंजय गांगल आणि भागवान जोशी



प्राजक्ता माळी



प्राजक्ता माळी लिखित 'प्राजक्तप्रभा' कवितासंग्रह प्रकाशनसमयी सूत्रधार सानिका कुलकर्णी, धनश्री धारप, जयंत दुवेदी, गीता दुवेदी, पुष्कर श्रोत्री, प्राजक्ता माळी, अभिजित पानसे, अक्षय बर्दापूरकर, प्रवीण दवणे, धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपूरकर, विजू माने, विठ्ठल गिरे आणि प्राजक्ताचे आईबाबा

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्द रुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

**ऑगस्ट २०२१, वर्ष नववे**
**अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
सहसंपादक : **धनंजय गांगल**
मुखपृष्ठ : **दत्तात्रय पाडेकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, सहकारी – सुमेधा कुवळेकर**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवार पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४६

## अनुक्रम

नवे रूप आहे कालानुरूप; तरीही.... / ६
**दिनकर गांगल**

मटाचे 'ते' स्वरूप आता राहिले नाही / **११**
**प्रताप आसबे**

क्लास मित्र, स्मार्ट मित्र आणि मास मित्र / **१५**
**संजीव साबडे**

ऑनलाइनच्या जगात वृत्तपत्रांना बदलावे लागेल / २०
**अशोक पानवलकर**

म.टा.ने दिले अगणित धन्यतेचे क्षण / २४
**नीला उपाध्ये**

...ते सोनेरी दिवस / २८
**दत्तात्रय पाडेकर**

महाराष्ट्र टाइम्सच्या आठवणी / **३१**
**अभिजित हेगशेट्ये**

**मान्यवरांच्या प्रतिक्रिया / ३४**
**शब्दांकन : मनीषा नित्सुरे-जोशी**

स्मरणरंजनातली काही पाने! / ४०
**सुरेश भटेवरा**

मनोरंजनाच्या दुनियेत 'श्रावण क्वीन'चं महत्त्व / **४३**
**अपर्णा पाटील**

'मटा'ने गोव्यात वाचकांची पिढी घडवली / **४७**
**संजय ना. ढवळीकर**

निसर्ग आणि पुस्तकांच्या सहवासात रमणारा अवलिया / **५१**
**विनोद पवार**

आमचे वृत्तपत्र / **५४**
**प्रभाकर भिडे**

...आणि माझ्या शैलीवर शिक्कामोर्तब झाले! / **५६**
**मारुती शेळके**

**पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ५९**

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ६३**

जगात वृत्तपत्रांची सुरुवात  सतराव्या शतकाच्या पहिल्या दशकात झाल्याची नोंद आहे. भारतात साधारण १७८० च्या The Bengal Gazette (Hicky's Gazette) पासून वृत्तपत्राचा मोठा आणि वैभवशाली इतिहास आहे.

या प्रचंड लोकसंख्येच्या लोकशाहीत, होणाऱ्या विकासात, जास्तीत जास्त वाटा आपल्याला मिळावा आणि कमीत कमी कर्तव्ये करायला लागावीत यासाठी प्रत्येक जण कार्यरत असतो. मग कधी जात तर कधी धर्म, कधी भाषा तर कधी प्रदेश, अशा वेगवेगळ्या अस्मितेच्या आधारावर एकत्र येत तो दबावगट बनवून 'फायदे आपल्याला आणि तोटे दुसऱ्याला' हे ईप्सित साध्य करण्याच्या प्रयत्नात असतो. जवळपास तेच राजकारणात प्रतिबिंबित होत असते. लोकसभेच्या डोक्यावर राज्यसभा आणि विधानसभेच्या डोक्यावर विधानपरिषद यांचे प्रयोजन यासाठीच की राजसत्तेवर सद्सद'विवेकाचा' अंकुश असलाच पाहिजे. 'A tyranny of the unelected' अशी हेटाळणी झाली तरी जवळपास तीच महत्त्वाची भूमिका न्यायालयांची आणि माध्यमांची आहे. माध्यमांनी माहिती देणे, मार्गदर्शन करणे आणि सरकार व समाजाला समस्यांची जाणीव करून देणे आणि त्याहूनही मोठी जबाबदारी घटनेत समाविष्ट केलेली कर्तव्ये आणि अधिकारांबद्दल भान जागृत करणे.

डिसेंबर १७, २०१०, देश ट्युनिशिया. 'हप्ता' द्यायला नकार दिला म्हणून मोहम्मद बोझीझी ह्या भाजीविक्रेत्याला पोलिसांनी मारहाण केली. परिस्थितीपुढे हताश होऊन मोहम्मदने सरळ स्वतःला पेटवून दिले. त्यातच त्याचा अंत झाला. ही घटना इंटरनेटवरून अशा वेगाने आणि ताकदीने पसरली की जनतेत आधीच खदखदत असलेल्या असंतोषाचा भडका उडण्यास कारणीभूत ठरली. याचा शेवट हुकूमशहा बेन अलीच्या परगंदा होण्यात झाला. यातून इजिप्तच्या निदर्शकांना स्फूर्ती मिळाली, ज्याचे रूपांतर अध्यक्ष मुबारक यांच्या गच्छंतीत झाले. हे लोण उर्वरित अरब देशांच्यात पसरले, ज्यालाच 'अरब स्प्रिंग' म्हणतात. इंटरनेटचे हे आजचे सामर्थ्य! १९१७ च्या बोल्शेविक क्रान्तीनंतर लेनिन म्हणाला होता की वृत्तपत्र, पोस्ट आणि  टेलिग्राफ याशिवाय साम्यवाद आणि क्रांती हे फक्त शब्दकोशातील शब्दच राहिले असते! गेल्या तीन दशकांत ती जागा टप्प्याटप्प्याने इंटरनेटने घेतली आहे.

'Technology gives a false sense of security' हा विश्वास आपल्याला गेली काही दशके होता त्याला पोस्ट-कोविड युगात तडा गेला आहे. विचारवंत आल्विन टोफलेर याने ७०-८० च्या दशकात 'थर्ड वेव्ह' आणि 'फ्युचर शॉक' या दोन पुस्तकांतून मानवी इतिहासाची तीन युगांत विभागणी केली. १७व्या शतकापर्यंत 'कृषी'युग, १८ ते २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत 'औद्योगिक'युग आणि त्यानंतर 'माहिती'युग. आल्विन आज असता तर त्याने येणाऱ्या युगाला 'विषाणू'युग म्हणून संबोधले असते. आजचे जागतिक मानवी व्यवहार हे आंतर्देशीय वस्तू, सेवांचे आदान-प्रदान आणि  इंटरनेटवरील लक्षावधी संगणकप्रणालींत एवढे गुंतलेले आहेत, की एक विषाणू मग तो जैविक असो की अजैविक, काही मिनिटांत-तासांत-दिवसांत या सर्व सामाजिक व्यवस्थेला छेद देऊन त्याचा डोलारा कोसळवू शकतो. मनुष्यजातीची आपण श्रेष्ठ असल्याची मग्रुरी पार धुळीत मिळवू शकतो. कोरोना व्हायरसने हे सिद्ध केले.

ओरॅकलचा मुखिया लॅरी एलिसन याने तर ''तुम्ही एक-तर इंटरनेटवर असाल नाहीतर जगाच्या दृष्टीने अस्तित्वातच नसाल'' अशी एलिटिस्ट मांडणी केली होती. पण एकूणच इंटरनेटच्या सामाजिक-सांस्कृतिक परिणामांबद्दल एक भाकीत असे होते की देश-धर्म,

जाती-भाषा हे भेद नष्ट होऊन जग हे एक ग्लोबल व्हिलेज बनेल! पण प्रत्यक्षात आपण काय बघतो तर देश, धर्म, जाती, भाषा यांच्या सीमारेषा अधिकच गडद झाल्या. या इंटरनेटयुगात तंत्रज्ञान आणि माहिती एवढ्या प्रचंड वेगाने आपल्यावर कोसळत आहे की या महापुरात समाजात आसपास, उर्वरित जगात काय घडतेय याबद्दलच कुतूहलच नष्ट झालेय का? समाजाच्या जिज्ञासूवृत्तीला थकवा आलाय, क्लांत अवस्था आली आहे का?

त्यामुळे वृत्तपत्राचे वाहक माध्यम, कागदावरून डिजिटल झाले तरी, त्याचा प्रभाव दिसत नाही. वर्तमानातील वैचारिक पोकळी ही, भविष्याचा वेध घेण्यापेक्षा गतकातरतेत, काल्पनिक भव्य इतिहासात मन रमवण्यास भाग पाडते. Instead of visioning the future, We are busy reconstructing the past to make India great again through redemptive fantasies of past purity.


अशा वर्तमानातील वैचारिक पोकळीत बौद्धिक नेतृत्व देण्याची अपेक्षा ज्या माध्यमांकडून असू शकते त्या 'तलवारीपेक्षा शक्तिशाली' असलेल्या लेखणीतील शाई फिकी पडत चालली आहे. टीव्ही न्यूज वाहिन्यांना मनोरंजनवाहिन्यांबरोबरच्या स्पर्धेत टिकून राहायचे मोठे आव्हान असते त्यामुळे त्यांच्यावर मर्यादा येतात.

''Tomorrow Never Dies'' या बॉण्डपटातील ''बातम्यांसाठी'' दोन देशांत युद्ध घडवण्याचे मनसुबे रचणारा माध्यमसम्राट कार्व्हर १९९७ सालातला. ''Who Killed the Newsaper'' हा खळबळ माजवणारा 'दि इकॉनॉमिस्ट'मधला लेख ऑगस्ट २००६ सालातला. ज्यात इंटरनेट हे वृत्तपत्रांना पूरक आहे अशीही काहीशी आशावादी मांडणी केली गेली होती. ''अमेरिकेत प्रिंट वर्तमानपत्रांना फक्त पाच वर्षे शिल्लक आहेत.'' हे वादग्रस्त विधान, Center for the Digital Future चे जेफरी कोल यांचे, २०१३ सालातले. भारताच्या संदर्भात 'The media is willing to crawl when nobody is even asking it to bend' आडवाणींच्या आणीबाणीसंदर्भातील एका निरीक्षणाचा संदर्भ देणारी 'इंडियन एक्स्प्रेस'च्या शेखर गुप्तांची ही मुलाखत डिसेंबर २०१४ मधली. 'Decline_of_newspapers' नावाने एक पान विकिपीडियावर सतत अपडेट होणारे, २०१९ सालातले आणि त्याही पलीकडे व्यवसायसमूहाचे हितसंबंध जपण्यासाठी वर्तमानपत्र हे एक साधन म्हणून बघण्याचा दृष्टिकोन. या सगळ्या पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र टाइम्स'ला ६० वर्षे पूर्ण होत आहेत ही घटना विचार करायला लावणारी. कालानुरूप बदलत स्मार्ट होणारे हे वृत्तपत्र भविष्यवेध काय ठेवते, हे जाणणे कुतूहलाचे आहे. त्यासाठी हा विशेषांक.

या अंकाबाबत, मटाशी पत्रकार म्हणून आणि वाचक म्हणून संबंधित अनेकांशी बोलणे झाले. त्यांनी लिहावे अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यास कुमार केतकर यांनी स्पष्ट नकार दिला. भारतकुमार राऊत प्रकृती ठीक नसल्याने, गिरीश कुबेर कार्यव्यग्रतेमुळे लिहू शकले नाहीत. एका वर्तमानपत्राची साठी आज महत्त्वाची घटना झाली आहे, ती बदलत्या माध्यमांमुळे. तेच जाणायचे होते. अंकात काही मान्यवरांच्या प्रतिक्रियांचे शब्दांकन मनीषा नित्सुरे-जोशी यांनी केले, तर अपर्णा पाटील यांनी काही संपर्क-संदर्भ देत लेखही लिहिला. त्यांचे आभार.

ग्रंथालीचे डिजिटल कार्यक्रम आणि प्रकाशने चर्चेत आहेत. ते granthali.com या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. ग्रंथालीची वाटचाल त्यात दिसते आणि तुम्ही ग्रंथालीच्या संपर्कात राहू शकता.

**– धनंजय गांगल**
भ्रमणध्वनी : +९१ ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com



# नवे रूप आहे कालानुरूप; तरीही....

**दिनकर गांगल**

**मी** 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये १९६७ ते १९८९ अशी बावीस वर्षे नोकरी केली. मी त्यांपैकी बहुतेक काळ रविवारचा अंक व अन्य पुरवण्या यांचे काम पाहिले. पुरवण्या ही 'महाराष्ट्र टाइम्स' या वर्तमानपत्राची एक खासीयत होती. किंबहुना त्या दैनिकाचा प्रत्येक अंक हादेखील पुरवणीसारखा ललित साहित्याने भरलेला आहे असे भासे. म्हणजे त्यात बातम्या वगैरेसारखा रोकड मजकूर नव्हता असे नाही. त्या असतच - अगदी राजकारणापासून बाजारापर्यंतच्या बातम्या असत. परंतु त्यांचे सादरीकरण बाळबोध नसे; व्यक्ती-घटनांवरील प्रासंगिक फीचर्सदेखील ललितरम्य असत. त्यामुळे वर्तमानपत्र अभिरुचीपूर्ण वाटे. त्याची एकूण छाप सामाजिक-सांस्कृतिक जीवनाची असे; राजकीय नसे. त्या काळाचे राजकारणदेखील सुसंस्कृत होते- यशवंतराव चव्हाण, श्री.अ. डांगे, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, यशवंतराव मोहिते असे स्वातंत्र्यचळवळीतील, विविध विचारधारांमधून तयार झालेले पठ्ठे त्या क्षेत्रात होते. त्यांचे राजकारण स्थानिक राज्यापुरते मर्यादित असले तरी संदर्भ राष्ट्रीय व उत्तम समाजजीवनाचा असे. आचार्य अत्रे, ठाकरे पितापुत्र (प्रबोधनकार व बाळ) असे प्रादेशिक विचार व महत्त्वाकांक्षा असलेले नेते त्यांमध्ये होते, तरी त्यांचा बाणा, त्यांची मूस राष्ट्रीय वृत्तीची होती. त्यामुळे 'टाइम्स ऑफ इंडिया' या राष्ट्रीय प्रतिनिधित्व असलेल्या वर्तमानपत्राचे भावंड म्हणून महाराष्ट्र टाइम्स' मराठी भाषेत जन्माला आला तेव्हा स्वाभाविकच, त्याचे नाव तसेच प्रादेशिक कांक्षा असलेले परंतु राष्ट्रीय (व आंतरराष्ट्रीयही) दृष्टीचे ठरले, 'महाराष्ट्र टाइम्स'. मात्र संकल्पनेतील तो भारदस्तपणा वाचकांपर्यंत सहज पोचला नाही. त्या 'टायटल'ची धेडगुजरी म्हणून बरीच चेष्टा आरंभी झाली. नावामध्ये 'टाइम्स' ही 'महाराष्ट्र'ला जोडून इंग्रजी शब्दाची पुरवणी कशासाठी अशीही विचारणा झाली, परंतु 'मटा'चे संस्थापक संपादक द्वा.भ. कर्णिक, त्यांचे पाठीराखे यशवंतराव चव्हाण व पुरस्कर्ते 'टाइम्स'चे जैन हे त्या नावाबाबत ठाम होते.

**वर्तमानपत्र हा समाजमनाचा आरसा असतो असे म्हणतात. 'मटा'ने मराठी समाजाचे वास्तव तरीही प्रगतिशील असे दर्शन १९६२ ते २००० या काळात घडवले. त्यानंतरचा काळ मात्र टेक्नॉलॉजीच्या प्रभावाखाली वेगळ्याच, नव्या जीवनमूल्यांना घेऊन आला.**

कर्णिक यांची पत्रकारिता दिल्लीत घडलेली होती. ते रॉयवादी होते. गोविंद तळवलकर त्यांच्या जागी संपादक म्हणून पाच वर्षांतच आले. त्यांचाही कल रॉयवादाकडे होता. तळवलकर 'मटा'त येण्याआधी 'लोकसत्ते'त काम करत होते. त्याचे संपादक ह.रा. महाजनी हेदेखील रॉयवादी. महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनावर त्या काळी रॉयवादाची छाप होती. द्वा.भं.चे बंधू व.भ. कर्णिक हे तर अट्टल रॉयविचारांचे होते. ते 'टाइम्स ऑफ इंडिया'चे पर्सोनेल मॅनेजर (सध्या त्या पदाला एचआर हेड म्हणतात) म्हणून उच्चपदी नेमणुकांच्या/नोकरभरतीच्या वर्तुळात प्रभावशाली होते. 'महाराष्ट्र टाइम्स'ला स्थापनेपासून असा वैचारिकतेचा वारसा लाभला.

मटा'ची रविवार पुरवणी ही त्या वर्तमानपत्राची ताकद तर पहिल्या अंकापासूनच ठरली गेली. ना.सी. फडके, पु.भा. भावे यांच्यासारख्या ज्येष्ठ-श्रेष्ठ साहित्यकारांच्या कथा रविवार पुरवणीच्या पहिल्या अंकांमधून आलेल्या आठवतात. ती नावे वर्तमानपत्रांत म्हणजे ते वर्तमानपत्र किती थोर अशी भावना वाचकांची झाली! मी त्यावेळी 'केसरी'त काम करत होतो व कॉलेजात शिकण्याचा प्रयत्न करत होतो. अरुण साधू एमएस्सी करण्यासाठी म्हणून पुण्यात आला. तोही विद्यार्थी म्हणून 'केसरी'च्या संपादकीय विभागात काम करू लागला. सुधाकर अनवलीकर व मी, आमचे पत्रकारितेचे शिक्षण 'सकाळ' विद्यापीठात ना.भि. परुळेकर, मो.स. साठे व ज.पां. देशमुख या पत्रकारितेतील अध्वर्यूंच्या हाताखाली

झाले होते. अनवलीकर आमच्यात सीनियर. त्याचे शिक्षण लवकर पूर्ण झाले व त्याला 'मटा'च्या पहिल्या दिवसापासून तेथे काम करण्याची संधी मिळाली. त्याच्या अंगी पत्रकाराला लागणारे बेधडकपणा, नि:संकोचपणा असे गुण होते. परंतु त्याची श्रेष्ठता उत्कृष्ट कथनशैलीत होती; ते कथन लेखी असो वा संवादात्मक. समोरच्या माणसाच्या व्यक्तित्वात सहज विरघळून जाण्याचा गुण पत्रकाराला आवश्यक असतो. अनवलीकर याला ती किमया सहज साधे. मटा ज्या वाचकविश्वाचे प्रतिनिधित्व करू पाहत होता ते पुण्यात प्रभावी स्वरूपात अस्तित्वात होते. तेथे मोठा सुशिक्षित व सुसंस्कृत वाचकवर्ग होता. परंतु पुणे विद्यापीठातदेखील छोटेमोठे राजकारण असे. तेथे विद्वत्तेचा परंपरागत तथाकथित सात्त्विक प्रभाव आणि राज्याच्या लोकशाही राजकारणातून आलेले तथाकथित दूषित प्रभाव यांचा संघर्ष असे. 'मटा'ने सर्वसामान्य वाचकाच्या मनातील ते द्वंद्व अचूक टिपले होते आणि अनवलीकर पुण्याहून त्यास योग्य असे इंधन पुरवत होता. त्यामध्ये पुणे विद्यापीठ, दत्तो वामन पोतदार, श्री.के. क्षीरसागर वगैरे साहित्य-संस्कृती विश्वातील महनीय व्यक्तींच्या नवनवीन हालचाली अशा अनेक गोष्टी असत. 'मटा'ची 'इमेज' महाराष्ट्रभर पसरली ती पुण्यामधून.

'मटा'च्या 'कोअर ग्रूप'मध्ये त्यावेळी द्वा.भ. कर्णिक हे संपादक, माधव गडकरी (न्यूज डेस्क) आणि शंकर सारडा (रविवार पुरवणी) हे तिघे होते. त्या तिघांनी 'मटा'ला त्याचे स्वरूप व आकार दिला. वर्तमानपत्राच्या रूढ साच्यापेक्षा वेगळे असे ते 'मटा'चे रूप होते. त्यात आधुनिकता होती. कर्णिक यांनी त्यांच्या व्हिजननुसार अंकाचे एकूण रूप कल्पिले. माधव गडकरी यांनी भारताचे लोकशाही राजकारण विकेंद्रित होत चालले आहे व त्यामुळे महाराष्ट्र राज्य हे व त्यातील अंतर्गत (मुख्यत: जिल्हा पातळीवरील) घडामोडी या महत्त्वाच्या ठरणार आहेत हे हेरले आणि 'न्यूज व फीचर्स' यांचा रोख त्या दिशेने ठेवला. शंकर सारडा यांनी मुख्यत: रविवार पुरवणीचे स्वरूप ललित, साहित्यप्रभावी राहील याकडे ध्यान दिले. त्या त्रिकूटापेक्षा फटकून असलेला दुसरा गट 'मटा'च्या संपादकीय विभागात होता, तो गोखले-तळवलकर यांचा. दि.वि. गोखले यांच्याकडे संघटनात्मक रचनेचे कौशल्य विलक्षण होते. त्यांनी तशी जबरदस्त पकड 'मटा'च्या संघटनेवर बसवली होती. ते संघशिस्तीत वाढले होते तरी झक्क दिलखुलास होते; त्यांची कार्यशैली मनमोकळ्या गप्पागोष्टी करत सर्व हालचाली स्वाधीन करून घेण्याची होती. कर्णिक-गडकरी-सारडा हे त्रिकूट विरुद्ध गोखले-तळवलकर ही द्वयी यांची कामापलीकडे आपसात बोलाचालीदेखील नसे. कर्णिक निवृत्त होण्याआधीची एकदोन वर्षे 'मटा'त अतिशय तणावग्रस्त होती.

मला व्यक्तिश: 'मटा'त आणले गोखले व तळवलकर यांनी, १९६७ साली. मी पहिल्या दिवशी 'रिपोर्ट' करण्यासाठी म्हणून संपादक कर्णिक यांच्या केबिनमध्ये गेलो; तर त्यांनी पहिल्या भेटीत मला काय विचारावे? 'तुम्ही त्या अर्ध्या चड्डीवाल्यांच्या गटातले आहात की आमच्या?' पण त्यांनी मला तेथल्या तेथे एक लेख करण्यास सांगितले. 'नवाकाळ'ने त्यावेळी छपाईचे रोटरी मशीन घेतले होते. त्यावर अनेकपानी अंकाच्या हजारो प्रती तासाला छापल्या जात. ती झेप खासगी, व्यक्तिगत वर्तमानपत्र-उद्योगासाठी मोठी होती. त्याचे कौतुक करणारा खाडिलकर कुटुंबाच्या कर्तबगारीचा लेख हे माझे 'मटा'तील पहिले लेखन होते. ते करण्यासाठी सुचवण्यात कर्णिक यांचे उमदेपण दिसते. ते प्रतिस्पर्धी पेपर म्हणून अन्यांना टाळत नव्हते, उलट पत्रकारांची भ्रातृभावना जाणत होते. तळवलकर संपादक झाल्यावर त्यातील भावना हा शब्दच लोपला. तळवलकर तितके कर्मकठोर होते. पण 'मटा'तील ते स्थित्यंतर सहज निभावून गेले, कारण 'मटा'त जो संपादकीय वर्ग भरती झाला होता तो वेगवेगळ्या शहरांतून निवडून आणला गेला होता. ठिकठिकाणचे 'क्रीम' मटात एकवटले आहे असे त्यावेळी बोलले जाई व ते खरेच होते. पुढे, 'मटा'तील एक पत्रकार विश्वनाथ देवधर यांच्या मृत्यूनंतर शोकसभेत ज्येष्ठ पत्रकार अरविंद कुलकर्णी याने ती गोष्ट अचूक शब्दांत मांडली. तो म्हणाला, की तळवलकर यांच्या यशाचे गुणगान सर्वत्र होते, पण त्यांचे यश हे त्यांच्या बत्तीस शिलेदारांत (संपादकीय वर्ग) होते. ते सर्व सक्षम, शोधक बुद्धीचे, शैलीदार पत्रकार होते. शिवाजीराजांचा पराक्रम त्यांच्या वेगवेगळ्या सरदारांमुळे खुलून उठतो, त्याप्रमाणे मटा'च्या संपादकीय वर्गाच्या कुशल कामगिरीमुळे तळवलकरांचा बहुमान साजरा होतो.

शंकर सारडा याने रविवार पुरवणीला तर अनन्य असे साहित्यिक, सांस्कृतिक रूप दिले होते. त्यामुळे साप्ताहिकांचा जमाना संपला असेही म्हणता येईल. त्या वेळपर्यंत 'आलमगीर', 'धनुर्धारी'पासून 'नवयुग'पर्यंत अनेक साप्ताहिकांचा मराठी वाचकांवर पगडा होता. 'रविवारचा पेपर आला की तो चहा पीत निवांत वाचायचा' ही वर्तमानपत्राची जी इमेज निर्माण झाली त्यामध्ये सारडा याची कर्तबगारी फार मोठी आहे. तो पुरवणीची चार-सहा पाने भरगच्च वाचनाची द्यायचा. त्यात मातब्बर लेखकांचे लेख व तशीच समीक्षाही असायची. सारडाही चोखंदळ वाचक-लेखक व रसिक होता. त्याचे तसे शिक्षण झाले होते व उपक्रमशीलता तर त्याच्याकडे उदंड होती. त्याने त्यावेळी जाहीर केलेली लग्नानंतरचे 'पहिले वर्ष' ही लेखनस्पर्धा व तिला मिळालेला उत्कट प्रतिसाद अजून अंगावर रोमांच उभा करतात. तो बासष्ट-पासष्टचा काळ आठवा. मध्यमवर्गाचे कुचंबलेले दांपत्यजीवन मोकळे होऊ पाहत होते. तशात जाहीर झालेली, म्हटले तर अगदी व्यक्तिगत अनुभवकथनाची जाहीर स्पर्धा. फार मौज आली होती. 'मटा' असा सुशिक्षित समाजजीवनाला भिडत गेला. सारडा याने प्रकाशकांच्या सहकार्याने सवलतीच्या दरातील पुस्तकविक्री योजना जाहीर केली. त्यासाठी शंभर उत्कृष्ट पुस्तके निवडली. तो खटाटोप नावीन्यपूर्ण व तत्कालाला भिडणारा ठरला. सारडा उत्तम ग्रंथसमीक्षा करत असे आणि इतरांना लिहिण्यास प्रवृत्त करत असे. मान्यताप्राप्त समीक्षक म्हणून मराठी साहित्यात कुळकर्ण्यांची जागा पाटलांनी नंतरच्या काळात घेतली, तरी त्याची झलक सारडाने पाटलांना 'मटा'त

लिहिते केले, त्यात आढळून येईल. साहित्यवर्तुळात तेंडुलकर-खानोलकर असे लेखक नव्याने येत होते. म्हणजे एका बाजूला फडके-गाडगीळ-भावे-माडगूळकर-जीए यांना जपायचे आणि दुसऱ्या बाजूला तेंडुलकर-खानोलकर यांचे बीजांकुर जाणायचे ही अफाट दृष्टी सारडाच संवर्धित करू जाणे. सारडाने खानोलकरांच्या एका पुस्तकाची तुलना शेक्सपीयरच्या शोकांतिकेशी केलेली आठवते. ते हेडिंगसुद्धा चांगले अठ्ठेचाळीस पॉइंटच्या टायपात दिलेले होते. ते धाडस 'मटा'च्या प्रतिमेतून वाचकांच्या मनात सहज उतरले गेले!

मी 'मटा'त आलो, वर्ष-दीड वर्षं वेगवेगळ्या विभागांत कामे केली आणि मग पुरवणी विभागात सामील झालो. विभाग म्हणजे आम्ही दोघेच - मी व भालचंद्र वैद्य. मा.पं. शिखरे हे डौलदार लेखनशैली असलेले सहसंपादक होते; त्यांच्याकडे तांत्रिक दृष्ट्या रविवारचा विभाग असे. परंतु ते त्यात फार लक्ष घालत नसत. तेही काही वर्षांत निवृत्त झाले. मग तळवलकर आणि मी व वैद्य असा रविवार विभाग झाला. तळवलकर त्यांचे अग्रलेख व 'साप्ताहिक वाचस्पती'सारखे लेखन यांपलीकडे वर्तमानपत्राच्या कामात फार लक्ष घालत नसत. बहुसंख्य लेखक व लेखनेच्छू आमच्याशीच बोलत, गप्पा मारत, नवे विषय सुचवत. रविवार पुरवणीचे स्वरूपही ठरून गेलेले होते. त्यामुळे त्या चौकटीत मी व वैद्य नवनवीन कल्पना राबवायचो. तळवलकर दर शनिवारी दुपारी पुण्याला जायचे व सोमवारी सकाळी परत यायचे. त्यांच्या तेथे पुल, कालेलकर, व्यंकटेश माडगूळकर, वि.म. दांडेकर अशा मैफिली असायच्या. त्यातील गप्पांत ते आठवडाभर रमलेले असायचे. त्यातून काही लेख योजून ते यायचे. पुल तशाच त्यांच्या स्नेहातून 'मटा'मध्ये अधूनमधून व नंतर खूप लिहू लागले. त्यांची वंगचित्रे ही पूर्ण मालिकाच 'मटा'त कित्येक आठवडे प्रसिद्ध झाली. ती इतकी लांबली, की एका वाचकाने पत्र लिहिले, 'वंगाळ चित्रे' आता बंद करा. त्या कोऱ्या जागेत आमची पोरे गणिते सोडवतील!

'मटा' सुरू झाला तेव्हा महाराष्ट्रात वायय प्रभावाचे वातावरण होते, ते 'मटा'त, विशेषत: रविवार पुरवणीत यथार्थ व्यक्त होत गेले. मात्र १९६८-७० सालानंतर परिस्थिती बदलली, स्थानिक प्रभाव वाढले. कामगार, दलित प्रश्न, बेकारी, स्त्रीमुक्ती असे विषय पुढे येऊ लागले. लोकांमध्ये हक्कांची जाणीव तीव्र होत होती. वातावरणात क्षुब्धता असे. राजेश खन्नाची रोमँटिक प्रतिमा मागे पडली आणि अमिताभ बच्चनचे बंडखोर सिनेमे लोकांना भिडले. स्वाभाविकच ते प्रतिबिंब 'मटा'च्या पुरवण्यांत पडू लागले. पुरवणी विभागाने कात टाकली आणि तसे सामाजिक महत्त्वाचे विषय पुढे आले. मला आठवते, मी एक मोठे पानभर फीचर 'जळो जिणे बेकारवाणे' अशा तऱ्हेचे योजले होते. एका बेकार तरुणानेच ते अनेक तरुणांचे इंटरव्ह्यू घेऊन लिहिले होते. असे अनेक समाजस्पर्शी विषय. 'रस्ता तेथे एसटी' या घोषवाक्याची साऱ्या महाराष्ट्रातून डेटा जमवून चिरफाड केली होती. मराठी नाटक-चित्रपट यांतही नवी लाट आली होती. 'मटा'मधून त्यांचा जोरदार पुरस्कार होई. दुष्काळ पडला, की पत्रकारांचे दौरे होत. मटा'च्या रविवार पुरवणीत आम्ही लेखकांना दुष्काळ दौऱ्यावर पाठवण्यास सुरुवात केली. अमोल पालेकर, नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे, लक्ष्मण लोंढे, नंदू रेगे अशी अनेक लेखक-कलावंत मंडळी रविवार पुरवणीच्या टेबलाभोवती जमत. एके दिवशी तर अर्थतज्ज्ञ वि.म. दांडेकर यांच्यापासून सौंदर्यप्रसाधन लेखिका सिंधू डोक्रस यांच्यापर्यंत पाच-दहा मंडळी एकापाठोपाठ एक माझ्या टेबलासमोर लेखासंबंधी गप्पा मारण्यास आलेली आठवतात. त्यामुळे 'मटा'चा 'संडे डेस्क' म्हणजे 'नुक्कड' असे आमच्या ऑफिसात बोलले जाई.

महाराष्ट्रात टेलिव्हिजन १९७२ साली आला. त्यानंतर दोनएक वर्षांत रविवार आवृत्तीच्या 'मास्टहेड'मध्ये साहित्य-कला यांच्याबरोबर मनोरंजन आले! बघता बघता, टेलिव्हिजनची (दूरदर्शन) व्याप्ती वाढली. एकूणच सामाजिक ढवळाढवळ फार वाढली होती. तेव्हा त्या सामाजिक प्रभावाची दखल घेण्यास रविवार आवृत्तीची चार-सहा पाने पुरी पडेनात. तेव्हा एका संपादकीय बैठकीत शुक्रवारी मनोरंजन पुरवणी सुरू करण्याचे ठरवले. त्यावेळी फक्त सरकारी दूरदर्शनच होते, परंतु त्या न्यूज रीडरनादेखील समाजात भाव मिळू लागला होता. चमकोगिरी वाढू लागली होती. दूरदर्शनवर आरंभीच्या काळात मातब्बर, नामांकित निर्माते होते. त्यांच्याकडून विविध कार्यक्रम निर्माण केले जात. त्यांच्या हकिगती आणि परीक्षणे, त्यामागील कुजबुज, निर्माते-निवेदकांचे परिचय असे साहित्य मनोरंजन पुरवणीत येई. ते 'मटा'चे मोठे आकर्षण ठरले. मंगला खाडिलकर तशाच प्रकारे 'महाभारत' मालिकेच्या निमित्ताने लिहित्या झाल्या.

तरी काही जणांना वाटू लागले, की 'मटा'ची प्रतिमा जी वैचारिकतेची आहे तिला मनोरंजन पुरवणीने बाधा येते, म्हणून मग बुधवारी विज्ञान पुरवणी सुरू केली. 'बुद्धिवंतांचा बुधवार' अशी तिची जाहिरात होई. या वाढत्या कामाचा निपटारा करण्यासाठी आम्हा दोघांच्या जोडीला श्रीराम शिधये आला. त्याला विज्ञान विषयातही आस्था होती. विज्ञान पुरवणी सुरू केली तेव्हा मी अणुशक्ती केंद्रातील काही वैज्ञानिकांनी लेखनास प्रवृत्त व्हावे म्हणून दादर स्टेशनबाहेर वाशीकर यांच्याकडे अनौपचारिक बैठक घेतली होती. तिला बाळ फोंडके व अन्य दहाबारा जण आले होते. त्यानंतर फोंडके यांचा 'मटा'त पहिला लेख आला. पुढे त्यांनी 'करिअर' बदलली, त्यांनी 'सायन्स टुडे'चे संपादक, 'मटा'त सहसंपादक अशा मोठमोठ्या जबाबदाऱ्या दिल्लीपर्यंतच्या निभावल्या. ते मराठीतील ख्यातनाम विज्ञान कथालेखक आहेत. सुबोध जावडेकर, लक्ष्मण लोंढे वगैरे विज्ञानलेखक 'मटा'च्या विज्ञान पुरवणीत आस्थेने लिहीत असत.

तळवलकर यांचे परखड लेखन, दि.वि. गोखले यांचे युद्धविषयक लेखन, अशोक जैनची दिल्लीतील वार्तापत्रे आणि वि.वि. करमरकर यांचे क्रीडाविषयक लेखन हे 'मटा'चे कायम आकर्षणबिंदू राहिलेले आहेत. पुढे कुमार केतकरने मराठीत

विचारप्रगल्भ व ललित लेखनाची छाप 'मटा'तूनच वाचकवर्गावर टाकली. परंतु तोपर्यंत जमाना झपाट्याने बदलत चालला होता. 'मटा'च्या संपादकीय वर्गातील प्रत्येकाचे काही वैशिष्ट्य असे. तो त्याच्या विशेष विषयांबाबत अभ्यासपूर्ण व रसाळ लेखन करत असे. बाहेरच्या लेखकांना व लेखनेच्छूंना वेगवेगळ्या विषयांवर लिहिते करण्याची सवय 'मटा'च्या पुरवण्यांकडून नेहमी सांभाळली गेली. त्यामुळे लेखनात व प्रत्येक वेळच्या पुरवणीत विविधता असे. पुढे अरुण टिकेकर सहसंपादक म्हणून 'मटा'त आले आणि त्यांनी लेखकांना कॉलम बांधून देण्याची पद्धत पाडली. त्यांनी ती पुढे 'लोकसत्ता'त खूपच जोरकसपणे राबवली. त्यातून पुरवणी संपादनाचा वेगळाच नमुना तयार झाला आहे. परंतु त्यामुळे ठरावीक लेखकांचे ठरावीक पद्धतीचे साहित्य वाचकासमोर प्रत्येक वा आलटून पालटूनच्या रविवारी येते; नव्या लेखकाला लिहिण्याची हवी तेवढी संधी मिळत नाही व मजकुराची विविधता शिल्लक राहत नाही. संपादकांचे काम मात्र सोपे होते. अशोक जैन दिल्लीहून मुंबईच्या ऑफिसमध्ये आला तेव्हा सहसंपादक म्हणून त्याने काही वर्षे रविवार आवृत्तीचे काम पाहिले. त्याची चतुरस्रता त्या कामातूनही प्रकट होई. त्याने 'कलंदर' या नावाने केलेले लेखनही वाचकांच्या कायम स्मरणात राहिले आहे. तो वारसा श्रीकांत बोजेवार त्याच्या रविवारच्या कॉलममधून यशस्वीपणे पुढे नेत आहे.

वर्तमानपत्र हा समाजमनाचा आरसा असतो असे म्हणतात. 'मटा'ने मराठी समाजाचे वास्तव तरीही प्रगतिशील असे दर्शन १९६२ ते २००० या काळात घडवले. त्यानंतरचा काळ मात्र टेक्नॉलॉजीच्या प्रभावाखाली वेगळ्याच, नव्या जीवनमूल्यांना घेऊन आला. 'मटा'च्या व्यवस्थापनाने ते स्थित्यंतर अचूक टिपले आणि भारतकुमार राऊतच्या संपादकत्वाखाली २००० सालानंतर 'मटा'ने नवेच रूप घेतले. ते रूप व्हिज्युअल इम्पॅक्टचे, सुटसुटीत-चटपटीत वाचनाचे आहे. ते जुन्या वाचकांना पटणारे नव्हते, परंतु ती काळाची अचूक जाण होती. त्यामुळे तरुणवर्गात जो मराठीचा वाचक उरला होता, तो 'मटा'कडे बांधला राहिला, नव्याने आकृष्ट झाला. बालकवींच्या 'श्रावणमासी' कवितेने कित्येक पिढ्यांवर मोहिनी टाकली होती. नव्या रूपातील 'मटा'ने श्रावणाचे आकर्षण 'श्रावणक्वीन'मध्ये आणले. नवरात्राचे नऊ रंग कोणाला माहीत होते? कधी ऐकलेही नव्हते. नव्या 'मटा'ने महाराष्ट्र महिलांचे जीवन रंगमय करून टाकले. जीवनशैलीवर अशा तऱ्हेचा प्रभाव ! नव्या 'मटा'चे ते श्रेय नाकारून कसे चालेल? 'मटा'च्या तुलनेत मुंबईचा दुसरा मोठा पेपर लोकसत्ता' हा वाचकसंख्येच्या दृष्टीने २००० सालापर्यंत सतत आघाडीवर राहिला आहे. समाजमनावर प्रभाव मात्र 'मटा'चा होता. राजकारणी वसंतदादा पाटील, मातब्बर प्रकाशक केशवराव कोठावळे यांच्यापासून वेगवेगळ्या क्षेत्रांतील ज्येष्ठ-श्रेष्ठ 'मटा'चे निष्ठावंत वाचक होते. अनेक लोकांना तळवलकरांचे अग्रलेख मुखोद्गत असत. परंतु खप 'लोकसत्ता'चा जास्त असे व त्यामुळे टाइम्स'चे वितरण विभाग व जाहिरात विभाग लोकसत्ता'कडे असूयेने पाहत, 'मटा'च्या संपादकवर्गास 'लोकसत्ता'चे अनुकरण करण्याचे सुचवत. ते फार अवघड काम होते. 'लोकसत्ता'चा खप 'मटा'पेक्षा लाखालाखाने पुढे असे. (त्यातील गमतीदार विसंगती अशी, की पुण्यामध्ये 'मटा'ची विक्री अकरा हजार अंकांची होत असेल तर 'लोकसत्ता'च्या फक्त हजार प्रती विकल्या जात. कारण पुणे हे विद्वानांचे, बुद्धिवंतांचे शहर!) असे म्हणतात, की नव्या रूपातील 'मटा'ची विक्री 'लोकसत्ता'च्या खपाच्या कितीतरी अधिक आहे!

देशाचे आर्थिक धोरण नव्वद साली बदलल्यानंतर सर्व समाज चैनीच्या, सुखसमृद्धीच्या मागे लागला. मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर या शहरांची स्वतंत्र व्यक्तिमत्त्वे नाहीशी झाली. त्या सर्व ठिकाणच्या वाचकांना सामावून घेईल असे धोरण 'मटा'ने स्वीकारले व मराठी वृत्तपत्राचे नवे रूप गेल्या दोन दशकांत सादर केले. नव्या व्यवस्थेत वृत्तपत्राच्या संपादकास ब्रँड मॅनेजर म्हणू लागले. 'मटा'च्या या नव्या युगातील पहिला संपादक भारतकुमार राऊत याच्याकडे परंपरेचे भान होते व त्याला येणाऱ्या काळाची जाण होती. त्याने 'झी टीव्ही'ची लोकप्रियता वाढवण्यात मोठी कामगिरी केल्याचे श्रेय त्याच्या नावावर होते. दुसरा अशोक पानवलकर हा संपादक झाला - त्या खुर्चीवर बसला व निवृत्त होऊन गेला. तिसरा पराग करंदीकर याने या वर्षीच 'मटा'च्या संपादकपदाची सूत्रे घेतली आहेत. त्याचा वृत्तपत्राचे कर्तव्य-कार्य आणि काळाची मागणी या दोन विचारप्रवाहांत समन्वय करण्याचा प्रयत्न चाललेला दिसतो. मात्र त्या दृष्टीने तो व त्याची टीम लेखनाबरोबर कल्पकता किती व्यक्त करतात हे महत्त्वाचे ठरेल.

मला बऱ्याच वेळा वाटते, की कर्णिक, तळवलकर, महाजनी, परुळेकर, भालेराव हे महाराष्ट्रात गेल्या शतकात यशस्वी संपादक होऊन गेले; त्यांच्यापैकी कोणी आजच्या युगात दैनिकाच्या संपादकपदी आला तर काय करेल? भालेराव व परुळेकर यांच्या कहाण्या कदाचित वेगळ्या असतील; बाकी तिघांनी राऊत ते करंदीकर हाच लौकिक यशाचा मार्ग स्वीकारला असता. आता समाजात अलौकिक असे काही राहिलेले मीडियाला दिसत नाही. समाजातही जनतेच्या अंगी 'प्रत्येक क्षणी जगा' हे कृष्णमूर्तींपासून अनेक तत्त्वज्ञांनी सांगितलेले विचारसूत्र उतरले आहे. त्यामुळे आपत्ती येतात-जातात, मनोरंजन अबाधित आहे!


मग छापील वर्तमानपत्रांना समाजात काही स्थान आहे की नाही? प्रत्येक वर्तमानपत्र मनोरंजनयुगास पूरक असा आकार व रूप घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्या प्राप्त स्वरूपात मुख्यत: जुन्या वाचकांना रिझवण्यासाठी काय करता येऊ शकेल? (नवा वाचक मिळवणे यापुढे मुश्कील होणार आहे.) एक म्हणजे 'कम्युनिटी न्यूज' वाढवता येईल. पण आता 'कम्युनिटी' पूर्वीप्रमाणे गणपती मंडळे, तालीम संघ, वाचनालये, व्याख्यानमाला अशा स्वरूपात राहिलेली नाही. अशा वेळी, 'कम्युनिटी' व्यक्तिगत छंद-अभ्यास व त्या भोवती जोडली गेलेली नेटवर्क या स्वरूपात पाहावी लागेल. तशी अनेक उदाहरणे सुचवता येतील. तसेच, 'कृष्णा

कॉन्शसनेस'सारखे ग्रूप उच्च वर्गात वाढत आहेत, त्यांचा मागोवा घ्यावा लागेल. दुसरे म्हणजे 'ओपिनीयन मेकर' म्हणून वर्तमानपत्रांनी त्या क्षेत्रातील ठेकेदारांपासून स्वत:ला मुक्त करून घेऊन, सध्याच्या संदिग्ध काळात ठाम भूमिका मांडली जाईल हे पाहावे. काळ तर मोठा कठीण आला आहे अशी वाचकांची सध्या भावना आहे. अशा काळी रानडे-फुले-टिळक-आगरकर यांच्या काळात जसे निर्भीड, स्पष्ट मत प्रतिपादन होई तसे काही वाचण्यास लाभावे याच्या प्रतीक्षेत वाचक आहेत. तशा विचारांना पूरक असा कृतिकार्यक्रम समाजात मोजक्या पॉकेट्समध्ये चाललेला दिसेलही. तो बराचसा 'पॉझिटिव्ह' स्वरूपाचा आहे व म्हणून कौतुकादरास पात्र आहे. त्या निमित्ताने समाजस्थितीवर परखड भाष्य हे मोलाचे ठरू शकेल. मराठीतील वर्तमानपत्रे स्वातंत्र्यलढ्याच्या काळापासून ब्रिटिश आणि नंतर काँग्रेस सत्ताधीशांच्या टिकेवर विकसित झाली- वाढली. तो 'अॅप्रोच' बदलण्याची वेळ आली आहे, कारण समाजाचा रोख बदलला आहे. हे विधान निर्विवाद भासले तरी तसे नाही, त्यावर विचारमंथन बरेच व्हावे लागेल. समाजाला 'इन्फर्मेशन' देत असताना शहाणपणही शिकवावे लागते, ती भूमिका वर्तमानपत्रांनी 'एंटरटेनमेंट'सोबत निभावावी एवढेच सुचवायचे आहे.

**– दिनकर गांगल**
भ्रमणध्वनी : +९१ ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com

**॥ग्रंथाली॥**

## अनुराधा गोरे यांची तीन पुस्तके




**अशक्य ते शक्य**

**कारगील संघर्षात ज्यांनी भाग घेतला त्यांचं लेखिकेने केलेले स्मरण**


**मूल्य ४५० रु. सवलतीत २५० रु.**




**आम्ही अशा वेगळ्या...**

**लेखिकेच्या जीवनप्रवाहात मनावर कोरल्या गेलेल्या काही व्यक्तिरेखा**

**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**




**आठवणी दाटतात**

**न विसरता येण्याजोग्या आठवणींचा गोफ**

**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**

**॥ग्रंथाली॥**





**डॉ. अनंत देशमुख यांची दोन पुस्तके**


## नाट्यविचार आणि नाट्यसमीक्षा

नाट्यविषयक लेखन

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**





# मटाचे 'ते' स्वरूप आता राहिले नाही

**प्रताप आसबे**

**संयुक्त** महाराष्ट्राच्या निर्मितीच्या पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र टाइम्स' सुरू झाला. टाइम्स वृत्तसमूहाचे हे पहिले मराठी अपत्य. या वृत्तसमूहाने दर्जेदार वृत्तपत्रे आणि नियतकालिके वाचकांना दिली. त्या प्रकाशनांबरोबरच विद्वान, व्यासंगी तसेच स्वतंत्र बाण्याचे संपादक दिले होते. या परंपरेला साजेसे संपादक महाराष्ट्र टाइम्सला लाभले. त्यांनी एक दर्जेदार, निर्भीड आणि विश्वासार्ह वर्तमानपत्र म्हणून महाराष्ट्र टाइम्सला नावारूपाला आणले. मराठी वृत्तपत्रसृष्टीत तेव्हा दर्जेदार वृत्तपत्रे होती. त्यांचे संपादकही विद्वान आणि नावाजलेले होते. अशा स्थितीत महाराष्ट्र टाइम्सचे संपादक आणि त्यातील पत्रकारांनी हे वर्तमानपत्र अल्पावधीत नावारूपाला आणले. गुणवत्तेतही हे वृत्तपत्र अव्वल दर्जाचे ठरेल, याची काळजी घेतली. सुरुवातीची पाच वर्षे द्वा.भ. कर्णिक यांनी मटाची पायाभरणी केली. ते कट्टर प्रागतिक तसेच प्रेमळ होते. गोविंदराव तळवलकरांनी १९६७ साली महाराष्ट्र टाइम्सची सूत्रे हाती घेतली. आणि मग जवळपास एकोणतीस वर्षे अथकपणे त्यांची धारदार लेखणी मटाच्या माध्यमातून वृत्तपत्रसृष्टीत तळपत राहिली. त्यांचे लेख असोत वा अग्रलेख. शिवाय, त्यांच्यातील वाचस्पतीने जागतिक पातळीवरील उत्तमोत्तम ग्रंथांची ओळख मराठी वाचकांना करून दिली. राज्यात त्यांचा असा मोठा वाचकवर्ग होता. छोटी छोटी वाक्ये. कोणालाही समजावे अशा सोप्या भाषेत लिहिण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळे गावागावात मटा वाचला जाऊ लागला. त्यातून नवशिक्षित बहुजनसमाज आधुनिकतेच्या प्रवाहात येण्यास मदत झाली. पुढे मटा म्हणजे तळवलकर आणि तळवलकर म्हणजे मटा, असे समीकरणच बनले. त्यांचे असे वाचक होते की ते आधी अग्रलेख वाचायचे आणि मग मटा. मराठीत असा एखादाच संपादक असेल की ज्याच्या गाजलेल्या अग्रलेखाचे इंग्रजी अनुवाद पंतप्रधानांपुढे ठेवले जायचे. तळवलकर कोणाची भीडभाड ठेवायचे नाहीत. त्यांना वावगे खपायचे नाही. या बुद्धिप्रामाण्यवाद्याला एखादी गोष्ट खटकली की त्यांच्या लेखणीला धार चढायची. आक्षेपार्ह बाबींवर तर दांडपट्टाच चालायचा. भेदक अग्रलेखांमुळे भल्याभल्यांची गाळण उडायची. त्यामुळे राज्यकर्ते, राजकीय पक्ष तसेच प्रशासनावर त्यांची जरब होती. त्यांच्याबद्दल भीती आणि आदरही असायचा. तळवलकरांची ग्रंथसंपदाही समृद्ध आहे. त्यांच्या काळात मटा हे अधिकाधिक विश्वासार्ह तसेच दखलपात्र होत गेले.

**राजकीय घडामोडीच्या संबंधातील स्तंभाला अशोक जैन यांनी 'महाराष्ट्र देशी', असे नाव दिले. सुरुवातीला साबडे आणि मी, आणि नंतर अकोलकर आणि मी 'महाराष्ट्र देशी' लिहायचो. पुढे मी एकटाच महाराष्ट्र देशी लिहायला लागलो. मटामध्ये नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखामध्ये किंवा स्तंभामध्ये आपली मते मांडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. तळवलकर लेख वाचायचे आणि चर्चाही करायचे.**

अर्थात तळवलकरांचे मटातील सहकारीही मोठे कर्तृत्ववान होते. मैदान गाजवणारे होते. त्या काळात मटामध्ये सगळ्या विचारांच्या लोकांचा समतोल होता. संघिष्ट, समाजवादी, काँग्रेसवाले, साम्यवादी, रॉयिस्ट, शिवाय विचारसरणीशी संबंधित नसलेले लोकही त्या काळात वर्तमानपत्रात असत. सध्याच्या माध्यमांप्रमाणे वर्तमानपत्रांवर कोण्या एका विचारसरणीची मक्तेदारी नव्हती. दि.वि. गोखले, दिनू रणदिवे, जगन फडणीस, अशोक जैन, दिनकर गांगल, जोसेफ नरोन्हा, वि.वि. करमरकर, प्रकाश बाळ, सतीश कामत आणि कमलाकर नाडकर्णी, काही काळ अरुण टिकेकर, कुमार केतकर अशी दिग्गज मंडळी मटात होती. यातील प्रत्येकाला त्याची त्याची ओळख होती. कर्तृत्वाने ओळखले जायचे. तळवलकरांप्रमाणे यातील प्रत्येकाचे योगदान आहे. बातमीदारीमध्ये दिनू रणदिवे आणि जगन फडणीस यांचे मोठे स्थान होते. जैन 'राजधानीतून' या लोकप्रिय सदराद्वारे दिल्लीतील राजकारणाचा वेध घ्यायचे. गांगल यांची रविवारची 'मैफल' बहारदार असायची. बाळ

फोंडके दर्जेदार विज्ञान पुरवणी काढायचे. तरुण आणि क्रीडाप्रेमी वाचक मटातील क्रीडा जगताविषयीचे करमरकरांचे शेवटचे पान सर्वात आधी वाचायला घ्यायचे. शेवटचे पान लोकप्रिय करण्याचे श्रेय अर्थातच त्यांचे. मटाच्या अग्रलेखापाठोपाठ गोखले, मराठे, बाळ, आ.श्री. केतकर, कामत यांचे नेटके 'धावते जग' लोकप्रिय होते. हेमंत देसाई यांचा बाबूमोशाय चांगलाच वाचला जायचा. भारतकुमार राऊत व अशोक पानवलकर पुढे मटाचे संपादक झाले. जे लोक डेस्कवर काम करतात, ते बाहेरच्यांना अपरिचित असतात. तेथेही जोसेफ नरोन्हा यांच्यासारखे तगडे लोक होते.

तळवलकर करड्या शिस्तीचे होते. त्यांना वावगे खपायचे नाही. सकाळी नऊच्या ठोक्याला कार्यालयात हजर असायचे. त्या काळात न्यूज एडिटरच्या टेबलावर एक रजिस्टर असायचे. ते उभ्याउभ्याच शेलक्या शब्दांत त्यावर लिहायचे. त्या दिवसाच्या अंकाची एका वाक्यातील चिरफाड असायची. ते केबिनमध्ये गेले की रजिस्टरवर उड्या पडायच्या. त्यावर दिवसभर दबक्या स्वरात चर्चा व्हायची. ज्याची गल्लत झाली असेल त्याला तर तोंड दाखवायला जागा नसायची. ते रजिस्टर म्हणजे ऐतिहासिक दस्तऐवज होता. वृत्तसंपादक, ज्येष्ठ साहाय्यक संपादक, मुख्य वार्ताहर यांच्या पलीकडे त्यांनी कुणाला केबिनमध्ये बोलावल्याचा निरोप येताच त्याची पाचावर धारणच बसायची. ते केबिनच्या बाहेर आले की वातावरण एकदम चिडीचूप व्हायचे. पत्रकारितेतील वाह्यातपणाचा त्यांना कमालीचा तिटकारा होता. टाइम्स वृत्तसमूहातील 'इंडिपेंडंट' या दैनिकाने खालच्या पातळीवर जाऊन यशवंतराव चव्हाणांच्या बदनामीची बातमी छापली होती. सहाजिकच, महाराष्ट्रात मोठे वादळ उठले होते. तळवलकरांनी इंडिपेंडंट आणि त्याच्या संपादकांची सालटी लोळवणारा अग्रलेख लिहिला होता. टाइम्सच्या व्यवस्थापनाची त्यांनी पर्वा केली नव्हती. शिवाय, व्यवस्थापनही त्यांना काही विचारायला धजावले नव्हते. शेवटी त्या संपादकांना जावे लागले. तळवलकरांचा अग्रलेख सकाळी बारा-साडेबाराला तयार असायचा. मग ते दिवसभर वाचत बसायचे. रिपोर्टिंगच्या डेस्कजवळ येऊन वार्ताहरांना बातम्या विचारायचे. कधी कधी तेथेच उभ्याउभ्या चर्चा करायचे. तेव्हा कान टवकारून सगळे ऑफिस ऐकायचे. ते नीटनेटके राहायचे. दाढी न करता आलेला कुणी त्यांना आवडायचा नाही. दाढीदीक्षित तर त्यांच्या टिंगलीचाच विषय. याला दोघे अपवाद होते. एक अशोक जैन आणि दुसरे समाजवादी कार्यकर्ते माधव साठे. शेक्सपीयर, दोस्तोवास्की, चेकॉव लेखकांत तसेच अठरा आणि एकोणिसाव्या शतकातील इंग्रजीमधील क्लासिक्समध्ये त्यांना खूप रस होता. कुसुमाग्रज आणि पीएल यांच्याशी तर दोस्तानाच. दिल्लीत गेले की इंडिया इंटरनॅशनलमध्ये उतरायचे. तेथल्या दिग्गज विद्वानांच्या मैफलीत रमायचे. त्यामुळेच शरद पवार थट्टेने त्यांचा उल्लेख 'सर गोविंदराव तळवलकर', असा करत. प्रत्यक्षात तळवलकरांना सर किंवा साहेब म्हटलेले अजिबात आवडायचे नाही. त्यांचा उल्लेख तळवलकर करावा, असा त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे मटातील शिपाईही त्यांना तळवलकर म्हणून



**दिवाकर देशपांडे, सतीश लळित, शिवाजी सावंत, सतीश कामत, नितीन वैद्य, गोविंदराव तळवलकर, अशोक आचार्य, प्रकाश अकोलकर आणि प्रताप आसबे**

हाक मारत, हे विशेष. तळवलकरांचे यशवंतराव चव्हाण यांच्याशी खासच संबंध होते. दोघेही रॉयिस्ट आणि दोघेही नेहरूंना मानायचे. या पलीकडे इंदिरा गांधी, एसेम जोशी, मधु लिमये, अटलबिहारी वाजपेयी, राजीव गांधी, इंद्रकुमार गुजराल, ज्योती बसू यांच्याशी खास संबंध होते. जॉर्ज फर्नांडिस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्याशी त्यांचे संबंध अरेतुरेचे होते. त्यामुळे महाराष्ट्राच्याच काय पण देशाच्या राजकारणात काय चाललेय, याची त्यांना खडान्‌खडा माहिती असायची.

तळवलकर करड्या शिस्तीचे असले तरी आम्हा तरुण वार्ताहरांत ते रमायचे. आम्हालाही राजकारणातील ऐतिहासिक घडामोडींबद्दल कुतूहल असायचे. तळवलकर, जैन आणि आम्ही तरुण वार्ताहर वर्षभरातून कधीतरी कुठल्यातरी निवांत ठिकाणी जायचो. तेथे भरपूर गप्पा व्हायच्या. गप्पा कसल्या आम्ही सगळे मिळून त्यांना सतत प्रश्न विचारायचो आणि ते अथकपणे उत्तरे द्यायचे. कधी कधी ते चर्चगेटच्या राम महलमध्ये संध्याकाळी जेवायला बोलावायचे. त्यासाठी संध्याकाळी सात वाजल्यापासून त्यांचे फोन यायचे. 'आसबे, त्या नाशिकच्या ब्राह्मणाला आणि साबडेना घेऊन या (प्रकाश अकोलकर आणि संजीव साबडे). उशीर करू नका, आज फारसे काम नाही,' असे बजावायचे. त्यांनी आम्हाला लिहिते केले. राजकीय घडामोडीच्या संबंधातील स्तंभाला अशोक जैन यांनी 'महाराष्ट्र देशी', असे नाव दिले. सुरुवातीला साबडे आणि मी, आणि नंतर अकोलकर आणि मी 'महाराष्ट्र देशी' लिहायचो. पुढे मी एकटाच महाराष्ट्र देशी लिहायला लागलो. स्तंभात काय लिहायचे याचे पूर्ण स्वातंत्र्य आम्हाला होते.

महाराष्ट्र टाइम्सने मला बऱ्याच महत्त्वाच्या राजकीय घडामोडींच्या वार्तांकनासाठी धाडले. ते अनुभवविश्व समृद्ध करणारे होते. ऐंशीच्या उत्तरार्धात भाजपने बाबरी मशिदीचा वाद पेटवला होता. अडवाणींच्या रथयात्रेने देशातील वातावरण चांगलेच तापवले होते. मुलायमसिंग यादव यांच्या राजवटीत बाबरी मशीद तोडण्याचा अयशस्वी प्रयत्न भाजप आणि संघ परिवाराने केला होता. या पार्श्वभूमीवर राममंदिरासाठी ६ डिसेंबर १९९२ रोजी कारसेवेचे मोठे आंदोलन संघ परिवाराने आयोजित केले होते. कारसेवेत मशीद पाडणार, अशी सर्वत्र चर्चा होती. तळवलकरांनी मला अयोध्येला पाठवायचे ठरवले. उत्तर प्रदेशात कल्याणसिंह यांची राजवट होती आणि दिल्लीत नरसिंह राव पंतप्रधान. मुलायमसिंग यादव ६ डिसेंबरच्या पूर्वी नोव्हेंबरात मुंबईत आले होते. एअरपोर्टजवळच्या सेंटॉरमध्ये त्यांना भेटलो. बऱ्याच गोष्टी त्यांनी सांगितल्या. तरीही मी त्यांना शेवटी विचारले, ''६ डिसेंबरला अयोध्येत काय होणार?'' ते म्हणाले, ''वह तो मस्जिद नोचनेवाले है. पूरी तैयारी उसी की चल रही है''. मला ते खरे वाटत नव्हते. कारण मुख्यमंत्री कल्याणसिंह यांनी मशिदीला धक्का लागणार नाही, असे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयाला दिले होते. शिवाय, मशीद पाडली तर देशाचे ऐक्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही, असे वाटत होते. त्यामुळे संघवाले या टोकापर्यंत जाणार नाहीत. असा माझा समज. संघातले काही लोक मशीद पाडणारच, असे म्हणायचे तर काही प्रतीकात्मक कारसेवेची भाषा करायचे. दिशाभूल करण्याच्या रणनीतीनुसार दहातोंडे दहा दिशांनी बोलायचे. अयोध्येला जाण्याआधी लखनौला गेलो तेव्हाही मुलायमसिंगांना भेटलो आणि तेव्हाही त्यांनी ठामपणे तेच उत्तर दिले. नोव्हेंबरच्या अखेरीस अयोध्येत पोहोचलो तेव्हा पाहतो तर मशिदाभोवती कारसेवकांचा घट्ट वेढा पडला होता. त्यात रोज हजारोंची भर पडत चालली होती. ६ डिसेंबरला आडवाणी यांनी राणाभीमदेवी थाटात भाषण करून कारसेवकांना प्रक्षुब्ध केले, पण प्रत्यक्षात दगडफेक सुरू होताच चक्क पळ काढला. मुलायमसिंग यांनी जसे सांगितले त्याच पद्धतीने कारसेवकांनी भोसकून भोसकून मशीद पाडली. इतका हिंस्र उन्माद आपण त्यापूर्वी आणि नंतरही कधी पाहिला नाही. मशीद पाडल्यानंतरही तात्पुरते मंदिर बांधेपर्यंत नरसिंह राव सरकारने हस्तक्षेप केला नाही. राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतरही करसेवकांनी सगळा ढिगारा साफ केला आणि तिथे मंदिर बांधून पूजा सुरू केली. तेव्हा केंद्रीय सुरक्षा यंत्रणांनी परिसराचा ताबा घेतला. संघ परिवार आणि नरसिंह राव यांची मिली भगतच होती.


राजीव गांधी यांच्या हत्येनंतर राव पंतप्रधान झाले आणि शरद पवार संरक्षणमंत्री. राजीव यांच्या हत्येनंतर पवार नेतृत्वाच्या स्पर्धेत उतरले होते. राव यांनी पवारांचा समावेश केंद्रीय मंत्रिमंडळात केला असला तरी पवार त्यांना दिल्लीत नको होते. पवारांनी दिल्लीत जाताना सुधाकरराव नाईकांकडे राज्याचे मुख्यमंत्रिपद सोपवले होते. ते त्यांचे विश्वासू सहकारी होते. नाईक जेव्हा जेव्हा पंतप्रधानांना भेटत तेव्हा तेव्हा राव त्यांचे कान भरत. शरदला दिल्लीत करमत नाही, त्याला महाराष्ट्रात परत जायची इच्छा आहे, इत्यादी सुरुवातीला नाईक यांना हे खरे वाटत नव्हते. पण नंतर नंतर राव यांचे म्हणणे त्यांनी गांभीर्याने घ्यायला सुरुवात केली. नाईक यांनी हळूहळू पवार यांच्या विरोधातील काँग्रेसमधल्या निष्ठावंत गटाशी संबंध वाढवले. त्यात शंकरराव चव्हाण, विठ्ठलराव गाडगीळ, ए.आर. अंतुले, रामराव आदिक, प्रतापराव भोसले अशा नेत्यांचा समावेश होता. निष्ठावंत पवारांचा कमालीचा तिटकारा करायचे. त्यांनी पवारांना महाराष्ट्रात परतायचे आहे, अशी कुजबूज मोहीम सुरू करून नाईकांचा संशय आणखी वाढवला. नाईक आणि माझे संबंध खूपच चांगले होते. राजकारणातील अनेक गोष्टी ते माझ्याशी मोकळेपणाने बोलायचे. ते मला अनेक वेळा म्हणत, पवारसाहेबांना परत महाराष्ट्रात यायचे आहे. मला ते अजिबात पटत नव्हते. एकदा असेच खाजगीत बोलताना नाईकांनी पुन्हा पवारांचा विषय काढला. मी त्यांना विचारले, 'कशावरून म्हणता?' पण ते काही बोलायला तयार होईनात. तेव्हा मी म्हणालो, 'निष्ठावंत काय म्हणतात त्याकडे लक्ष देऊ नका. ते लबाड आहेत.' त्यावर 'निष्ठावंतांमुळे मी म्हणत नाही. माझी माहिती वेगळी आहे,' असे नाईकांनी सांगितले. वेगळी माहिती काय हे खोदून खोदून त्यांना विचारले तेव्हा नाईक म्हणाले पंतप्रधानांनीच मला हे अनेकदा सांगितले आहे. अगदी मागच्या आठवड्यातही त्यांनी तेच सांगितले. या चर्चेनंतर 'पवार महाराष्ट्रात

परणार', अशी बातमी मी दिली. ती अर्थातच हेडलाईन झाली. मुंबईत झालेल्या भीषण दंगलीचे निमित्त करून देशाची आर्थिक राजधानी सांभाळण्यासाठी तीन दिवस मनधरणी करून राव यांनी पवारांना महाराष्ट्रात परत पाठवले. पवार राज्यात परतणार ही दीड-दोन महिन्यांपूर्वी दिलेली माझी बातमी खरी ठरली. पण सत्य हे होते, की पवारांना त्यांच्या इच्छेविरुद्ध रावांनी परत पाठवले होते. त्यात पवार राजकारणात दहा वर्षे मागे पडले. हे नंतर नाईक यांच्याही लक्षात आले. तेव्हा नाईक-पवार यांचे संबंध पूर्ववत झाले.

मटामध्ये नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखामध्ये किंवा स्तंभामध्ये आपली मते मांडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. तळवलकर लेख वाचायचे आणि चर्चाही करायचे. नव्वदीच्या दशकात शरद पवार यांना मोठ्या बदनामीला तोंड द्यावे लागले. विशेषतः ९२ आणि ९३च्या दंगलीनंतर. समाजात कमालीचे धृवीकरण झाले होते. त्यात बॉम्बस्फोटांच्या मालिकेनंतर भाजप आणि गोपीनाथ मुंडे यांनी तर पवारांचे दाऊद इब्राहिमशी साटेलोटे असल्याचे आरोप सुरू केले होते. पवारांच्या चारित्र्यहननाची मोहीमच होती ती. भाजपवाल्यांना गल्लीदिल्लीतील काँग्रेसवाल्यांची मोठी फूस होती. इतके आरोप होत असताना पवार चकार शब्दानेही प्रतिवाद करत नव्हते. आरोपांकडे दुर्लक्ष करण्याची भूमिका घेऊन ते काम करत राहिले. त्यातून पवार आणि दाऊद यांच्यात खरोखरच काहीतरी काळेबेरे असावे, असा संशय लोकांत बळावला. त्याचा परिणाम अर्थातच प्रसारमाध्यमांवर झाला. पवार बोलतच नसल्याने माध्यमांनीही त्यांना लक्ष्य केले. 'महाराष्ट्र देशी' या सदरातून मीही सतत त्यांना झोडत होतो. तळवलकर आणि पवारांचे जवळचे संबंध होते, पण त्यांनाही पवारांचे मौन रुचले नव्हते. मी सतत जिव्हारी लागणारे लिहीत होतो. त्यामुळे एक मित्र म्हणाले, तुम्ही एकतर्फी लिहून साहेबांवर अन्याय करताय. मी म्हणालो, मग त्यांना सांगा हे आरोप फेटाळायला. ते गप्प का आहेत? ते म्हणाले, तुम्ही एकदा भेटा त्यांना. मी म्हणालो, मी का भेटायचं? मी अजिबात भेटणार नाही. अशीच चर्चा दोन-तीन वेळा झाली. ते पिच्छा सोडेनात तेव्हा मी म्हणालो, त्यांनी बोलावले तर जाईन, स्वतःहून जाणार नाही. शिवाय, तुम्ही त्यावेळी बरोबर असले पाहिजे. कुणीतरी साक्षीदार नको का. ते म्हणाले, तिसऱ्या व्यक्तीमुळे दोघांवरही दडपण येईल. वर्षावरून निमंत्रण आले तसे मी पवारांना भेटलो. असे ठरले की मी आधी सगळे आक्षेप त्यांच्यापुढे मांडायचे. नंतर ते त्याची उत्तरे देणार. तास-सव्वा तास मला काय म्हणायचे होते, ते स्पष्टपणे सांगितले. शेवटी म्हणालो, अशावेळेस तुमच्या जागी इतर कोणी असते तर तो म्हणाला असता की 'यातील एकजरी आरोप सिद्ध झाला तर हुतात्माचौकात मी फाशी घेईन.' यानंतर बैठक संपली. दुसऱ्या बैठकीत मी ज्या ज्या क्रमाने त्यांना सवाल केले होते त्या त्या क्रमाने त्यांनी प्रत्येक आरोपाची सविस्तर उत्तरे दिली. घटनांमधील बारकावे सांगितले. त्या त्या वेळेची वस्तुस्थिती मांडली. 'लोकांचे परसेप्शन असे आहे म्हणून आरोप सिद्ध होत नाही. कालांतराने लोकांचे झालेले मतही बदलेल, असा मला विश्वास आहे.' माझे आक्षेप आणि इतरांचे आरोप हे त्यांच्या खुलाशाने निरर्थक ठरले होते. शेवटी ते म्हणाले, 'मला जे सांगायचे ते मी सांगितलंय. आता तुम्हाला जे लिहायचे आहे ते लिहा, माझा कोणताही आक्षेप राहणार नाही.' बैठक संपली. दोन-तीन दिवस खूपच अस्वस्थतेत गेले. माझे आक्षेप आणि विरोधकांचे आरोप याला राजकारणाशिवाय कोणताही आधार शिल्लक राहिला नव्हता. आपण एकतर्फी लिहीत आलो, हे बोचत होते. महाराष्ट्र देशी या स्तंभात मी त्यांना झोडपत आलो होतो. राव-भाजप यांच्यातील संगनमताने मशीद पाडली गेली. त्यानंतरची दंगल सावरण्याच्या निमित्त करून पवारांना महाराष्ट्रात धाडले. आणि भाजपने उलटे पवारांनाच लक्ष्य केले. हे लक्षात घेऊन एका स्तंभात मी माझ्या चुकीची कबुली दिली. मी केवळ लोकांच्या परसेप्शनचा आधार घेऊन टीका केली, पण आधार नव्हता, असे स्पष्ट केले. कॉलम छापून आला आणि सकाळी पोटात गोळा आला. तळवलकर काय म्हणतील? त्यांच्या भीतीने दोन दिवस ऑफिसला न जाता थेट मंत्रालयात जात होतो. तळवलकरांनी वाचलेच नसावे, नाहीतर त्यांचा फोन तरी आला असता, या विचाराने निर्धास्त झालो आणि ऑफिसला गेलो. तळवलकर दुपारच्या जेवणानंतर ऑफिसात येता येताच मला हाक मारली, आसबे! मला कापरेच भरायचे बाकी होते. ते म्हणाले, शरदच्या फार प्रेमात पडू नका. माझा जीव भांड्यात पडला. पवारांबद्दल दूषित झालेली त्यांची मतेही कालांतराने बदलली. कारण ट्रकभर पुराव्याच्या दाव्यातील एकही पुरवा कधी पुढे आला नाही.

आता प्रश्न महाराष्ट्र टाइम्सचे वर्तमान आणि भवितव्याचा. ज्यांच्या हाती मटाची सूत्रे आहेत, ते ठरवतील. परंतु मटाचे 'ते' स्वरूप आता राहिले नाही. लोकांची बरीच वर्षे ही तक्रार आहे. तळवलकरांच्या नंतर मटा 'मटा' राहिला नाही आणि शामलाल तसेच गिरिलाल यांच्यानंतर टाइम्सही 'टाइम्स' राहिला नाही. तळवलकरांनंतर केतकर हे प्रागतिक विचाराचे संपादक मिळाले, पण त्यांची मते एकांगी होती. केतकरांनी मटाचा सोटा केला, असे लोक म्हणत. दरम्यान, टाइम्सच्या व्यवस्थापनाचीही भूमिका बदलली. स्वतंत्रबाण्याचा लिहिता संपादक नेमायचा नाही. नेमायचा संपादक पण त्याने संपादकाऐवजी व्यवस्थापकाची भूमिका पार पाडायची, असेच धोरण इतरांनीही अंगीकारले. त्याचे व्हायचे ते परिणाम झाले. माध्यमे मालकांची बटिक झाली. आणि मालक सरकारच्या ताटाखालची मांजरे. माध्यमांच्या दुनियेत भास्कर, स्टेटस्मन, हिंदू, इंडियन एक्स्प्रेस, वायर हेच काय ते अपवाद!

**- प्रताप आसबे**
भ्रमणध्वनी : +९१ ९८६९२६६०५५
asbepratap@gmail.com



# क्लास मित्र, स्मार्ट मित्र आणि मास मित्र

**संजीव साबडे**

**‘महाराष्ट्र** टाइम्स’मध्ये मी १९८५ मध्ये रुजू झालो. गोविंद तळवलकर संपादक होते. तेव्हा त्यांचा आणि मराठी वृत्तपत्रांमध्ये मटाचा दबदबा होता. राजकारणी, समाजकारणी, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, नोकरशहा, उद्योगपती, डॉक्टर, वकील अशा उच्चभ्रू आणि डिसिजन मेकर वर्गाला मटाचं आकर्षण होतं. तळवलकर यांची ऊठबसही या वर्गात, दिल्लीतील बड्या सुसंस्कृत राजकारण्यांत, राजनैतिक अधिकाऱ्यांत होती. ते दिल्लीत आले की ही मंडळी त्यांना आवर्जून चहा, नाश्ता व जेवणाला बोलावत. पुढे मी दिल्लीला गेलो, तेव्हा त्याचा अनुभव आलाच. त्यांचा अभ्यास, वाचन, व्यासंग प्रचंड. त्याचीही या वर्गाला भुरळ होती. शहरी सुशिक्षितवर्गाचा तर मटा हीरो होता. तळवलकरांचे अग्रलेख हा चर्चेचा विषय असे. मटाची भाषा हीच मराठी प्रमाणभाषा मानली जात असे. किमान मुंबईत तरी. बहुधा त्यामुळेच वसंत बापट यांनी मटाचं वर्णन ‘पत्र नव्हे, मित्र’ असं केलं होतं. या विशिष्ट क्लासचा मटा खरोखर मित्र होता.

तळवलकर यांच्यानंतर कुमार केतकर यांची मटामध्ये एंट्री झाली. ते यायला तयार नव्हतेच, पण त्यांनी यावं, आपला वारसा पुढे चालवावा, असं तळवलकरांना वाटत होतं. अनेकंची ती इच्छा होती. मी आणि प्रताप आसबे यांनी कुमार केतकरांना भेटून तसा आग्रहही केला होता. देशात नरसिंह राव पंतप्रधान होते आणि डॉ. मनमोहनसिंग अर्थमंत्री. राजीव गांधी यांची हत्या झालेली होती. मात्र त्यांच्यामुळेच देशात कम्प्युटर आला होता, एकविसाव्या शतकाचं स्वप्न त्यांनी दाखवलं होतं. आर्थिक उदारीकरणाची सुरुवात राव-मनमोहन यांनी केली होती. त्यामुळे असेल व केतकारांमुळे असेल, मटाचं रूपडंही बदलत होतं. विज्ञान-तंत्रज्ञान, देशाची आर्थिक स्थिती, सुधारणा यावरील फोकस वाढत होता. छपाईतील तंत्रांमुळे बाह्य रूपही चकचकीत होत होतं. त्यामुळे मटा हा ‘पत्र नव्हे, स्मार्ट मित्र’ बनत होता. कुमारच्या राजकीय भूमिकेविषयी अनेकदा वाद होत. मात्र प्रचंड वाचन, अभ्यास, कायम स्मरणात राहणारे संदर्भ, आक्रमक भूमिका, बातम्या व लेखांतील वैविध्य यांमुळे मटाला खरोखर स्मार्ट मित्र बनवलं.

परंतु स्मार्ट मटा हा सर्वसामान्यांचा, मासचा पेपर नव्हता. तो ग्रामीण भागात आपलासा वाटत नव्हता, तसंच शहरांतही विशिष्ट वर्गापलीकडे पोहोचत नव्हता. भारतकुमार राऊत मटाचे संपादक झाले आणि मग त्या प्रक्रियेला सुरुवात झाली. तोपर्यंत आर्थिक उदारीकरणाचे फायदे मिळणारा वर्ग वाढला होता, मध्यमवर्गाकडेही पैसा खुळखुळू लागला होता, तरुण-तरुणींच्या आकांक्षा वाढल्या होत्या, आयुष्यात आनंद हवा, सेलिब्रेशन हवं, नाचगाणं हवं, सिनेमा-नाटक-मनोरंजन अधिक हवं, धमाल हवी, नीटनेटकेपण हवं, फॅशन हवी... असं वाटण्याची कारणं अनेक असतील, पण उदारीकरण हे महत्त्वाचं.

**मुंबई टाइम्स डिसेंबर २००१ मध्ये काढायचं ठरवलं होतं. त्या दृष्टीनं प्रयत्न व घाई सुरू होती. मटामधील काही जण उत्सुकतेनं, काही संशय व साशंकतेनं; तर काही जण का कोणास ठाऊक, काहीशा रागानं मुंबई टाइम्सच्या नव्या प्रयोगाकडे पाहत होते. पण त्याकाळी मटामधील बहुसंख्य उच्चवर्णीय, महाजन होते. मुंटामध्ये आले, ते मात्र सर्व बहुजन समाजातील होते. त्यांची बोली वेगळी, वागणं वेगळं, कपड्यांची पद्धत वेगळी. अनेकांचं शुद्धलेखन, व्याकरण वाईट होतं. यांनाच घडवायचं होतं आणि मटा मासकडे न्यायचा होता. मासची भाषा बोलायची होती.**

राऊत यांनी ते ओळखलं होतं. त्यादृष्टीनं त्यांनी बदल सुरू केले. मटा हा मासचा पेपर व्हावा यासाठी त्यांनी असंख्य प्रयोग केले आणि ते यशस्वीही झाले. मुख्य अंकात मोठे बदल न करता, नियमित वाचकांना धक्के न देता, त्यांनी नवा वाचक जोडायला सुरुवात केली.

********

ते वर्ष होतं २००१. महिना नेमका आठवत नाही, पण ऑगस्ट असावा. भारतकुमार राऊत यांनी मला केबिनमध्ये बोलावलं. इकडचंतिकडचं बोलत राहिले. त्यामुळे मला बोलावण्याचं कारण कळेना. अचानक म्हणाले, मुंबई टाइम्सची जबाबदारी घेशील का? तेव्हा जाहिरात विभागातर्फे तो निघतच होता, पण त्याला फोकस नव्हता. त्याचा वाचक कोण असावा, आपण तो कोणासाठी काढतोय वा ज्यांच्यासाठी तो काढतोय, ते तो वाचतात का, हे कळत नव्हतं. ज्या दोन दिवशी ही पुरवणी निघत असे, त्या दिवशीही मटाचा खप वाढला, असं झालं नव्हतं. ती पुरवणी फसली आहे, असं व्यवस्थापनालाही वाटू लागलं होतं. त्या पार्श्वभूमीवर मुंबई टाइम्स आम्ही संपादकीय विभागातर्फे काढू, असं राऊत यांनी व्यवस्थापनाला सांगितलं असावं आणि ते मान्य झालं असावं.

त्यासाठी राऊत यांनी मला विचारलं होतं. मी शंभर टक्के मुंबईकर, शहरात आडवातिडवा भटकलेलो, वाटेल तिथं हादडणारा, कोणतेही सिनेमे पाहणारा, काहीसा घुसखोर, काहीसा मवाली, सर्व क्षेत्रांत जानपहचान (राऊत बहुधा त्यामुळेच मी व प्रवीण टोकेकर यांना गमतीनं 'ममा' म्हणत) असा असल्यानं आणि असाच माणूस हवा असल्यानं त्यांनी विचारणा केली. मी एकही प्रश्न न विचारता हो म्हटलं. त्यावेळी मी चपला घालत असे, साधे शर्ट... टी शर्ट वा जीन्स नाहीच. कधीही इन शर्ट नाही. थोडक्यात गबाळा होतो. आणि त्यांना तर तरुणांना, घरातील महिलांना आवडेल, भावेल, असा मुंबई टाइम्स हवा होता. त्यांनी ते बोलून दाखवलं. उद्या मटाचे ब्रँड डायरेक्टर रंजन गर्ग यांच्याकडे जायचं आहे आपल्याला, असं सांगून, व्यवस्थित यावं असं सुचवलं.

दुसऱ्या दिवशी रंगीबेरंगी शर्ट इन करून, मस्त बूट घालून ऑफिसमध्ये आलो. माझ्या एकाही सहकाऱ्यानं मला असं पाहिलं नव्हतं. त्यांना धक्काच बसला. तरुण वाचकांसाठी जो पेपर काढायचा, त्याचा प्रमुखही फार तरुण नसला तरी तसा कलरफुल वाटायला तरी हवा की!

पहिली मीटिंग झाली. अगदी प्राथमिक. गर्ग यांनी त्यांच्या कल्पना सांगितल्या. राऊतही बोलले. तेव्हा निघणाऱ्या मुंबई टाइम्सविषयी गर्ग यांनी विचारलं. त्यावर याला फोकस नाही, कोणासाठी हा काढला जातोय हे कळत नाही, जो बॉम्बे टाइम्स वाचत नाहीत; पण तसा मराठी पेपर निघाला तर त्यांना आवडेल, असा मुंबई टाइम्स काढला पाहिजे, तरुण, महिला या टार्गेट वाचक असायला हव्यात, मराठी माणूस मुंबई सोडून ठाणे जिल्ह्यात चाललाय, त्याला आपल्याकडे खेचायला हवं, कॉलेजयुवकांना आवडेल असा पेपर हवा... असं काहीसं मी बोललो. गर्ग त्यामुळे इम्प्रेस झाले असावेत. ती जबाबदारी आपल्याकडे येणार हे जवळपास स्पष्ट झालं. आणखी एक आयडियाबाज, मस्त स्टाइल असलेला आणि संपूर्ण ठाणे जिल्ह्याची, तेथील प्रश्नांची पूर्ण माहिती असलेला सहकारी मिळाला. प्रवीण टोकेकर. त्याच्या कल्पना, लिखाणाची शैली, चटपटीत भाषा, चुरचुरीत शीर्षकं याचा खूपच फायदा झाला.

आमच्या डोळ्यांपुढे सिडनेहॅम, नॅशनल, झेविअर्स, मिठीबाई नव्हे, तर रुईया, रुपारेल, पाटकर, कीर्ती, एमडी, वझे-केळकर, ज्ञानसाधना, जोशी-बेडेकर या कॉलेजांमधली मुलं होती. काहीशी मध्यमवर्गीय, मोठी स्वप्नं पाहणारी, पण त्यासाठीच्या रस्त्यात चाचपडणारी... करिअरच्या वाटांवर अडखळलेली, खिशात फार पैसा नसलेली, पण बड्या कॉलजातल्या पोरापोरींसारखं दिसायचं, वागायचं इच्छा असलेली. सिनेमा, नाटक, काहीसं गॉसिप, सेलिब्रेशन, करिअर, फॅशन हे सर्व हवं असलेली... किमान वाचनात तरी...

दुसरा वर्ग अर्थातच महिला. वर्तमानपत्र वाचणाऱ्या महिलांचं प्रमाण आजही खूप कमी आहे. त्यांनी पेपर वाचावा, असं वाटत असेल तर त्यांच्यासाठी त्यात काही हवंच. त्यादृष्टीनं चाचपणी सुरू झाली. भारतकुमार राऊत यांच्याशी सातत्यानं चर्चा, त्यांचा सल्ला हे सुरू होतं. संजीव कपूरनं त्याचा जणू संपूर्ण 'खाना खजाना' सोपवला. सोबत मिलिंद सोवनी, नीलेश लिमये हे सेलिब्रिटी शेफही होतेच. पेपरमध्ये अधिकाधिक महिलांनी लिहावं, असा प्रयत्न


मटातील पारंपरिक वेशभूषा दिन. सर्व फेटे, एक टोपी


मस्ती की पाठशाला. धिंगाणा आणि उत्साह

होता. त्यांच्यासाठी काही खास ॲक्टिव्हिटी, इव्हेंट असावेत, असं वाटत होतं.

वितरण विभागातील प्रत्येकाशी उत्तम संबंध होते. कुठे मटा कमी जातो, कुठे जात नाही, कुठे प्रयत्न करायला हवेत याबाबत सुनील गोरे व टीमशी चर्चा व्हायची. मुंबईतील गिरणगाव, कुर्ला, भांडुप, चारकोप, गोराई आदी भागांत; तसंच ठाणे, कल्याण, डोंबिवली, वसई, विरार, नवी मुंबई यावर लक्ष केंद्रित करावं, मुंबई टाइम्समध्ये एक संपूर्ण पान ठाणे जिल्ह्यावर असावं (तेव्हा पालघर झाला नव्हता), असा सुनील गोरे व सहकाऱ्यांचा आग्रह होता. तो व्यवस्थापनानं लगेच मान्य केला.

हे सारं सुरू असलं तरी मुंबई टाइम्समध्ये टोकेकर व मी यांच्याखेरीज कोण असणार हे माहीत नव्हतं. जाहिरात विभागातर्फे जो मुंबई टाइम्स निघत होता, त्यात सारेच अर्धवेळ काम करणारे. दोनच दिवस पेपर निघत असल्यानं पूर्णवेळ नव्हतंच कोणी. त्या रिपोर्टर, उपसंपादक, पान लावणारे आर्टिस्ट... सर्वांशी ओळख करून घेतली. मुंबई टाइम्स जाहिरात विभागाकडून संपादकीय विभागाकडे गेल्यास आपण पूर्ण बेकार होणार, या विचारानं ते प्रचंड अस्वस्थ होते. अगदी तरुण पोरं-पोरी. काहीशी रॉ, पण सांगू ते आणि तितकं काम करण्याची, नवं शिकण्याची तयारी असणारी.

असेच सारे हवे होते. त्यातील काही पदवीधर नव्हते आणि पदवी असेल तरच नोकरी, असा नियम. मात्र राऊत आणि मी – आमच्या आग्रहामुळे पदवी नसलेल्यांनाही कायम केलं गेलं. डायरेक्टर रंजन गर्ग यांच्यामुळे ते शक्य झालं.

दरम्यानच्या काळात नवा मुंबई टाइम्स कसा असावा, कसा दिसावा, लूक काय असू शकेल, विषय काय असतील यावर चर्चा आणि प्रत्यक्ष डमीचं काम सुरू केलं. या तरुणांच्या मदतीनं. मुंबई टाइम्ससाठी मराठी बोलीभाषा असावी, मराठी मजकुरात, शीर्षकांत हिंदी-इंग्रजीचा वापर सहजपणे यावा... थोडक्यात तरुण पोरांची भाषा वापरावी, असं ठरवलं. काही डमी केल्या, पण प्रदीप गुहा यांना आवडल्या नाहीत. त्यांनी बदल सुचवले, ते केले.

या सर्वात या पेपरचं नाव आहे तेच ठेवायचं की बदलावं यावरही खल सुरू होता. मुंबई टाइम्स नावानं आठवड्यातून दोनदा निघणारा पेपर फसला असल्यानं ते नाव नको, वेगळं काही असावं या विचारातून 'my मुंबई' हे नाव मला सुचलं. यातील my हा मराठीत माय (आई) दिसेल, असा करून घेतला. पण नाव न बदलण्याचं ठरलं. (पुढे 'पुढारी'मध्ये गेल्यावर तेथील पुरवणीचं नामकरण 'my मुंबई' केलं.)

मुंबई टाइम्स डिसेंबर २००१ मध्ये काढायचं ठरवलं होतं. त्या दृष्टीनं प्रयत्न व घाई सुरू होती. नव्या नेमणुका अद्याप व्हायच्या होत्या. आधी पेपर सुरू कर आणि मग नव्या माणसांसाठी रड, असं राऊत म्हणाले होते. मटामधील काही जण उत्सुकतेनं, काही संशय व साशंकतेनं; तर काही जण का कोणास ठाऊक, काहीशा रागानं मुंबई टाइम्सच्या नव्या प्रयोगाकडे पाहत होते. जुन्या मुंबई टाइम्सची टीम मटा ऑफिसमध्ये बिचकतच आली. मनातून ते टरकलेले होते. इतकी ज्येष्ठ मंडळी, त्यांच्या शेजारी आपण अननुभवी... आपला निभाव लागेल का, अशी भीती होती त्यांना.

इथे जातीचा संबंध आणायचा नव्हता, पण त्याकाळी मटामधील बहुसंख्य उच्चवर्णीय, महाजन होते. मुंटामध्ये जे आले, ते मात्र सर्व बहुजन समाजातील होते. येरम, साटम, बोरकर, सुर्वे, इंगवले, म्हात्रे, पाटील, घरत, संते, पाटील, राणे, कुरतडकर अशा आडनावाचे सारे होते. म्हणजे बहुजन. त्यांची बोली वेगळी, वागणं वेगळं, कपड्यांची पद्धत वेगळी. अनेकांचं शुद्धलेखन, व्याकरण वाईट होतं. यांनाच घडवायचं होतं आणि मटा मासकडे न्यायचा होता. मासची भाषा बोलायची होती. गिरणगाव, कुर्ला, भांडुप, चारकोप, नवी मुंबई, वसई, विरार, नालासोपारा, ठाणे, अंबरनाथ असा हा प्रवास होता. मटामध्ये झालेल्या बदलाचं मोठं श्रेय राऊत यांचं.

मुंबई टाइम्सचा पहिला अंक ९ डिसेंबर २००१ रोजी प्रसिद्ध झाला. मुंबई टाइम्स ही मटाची पुरवणी नसेल, तर तो शहर वृत्तपत्र, म्हणजे संपूर्ण सिटी पेपर असेल, असं ठरलं होतं. त्यामुळे त्यात बातम्या, विनोद, गॉसिप, सिनेमा, नाटक, करिअर, संगीत, विविध वैद्यकीय तज्ज्ञमंडळींचे कॉलम, रस्त्यावरील खाणे, मुंबईतील पानवाले, नामदेव ढसाळ, एन.चंद्रा, केदार शिंदे, प्रशांत दामले, भरत जाधव आदींनी पाहिलेली, अनुभवलेली मुंबई, संजीव कपूरचं



कार्निव्हलच्या चित्ररथावर प्रशांत दामले



कॉमेडी कार्निवल : सुदेश भोसले, केदार शिंदे आणि नवीन प्रभाकर

सदर असं खच्चून खाद्य मुंटामध्ये होतं. अनेकांनी फोन करून कौतुक केलं, काहींनी पहिल्या पानावरील हीरोइन्सचे कमी कपड्यातले फोटो छापल्याबद्दल शिव्या दिल्या. मटाकडून ही अपेक्षा नव्हती, असं ऐकवलं. त्या बराच काळ सुरू होत्या. मटामध्ये मात्र अनेकांनी मुंटाच्या भाषेला नाकं मुरडली, शुद्धलेखनाची आठवण करून दिली.

मात्र डोळ्यांसोर जो टार्गेट रीडर होता, त्याला मुंटा आवडला. रेल्वे, बसमधील महिलांच्या, कॉलेज तरुण-तरुणींच्या हातात तो दिसू लागला. करिअरवरील 'प्रगती फास्ट' आणि 'ठाणे स्पेशल' ही पानं क्लिक झाली. सिनेमा, नाटकांच्या जाहिराती मुंटामध्ये येऊ लागल्या. त्याचाही फायदा झाला. दरम्यानच्या काळात प्रयोग, बदल, दुरुस्त्या हे सुरू होतं. अन्य वृत्तपत्रांच्या पुरवण्यांपेक्षा मुंटा सर्वार्थानं वेगळा होता. त्यामुळे वाचकाला तो भावला.

मुंटाला एक वर्ष पूर्ण होणार तेव्हा अधिक जाहिराती मिळाल्यास जास्त पानांचा अंक काढू, सेलिब्रिटींना लिहायला लावू, अशी चर्चा सुरू झाली. त्यावर तुमच्या वर्धापनदिनाला, वाढदिवसाला इतरांनी पैसे खर्च करून जाहिराती का द्यायच्या, असा सवाल करत, जाहिराती मिळणार नाहीत, असं जाहिरात विभागानं सांगितलं.

तरी बर्थडे सेलेब्रेशन करायचं होतंच. त्यातून मुंबई टाइम्स कार्निवल ही आयडिया सुचली. एक चित्ररथ करायचा, आठ दिवस वेगवेगळ्या कॉलेजांत, वस्त्यांत न्यायचा, त्यावर गेम, बक्षिसं ठेवायची अशी कल्पना. सुनील गोरे यांनी त्यासाठीचा सर्व खर्च वितरण विभाग करेल, असं जाहीर केलं... आणि मग आठ दिवस मुंबईभर हा कार्निवल गाजतवाजत राहिला. कार्निवलची घोषणा होती 'वाचा आणि नाचा'. ब्राझिलियन कार्निवल डान्सरचा फोटो असल्यानं अनेकांना मोठाच सांस्कृतिक धक्का (cultural shock) बसला. मात्र या कार्निवलमुळे मुंटा मराठी घरांत ओळखीचा, परिचयाचा झाला. मग सेलिब्रेटिंग श्रावण झालं. मुंटाच्या महिलांच्या पिकनिकला तर ८०० च्या वर महिला यायच्या, धमाल करायच्या. श्रावण क्वीन स्पर्धेत शेकडो कॉलेज तरुणी सहभागी व्हायच्या.

नवरात्रीच्या काळात देवीच्या नऊ वेगवेगळ्या साड्या असतात. त्यांचे रंग आधीच ठरलेले असतात. ते रंग आधी छापू आणि त्या रंगाच्या साड्या नेसायला महिलांना सांगू, असं राऊत म्हणाले. त्याची अनेकांनी खिल्ली उडवली, पण मुंटाच्या सर्वांना ती खूपच आवडली. तुम्ही त्या रंगाची साडी नेसा आणि ग्रुप फोटो पाठवा, असं आवाहन केलं गेलं. प्रतिसाद मिळेल का, की आयडिया फसेल ही भीती होती. परंतु पहिल्या दिवशीच ऑफिसला येताना ठरावीक रंगाची साडी नेसलेल्या महिलांचे जथ्थे ठिकठिकाणी दिसले. पहिल्या दिवशी चारशेहून अधिक फोटो आले. रोजच्या रोज ते वाढत होते, बँका, मंत्रालय, महापालिका, खासगी कार्यालयं, शाळा येथील कर्मचारी आणि कॉलेजमधील मुली यांच्या फोटोंचा खच पडू लागला. निवडता निवडता वेड लागायचं. कित्येक जणी वशिला लावायच्या फोटो छापावा म्हणून.

मुंटामुळे मटाचा मासकडे प्रवास नीट सुरू असल्याची ही उदाहरणं होती. कार्निव्हलच्या काळात चित्ररथ ठाण्यात फारसा फिरला नाही, अशी तक्रार होती ठाणेकरांची. मग 'सेलिब्रेट ठाणे' करायचं ठरवलं. तीन दिवस कार्यक्रम. तलावपाळीवर मुंटाचा एक आणि त्यापाठोपाठ महापालिका, जिल्हापरिषद, पोस्ट ऑफिस, पोलीस यांचे चित्ररथ रविवारी सकाळी फिरत होते. हजारो ठाणेकर हा नवा प्रकार पाहायला उभे. जिल्हापरिषद, महापालिका, पोलीस यांच्या तुलनेत मुंटाचा चित्ररथ खूपच वाईट होता. त्यासाठी बजेटच नव्हतं. तरीही फायदा मुंटालाच मिळाला. एके पहाटे पावसाळी गीतांचा कार्यक्रम ठेवला टिप टॉप प्लाझामध्ये. लोक येतील का ही भीती, पण हॉल भरून गेला. रात्री त्याच हॉलमध्ये तरुण पोरा-पोरींसाठी जॅम सेशन ठेवलं. मुंबईहून डीजे आले. हॉल खच्चून भरला होता. ठाण्यात एकही पब, डिस्को नसल्यानं ही आयडिया आली होती.

काही आयडिया राऊत यांच्या, काही माझ्या, काही टोकेकरच्या, तर काही टीम मेंबरच्या असत. सार्वजनिक गणेशदर्शन स्पर्धा टीव्ही चॅनेल व काही वृत्तपत्रं भरवतात. त्यामुळे घरगुती गणेशदर्शन स्पर्धा घ्यायचं ठरवलं. तुम्ही घरातील गणेशमूर्ती व आरास यांचे फोटो पाठवा, त्यातील निवडक प्रसिद्ध करू. नंतर





**कार्निव्हलचे कार्यक्रम मैदानात असोत की हॉलमध्ये कॉलेजचे तरुण-तरुणी यांची गर्दी हमखास ठरलेली**




**विमेन्स डे आऊट...पिकनिक म्हटलं की ८०० महिला, मुली येत आणि टेन्शन विसरून धमाल करत**

प्रसिद्ध झालेल्या फोटोंपैकी १०-१५ ना बक्षिसं. त्यासाठीही शेकडो फोटो यायचे. इथेही लोक वशिला लावायचे.

मुंटाइतके इव्हेंट अन्य कोणीही घेतल्याचं आठवत नाही. सगळे सहकारी जणू इव्हेंट मॅनेजमेंटचाच भाग होते. 'म.टा. सन्मान'मध्येही सर्वांचा सहभाग असे. सहकाऱ्यांतील मस्ती जिवंत ठेवण्यासाठी ऑफिसमध्ये चॉकलेट डे, फ्रेंडशिप डे, शँडेलिअर डे, लॉलीपॉप डे, रोज डे होत. अमुक दिवशी सर्वांनी अमुक रंगाचा टॉप घालायचा असं ठरवलं जाई, दर रविवारी आपसात पैसे जमवून हॉटेलात एकत्र जेवण असं बरंच काही चाले.


मुंटाला सुरुवातीला शिव्या देणारे पुढे तोंडभरून कौतुक करू लागले. मटाचा खप तर प्रचंड वेगानं वाढला. व्यवस्थापन अर्थातच खुश होतं. पुढील कार्निवल व सर्व इव्हेंट्सना मोठमोठे प्रायोजक मिळू लागले. इव्हेंटच्या खर्चापेक्षा अधिक रक्कम कंपनीला मिळू लागली. मुंटाचा प्रयोग यशस्वी झाल्याचं सर्वच मान्य करू लागले. मी पाच-सहा वर्षं हे काम केलं. मग पुन्हा जबाबदारी आली मुख्य अंकाची. मात्र मुंटानं प्रचंड समाधान दिलं आणि तो सुरू करण्याचं उद्दिष्टही सफल झालं. मुंबईत मटा नंबर वन झाला आणि मासपर्यंत पाहोचला.

पुढे राऊत खासदार झाले, मीही मटा सोडला. मुंबईत 'पुढारी'त गेलो. तिथेही मुंबईच्या गरजेनुसार अंकाचं डिझाइन तयार केलं, ते क्लिक झालं. त्यानंतर काही काळानं 'सकाळ'. आता सहा वर्षं 'लोकमत'मध्ये. लोकमतमुळे खऱ्या अर्थानं महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील वाचक समजण्यास मदत झाली. हाही मास पेपर. सर्व वर्गांत वाचला जाणारा. मटातून मुंटाद्वारे जो प्रवास सुरू झाला, तो आजही सुरू आहे.

**– संजीव साबडे**
संपादक, लोकमत
भ्रमणध्वनी : +९१ ८८८८४३३७१
sanjeevsabade1@gmail.com

ग्रंथाली


*Shoots & Roots*
***Genes matter the most***
by



**Dr. Hema Purandarey**
**(Content Writer : Ujjwala Gokhale)**

**Price : Rs. 400**
**Discount : Rs. 300**

**सोलो**
**सोनाली लोहार**




**ललितलेखसंग्रह**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत १०० रु.**



# ऑनलाइनच्या जगात वृत्तपत्रांना बदलावे लागेल

**अशोक पानवलकर**

**'महाराष्ट्र** टाइम्स'चे संपादकपद माझ्याकडे आले ते २००८मध्ये. हंगामी स्वरूपात. शिवसेनेची खासदारकी मिळाल्याने आधीचे संपादक भारतकुमार राऊत यांनी संपादकपदाचा राजीनामा दिल्याने व्यवस्थापन दुसऱ्या संपादकांच्या शोधात होते. मी तेव्हा वरिष्ठ सहसंपादक म्हणून काम करत होतो. ''नवीन संपादक शोधण्याचे काम चालू आहे, तोपर्यंत तुम्ही 'महाराष्ट्र टाइम्स'चे काम पाहाल काय, असे मला व्यवस्थापनातर्फे विचारण्यात आले. ही विचारणा माझ्यासाठी पूर्णतः अनपेक्षित होती. तरी मी ती स्वीकारली. पुढे काही महिन्यांनी मलाच अधिकृतपणे संपादक नेमण्यात आले. हंगामी संपादक असतानाही 'महाराष्ट्र टाइम्स' कसा निघावा, त्यात काय असावे याबद्दल मी काही विचार केला होता. 'महाराष्ट्र टाइम्स' कोणत्याही एका राजकीय पक्षाचे मुखपत्र होऊ नये हे ठरवले होतेच; शिवाय वर्तमानपत्र अधिकाधिक वाचकाभिमुख असले पाहिजे असेही ठरवले होते. त्यादृष्टीने पुढची वाटचाल सुरू झाली.

**केवळ कोरोनामुळे नव्हे तर अवघे जग ऑनलाइन होत असल्याने वृत्तपत्रांना बदलावे लागेल. वाचक आपल्याशी कसा 'कनेक्टड' राहील हे बघावे लागेल. भाषिक वर्तमानपत्रांमध्ये अजूनही पानांची संख्या मर्यादित असल्याने या पानांमध्ये वाचकाच्या रोजच्या आयुष्याशी निगडित बातम्या असायला हव्यात. सगळा मजकूर ऑनलाइन न देता वाचक प्रत्यक्षात वर्तमानपत्र खरेदी करेल असे पाहिले पाहिजे.**

त्यावेळी 'महाराष्ट्र टाइम्स'मधील अगदी तरुण सहकाऱ्यांची मी एक बैठक घेतली होती. पहिल्या अंकापासून 'महाराष्ट्र टाइम्स' वाचणारे वाचक आपल्याला यापुढेही हवेतच, परंतु त्याचवेळी बदलत्या काळानुसार नवा, तरुण वाचक कसा मिळेल याकडेही लक्ष द्यायला हवे, त्यामुळे तुम्हा तरुणांना 'महाराष्ट्र टाइम्स' कसा हवा, काही वर्षे आधीच इंग्रजीतून शालेय शिक्षण घेण्यास सुरुवात केलेल्या पिढीला हे वर्तमानपत्र कसे हवे हे विचारण्यासाठी ही बैठक होती. त्यात खूप चांगल्या सूचना करण्यात आल्या. त्यांनी सुचवल्यानुसार पुढे अनेक नवनवीन पाने सुरू करण्यात आली. माझ्या विचाराने काही पाने सुरू झाली. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये उत्पादनातील तांत्रिक बदल आधीच झाले होते. अंक संपूर्ण रंगीत झाला होता, कागद उत्तम असल्याने आणि अंकाची मांडणी, बातम्या, लेख, रविवार पुरवणी वगैरे उत्तम होती. आता गरज होती ती नवीन पिढीला जोडून घेण्याची. बातमी लिहिण्यापासून ते मांडणीपर्यंतची बदलाची ही प्रक्रिया भारतकुमार राऊत संपादक असतानाच सुरू झाली होती. या प्रक्रियेला वेग आला एवढेच.

'महाराष्ट्र टाइम्स' मुंबईत सुरू झाला १८ जून १९६२ रोजी. परंतु दुसऱ्या शहरात आवृत्ती निघायला २०११ साल उजाडले. वर्तमानपत्रांच्या जगात भाषिक वाचक फार महत्त्वाचा आहे. मग भाषा कोणतीही असो. महाराष्ट्रात विविध शहरांत 'महाराष्ट्र टाइम्स'च्या आवृत्त्या काढल्या तर अधिक लोकांपर्यंत जाईल (आणि अर्थात मोठा व्यावसायिक फायदा होईल) या विचाराने २०१०च्या सुमारास 'महाराष्ट्र टाइम्स'चा विस्तार करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार पुणे (७ जानेवारी २०११), नाशिक (८ जून २०११), औरंगाबाद (९ डिसेंबर २०११), नागपूर (१२ जून २०१२) , कोल्हापूर (२३ ऑगस्ट २०१२), जळगाव (२० ऑगस्ट २०१३) आणि अहमदनगर (२१ नोव्हेंबर २०१३) अशा आवृत्त्या सुरू करण्यात आल्या. संपादक म्हणून तो एक वेगळा अनुभव होता. या निमित्त या शहरांचा अभ्यास झाला, तेथील वर्तमानपत्रे, वाचक याविषयी जाणून घेता आले. या नव्या आवृत्त्यांमध्ये खूप चांगले सहकारी मिळाले आणि त्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'चा फॉर्म्युला आपल्या शहराच्या गरजेनुसार वापरून 'महाराष्ट्र टाइम्स'ला आकार दिला. हा सगळा अनुभव खूपच सुखद होता. प्रत्येक आवृत्तीच्या शहरांत आधी इतर महत्त्वाची दैनिके होतीच, परंतु तरीही तेथील वाचकांनी

'महाराष्ट्र टाइम्स'ला स्वीकारले हे महत्त्वाचे आहे. सर्वच आवृत्त्या चांगल्या निघत होत्या. मी पुणे आणि नागपूर या दोन आवृत्त्यांचा विशेष उल्लेख करीन. गेल्या वर्षभरात कोरोनाने सगळाच आर्थिक गाडा बिघडल्याने यापैकी काही आवृत्त्या बंद कराव्या लागल्या, हे दुर्दैवच म्हणायला हवे.

कोणतेही वर्तमानपत्र वाचकाभिमुख हवे हा अलिखित नियम असला तरी वर्तमानपत्र, त्यातही भाषिक वर्तमानपत्र काढण्यात अनेक अडचणी असतात. कमी पाने, कमी साधनसंपदा, कमी पत्रकार सहकारी, व्यवस्थापनाच्या याबाबतच्या मर्यादित भूमिका अशी अनेक बंधने असतात. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या विस्तारास व्यवस्थापनाने अधिक सुविधा दिल्या असल्या तरी जी काही बंधने होती ती पाळून सर्व सहकाऱ्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स' काढला. अनेक नवे उपक्रम सुरू करण्यात आले, आधीपासून सुरू असलेले अधिक चांगल्या पद्धतीने सादर झाले. 'मटा सन्मान', 'श्रावण क्वीन', 'मुंबई टाइम्स कार्निव्हल', 'नवरंग' हे सारे उपक्रम चालूच होते, त्यात आवश्यक ते बदल करून अधिक चांगल्या स्वरूपात वाचकांसमोर आले. २६ जानेवारीला आधीच्या वर्षभरात काही वेगळे काम करणाऱ्या सामान्य माणसांना पुरस्कार देण्याचा उपक्रम सुरू करताना मला खूप समाधान मिळाले. 'सिटीझन रिपोर्टर' (वाचक वार्ताहर) यासारखी कल्पना टाइम्स समूहातील 'विजय कर्नाटक' या कन्नड वर्तमानपत्राकडून घेतली (त्यांचे स्वरूप वेगळे होते) आणि वाचकांनी ही कल्पना उचलून धरली. शहरातील समस्या मांडून 'महाराष्ट्र टाइम्स'च्या माध्यमातून त्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न झाला. त्यातील बहुतांश समस्या सुटल्या, त्याचे कौतुकही वाचकांनी केले. हा उपक्रम अधिक मोठा व्हायला हवा, असे वाटते.

'महाराष्ट्र टाइम्स'ला अतिथी संपादक ही कल्पना नवीन नाही, वेगवेगळ्या दिवसांच्या निमित्ताने विविध क्षेत्रांतील नामवंत अतिथी संपादक म्हणून येऊन गेले. रविवारच्या 'मैफल' पुरवणीत मर्यादित पानांमुळे फार मजकूर देता आला नाही. ही कसर भरून काढण्यासाठी दर रविवारी बातम्यांऐवजी विश्लेषणपर लेख देण्यास सुरुवात केली. बातम्यांमध्ये दोनअडीचशे शब्दांत सगळे सांगता येत नाही. त्याचेच विस्तारित रूप म्हणजे हे विश्लेषणपर लेख. सुरू केले तेव्हा त्यात नावीन्य होते, आता बऱ्याच वृत्तपत्रांनी त्याचा कित्ता गिरवला आहे.

'टाइम्स' समूहातर्फे एका उपक्रमाअंतर्गत सर्व भाषिक (हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, कन्नड) वर्तमानपत्रांसाठी एक विशेष मोहीम सुरू करण्यात आली होती. 'वाट स्वच्छ आरोग्याची', 'माझे शहर', यांसारख्या विशिष्ट मालिका सुरू करण्यात आल्या. 'वाट स्वच्छ आरोग्याची' मालिका स्त्रियांची पाळी, त्यांचे आरोग्याचे प्रश्न, सॅनिटरी नॅपकिनची गरज या विषयांवर होती. तिचा परिणाम एवढा झाला की सरकारला याबाबत आपले धोरण बदलावे लागले होते. त्यांनी सॅनिटरी नॅपकिनवरचा कर काढून टाकला. या मालिकेची दखल सरकारला घ्यावी लागली. या विषयांच्या सगळ्या मालिका म्हणजे वाचकाभिमुख पत्रकारितेचा उत्तम प्रकार होता.

तरुणवर्गाची ओढ ऑनलाइनकडे असल्याने कोरोनापूर्व काळातही फेसबुक लाइव्हसारखे उपक्रम राबवण्यात आले. विशेषतः निवडणुकीच्या काळात विविध पक्षांच्या नेत्यांच्या मुलाखती याद्वारे वाचकांपर्यंत नेण्यात आल्या. मनोरंजन, क्रीडा आदी क्षेत्रांतले अनेक लोक फेसबुक लाइव्हद्वारे वाचकांपर्यंत नेण्यात आले. 'उद्याच्या अंकातील बातम्या आज थोडक्यात देण्यासाठी' वाचकांसाठी काही आवृत्त्यांद्वारे रोज 'फेसबुक लाइव्ह' करण्यात येते. 'महाराष्ट्र टाइम्स'चा हा उपक्रम आता सर्वच वर्तमानपत्रे कमीअधिक प्रमाणात वापरत आहेत. अनेक बाबतींत 'महाराष्ट्र टाइम्स' 'ट्रेंड सेटर ' ठरला आहे हे आवर्जून सांगायला हवे.

सगळ्या उपक्रमांपैकी मला अधिक भावलेला उपक्रम म्हणजे 'मटा हेल्पलाईन.' दहावीत उत्तम गुण मिळवलेल्या परंतु आर्थिक गरिबीमुळे पुढे शिकण्यास असमर्थ असणाऱ्या विद्यार्थ्यांना 'महाराष्ट्र टाइम्स'च्या वाचकांनी आर्थिक मदतीचा हात दिला. ज्यांचे शिक्षण कायमचे सुटणार होते ते आज डॉक्टर, इंजिनीयर, व्यावसायिक झाले आहेत. सुरुवातीला मुंबईपुरता असणारा उपक्रम 'महाराष्ट्र टाइम्स'च्या प्रत्येक आवृत्तीत सुरू करण्यात आला. अवघ्या तीन विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही 'हेल्पलाइन' गेल्या तेरा वर्षांत शेकडो विद्यार्थ्यांना 'पुनर्जन्म' देत राहिली. या उपक्रमातील एखादा विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी पदवीधर अथवा पदव्युत्तर शिक्षण घेऊन उत्तीर्ण होतो, त्यांना चांगली नोकरी लागते तेव्हा मिळणारे समाधान अमर्याद असते. हा उपक्रम वर्तमानपत्राने सुरू करावा का असा प्रश्न खरे म्हणजे उपस्थित होता कामा नये. 'महाराष्ट्र टाइम्स' वाचकाभिमुख असण्याचे दुसरे चांगले उदाहरण असू शकत नाही. २००८मध्ये तीन विद्यार्थ्यांना 'महाराष्ट्र टाइम्स'च्या वाचकांनी २१ लाख रुपये मिळवून दिले होते. २०१८ मध्ये (सर्व आवृत्त्यांचा मिळून) हा आकडा सव्वाचार कोटींवर पोचला. दहावीचा निकाल लागला की या उपक्रमाची सगळे वाचक वाट पाहत असतात. 'महाराष्ट्र टाइम्स'चे वाचकच या मुलांबाबत शिफारशी करतात. त्यातून मुले निवडली जातात. हे सारे श्रेय 'महाराष्ट्र टाइम्स'वर विश्वास ठेवणाऱ्या वाचकांचे.

माझ्या काळात 'महाराष्ट्र टाइम्स'बद्दल काही आक्षेप घेण्यात आले. बातम्या अथवा लेखांमध्ये इंग्रजी भाषेचा वापर हा आक्षेप राऊतांच्या काळापासूनच घेतला गेला होता. त्यावर त्यांनी वेळोवेळी उत्तरही दिले होते. नवीन पिढी वर्तमानपत्र वाचत नाही असा आक्षेप घेण्यात येतो. तो काही अंशी खरा आहे. परंतु या पिढीला मराठी वर्तमानपत्र वाचण्याकडे आकृष्ट करायचे असेल तर वर्तमानपत्राची भाषा त्याला किंवा तिला समजण्यासारखी असावी या हेतूने इंग्रजी शब्दांचा वापर करण्यात आला. त्यांचा अतिरेक होता कामा नये, अगदी आवश्यक तेथेच ते असायला हवेत, हे एकदम मान्य. परंतु, इंग्रजी शब्दच वापरायचे नाहीत असे म्हणणे चुकीचे वाटते. प्रत्येकवेळी कठीण मराठी शब्दच वापरायचा अट्टहास कशासाठी? आज जवळपास सर्वच मराठी वर्तमानपत्रांमध्ये इंग्रजी शब्दांचा वापर होतो आहे हे नाकारून चालणार नाही. 'महाराष्ट्र टाइम्स'ला टोमणे

मारताना, 'महाराष्ट्र टाइम्स' बघण्यासारखा असतो, वाचण्यासारखा नाही, असा आक्षेप घेतला गेला. त्यात पोटदुखीच जास्त असते असे वाटते.

माझ्या काळात 'महाराष्ट्र टाइम्स'वर घेतलेला दुसरा आक्षेप म्हणजे मी कोणत्याही राजकीय पक्षाची भूमिका घेतली नाही, कायम तटस्थ राहिलो. मला असे वाटते की वर्तमानपत्रात असा तटस्थपणा असलाच पाहिजे. एखाद्या विशिष्ट पक्षाला सतत झोडतच राहायचे आणि काही पक्षांना मात्र सतत जवळ करायचे असे मी कधी केले नाही. किंबहुना सगळ्या राजकीय बातम्यांमध्ये वाचकांना काडीचाही रस नसतो, असे माझे मत आहे. अगदी मोठ्या घडामोडी असतील, सत्ताबदल असेल तर भाग वेगळा. त्या बातम्या वाचक आवर्जून वाचतात. परंतु रोजच्या रोज वर्तमानपत्रामध्ये राजकीय नेत्यांच्या बातमीचा रतीब घालू नये, असे मला वाटते. सामान्य माणसाला मुळात राजकारणी व राजकारण याबद्दल चीड असते. त्याच्या आयुष्याशी निगडित बातम्या देण्याचे काम स्वतः अनोळखी राहून करत राहिले पाहिजे, असे मला वाटते. सध्या जगभरात मीडिया तटस्थ असावा का, त्याने एखादी ठाम भूमिका घेऊन अंक काढावा का याबद्दल दोन टोकांची मतमतांतरे आहेत. काहींच्या मते कोणत्याही मीडियाने ठाम राजकीय भूमिका घेऊनच आपले काम केले पाहिजे, तर काहींना अजिबात तसे वाटत नाही. यावर चर्चा होणे गरजेचे आहे.

'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये जवळपास सात वर्षे **दर** रविवारी 'तरंग' लिहिताना माझी हीच भूमिका होती. राजकीय विषयांऐवजी वाचकाशी निगडित विषय मी जास्त घेतले. संपादकीय पान अथवा पुरवण्या यात वाचकाला महत्त्वाचे वाटतील असे विषय जास्त घेतले. संपादकीय पानांवर नवनवीन लेखकांनी लिहायला हवे, स्वतःच्या गोतावळ्यातील लेखकांपुरते मर्यादित राहायला नको, अशी माझी भूमिका होती. सोमवार ते शनिवार असे सहा दिवस वेगवेगळ्या तज्ज्ञांचे वेगवेगळ्या विषयांवरचे लेख संपादकीय पानावर यावेत अशी वाचकाची अपेक्षा असते. म्हणूनच वारंवार तीच ती लेखकांची नावे येऊ नयेत हा माझा आग्रह असायचा. यातून माझ्याविषयी अनेकांचे गैरसमज झाले (अथवा पसरवले गेले) याबद्दल मला अजिबात वाईट वाटत नाही.

'महाराष्ट्र टाइम्स'मधून गोविंदराव तळवलकर निवृत्त झाले तेव्हा व्यवस्थापन 'महाराष्ट्र टाइम्स' बंद करणार अशी चर्चा होती. त्यात तथ्य होते की नाही मला माहीत नाही, परंतु 'महाराष्ट्र टाइम्स' चालू राहिला. एवढेच नव्हे तर तो माझ्या कारकिर्दीत विस्तारलाही. तळवलकर यांच्यानंतर कुमार केतकर आले. त्यांच्या ध्येयधोरणानुसार त्यांनी तो चालवला. केतकर यांच्या राजीनाम्यानंतर भारतकुमार राऊत यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये अनेक बदल करून अंक बदलून टाकला. केतकर उघडपणे काँग्रेसचे पुरस्कर्ते तर राऊत शिवसेनेचे. त्यांच्या काळाच्या 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये त्याचे प्रतिबिंब उमटले. मी ६ जानेवारी २०२० रोजी संपादक म्हणून निवृत्त झालो. मला जवळपास बारा वर्षे संपादक म्हणून काम करता आले. ती वर्षे माझ्या कुवतीनुसार आणि तटस्थतेच्या भावनेने काढली. फक्त मुंबई आवृत्ती ते आठ आवृत्त्या, वेगवेगळी वाचकाभिमुख सदरे/उपक्रम असे सर्व सहकाऱ्यांच्या, विशेषतः तरुण व नानाविध कल्पना मनात असणाऱ्या व त्या साकार करून दाखवणाऱ्या सहकाऱ्यांच्या मदतीने काम करता आले, याचे समाधान आहे.

'महाराष्ट्र टाइम्स' इतकी वर्षे मुंबईत पहिल्या क्रमांकावर राहिला, पुण्यात 'सकाळ'सारखा तगडा प्रतिस्पर्धी असतानाही उत्तम चालला, नागपूरमध्ये समोर 'लोकमत' भक्कम उभा असताना 'महाराष्ट्र टाइम्स'ने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. कोल्हापूर आवृत्तीनेही दर्जेदार अंक दिला. याचे समाधान आहे. याचे श्रेय अर्थात ती-ती आवृत्ती समर्थपणे हाताळणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे. द्वा.भ. कर्णिक यांच्यापासून आतापर्यंत सगळ्या संपादकांचे वेगवेगळे वैशिष्ट्य होते. मी माझ्या मर्यादा ओळखून, त्यात राहून सगळी मार्गक्रमणा केली. ती मला तरी निश्चितपणे समाधान देऊ गेली, एवढे मी नक्की सांगू शकतो.

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत काही वाचकांनी मुद्रित आवृत्ती घरी घेण्यापेक्षा 'महाराष्ट्र टाइम्स'सह अनेक वृत्तपत्रे ऑनलाइन वाचणे पसंत केले. कोरोनाच्या अगदी पहिल्या दिवसांत वृत्तपत्र वितरणावर बंदी होती, म्हणून त्यांना पर्याय नव्हता. परंतु वितरण सुरू झाल्यावरही सगळ्यांनी रोज नियमित येणारी सगळी वर्तमानपत्रे परत सुरू केली असे नाही. आधी घरी चार वर्तमानपत्रे येत असली तर आता कदाचित दोनच घेतात, असे अनेक घरांमध्ये झाले. आवडीचे वृत्तपत्र ऑनलाइन वाचणे चालू ठेवल्याने त्या वाचकाची त्या वृत्तपत्राशी आधी जुळलेली नाळ तुटली नाही, हे खरे. तरी अनेक वृत्तपत्रांचा खप कमी झालाच. केवळ कोरोनामुळे नव्हे तर अवघे जग ऑनलाइन होत असल्याने वृत्तपत्रांना बदलावे लागेल. वाचक आपल्याशी कसा 'कनेक्टड' राहील हे बघावे लागेल. भाषिक वर्तमानपत्रांमध्ये अजूनही पानांची संख्या मर्यादित असल्याने या पानांमध्ये वाचकाच्या रोजच्या आयुष्याशी निगडित बातम्या असायला हव्यात. सगळा मजकूर ऑनलाइन न देता वाचक प्रत्यक्षात वर्तमानपत्र खरेदी करेल असे पाहिले पाहिजे. वाचकाला गैरलागू बातम्या आणि लेख देत राहिले तर कोणत्याही वर्तमानपत्राचा वाचक तुटेल. शिक्षण, नोकरी हे आजच्या काळातले ज्वलंत प्रश्न आहेत. असंख्य वेबसाइट्स याबद्दल माहिती देत असल्या तरी वर्तमानपत्रावर वाचकाचा अजूनही विश्वास आहे. विविध वयोगटांतील स्त्री-पुरुषांच्या गरजा वेगवेगळ्या आहेत. एकच, तेही मर्यादित पानांचे वर्तमानपत्र सगळ्यांच्या गरजा एकाचवेळी भागवू शकेल असे नाही, परंतु मर्यादित पानांमध्ये बातम्यांची निवड चांगली असल्यास ही कसर काही प्रमाणात भरून काढता येईल. जे वर्तमानपत्र वाचकाशी सतत संवाद साधत राहील, त्याच्या आशाआकांक्षाना समजून घेऊन मजकूर देईल तेच वर्तमानपत्र चालेल. अन्यथा वाचक अधिक प्रमाणातवर ऑनलाइनकडे वळेल.


येथे प्रश्न पैशांचा नाही. ऑनलाइन आवृत्त्यांमध्ये अधिक

चांगला कन्टेन्ट वाचायला वाचक अधिक पैसे मोजायला तयार आहे. या ऑनलाइन विश्वात अजून वृत्तपत्रांना अपेक्षित पैसा त्यातून मिळत नसला तरी असा वेगळा वाचक हळूहळू तयार होत आहे हे नाकारून चालणार नाही. मुद्रित वर्तमानपत्राला असे करता येत नाही. वाचक मुद्रित माध्यमातून ऑनलाइनकडे जाण्याचे तेही एक कारण आहे. वाचकाला आज बातमी कळायला वेळ लागत नाही. वृत्तपत्रांचीच अनेक ॲप्स ती बातमी वाचकापर्यंत काही सेकंदांत पोचवतात. वाचक ऑनलाइनकडे जातात ते त्यांना त्या बातमीबद्दल विश्लेषणात्मक आणि वेगळे काही वाचायला मिळते म्हणून. मुद्रित वर्तमानपत्रांनाही हा विचार करावा लागेल. आपण वेगळे काय देतो, देत नसल्यास काय द्यावे लागेल याचा विचार करावा लागेल.

वाचकांचा मुद्रित वर्तमानपत्रांवर विश्वास असल्याने ऑनलाइनच्या त्सुनामीतही आणखी वर्षभराने वर्तमानपत्रे पूर्वीच्या सुस्थितीत येतील असा मला विश्वास वाटतो. मात्र तेव्हा या वर्तमानपत्रांना आतापेक्षा थोडा वेगळा कन्टेन्ट द्यायला शिकावे लागेल. अन्यथा तोपर्यंत ऑनलाइन वाचनाची चांगलीच सवय लागली असेल. ती सोडवणे सोपे नाही. कोरोना येण्यापूर्वी दोन महिने मी निवृत्त झालो, त्यामुळे या साऱ्या समस्यांशी प्रत्यक्ष सामना करायची वेळ आली नाही. गेल्या दीडदोन वर्षांत वर्तमानपत्राबाहेर असूनही जे आकलन झाले ते येथे मांडले आहे. बऱ्याच वर्तमानपत्रांमध्ये अनेक तरुण पत्रकार चांगले काम करत आहेत. जुनेजाणते पत्रकारही आहेतच. सगळे मिळून वृत्तपत्रसृष्टीला पुन्हा चांगले दिवस आणतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

**– अशोक पानवलकर**
भ्रमणध्वनी : +९१ ९९८७७८२३४५
ashok.panvalkar@gmail.com

॥ग्रंथाली॥





## प्राजक्तप्रभा

**प्राजक्ता माळी**

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

प्राजक्ता यांच्या कवितांबद्दल एक काव्यरसिक म्हणून मला विशेष उत्सुकता वाटली, कारण अभिनय आणि नृत्य या क्षेत्रांत रसिकप्रियता मिळवणाऱ्या प्राजक्तासारख्या अभिनेत्रीस कविता का बरे लिहावीशी वाटते? रंगभूषा, प्रकाशझोत, संहिता, रसिकांचे प्रेम या जत्रेपलीकडेही कलावंताला मन असते; अंतर्मन असते; त्या मौनाची अक्षरे होत कविता प्रकट होते. कविता ही एक कधीच साथ न सोडणारी जिवलग सखी असते. प्राजक्ता यांनी कविता ह्या सखीचे बोट धरून कधी उमलू पाहणारी प्रीती, कधी त्या पथावरील अनपेक्षित आघात, कधी एकाकीपण व्यक्त करीत; जीवनावरील उदंड प्रेम व्यक्त केले आहे.

**– प्रवीण दवणे**




## लाजवाब

**ज्योती दाते**

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २४० रु.**

हे संपूर्ण आयुष्य म्हणजे एक मैफलच आहे असे समजूनच रवी दाते जगले, आयुष्याचा आनंद पुरेपूर लुटला व जवळच्यांना मुक्तहस्ताने वाटला. आपण एक लाजवाब आयुष्य जगलो याची रवी दातेंना जाणीव होती व सार्थ अभिमानही होता. कोणत्याही आवडलेल्या गोष्टीस, अगदी चविष्ट पदार्थापासून उत्तम संगीतापर्यंत, प्रत्येक वेळी हे 'लाजवाब' अशी मनापासून दाद देत असत. रवी दाते यांना पाहणारा, भेटणारा, कलागुणांचा–गुणग्राहक रसिकतेचा अनुभव घेणारा त्यांच्याबद्दल 'लाजवाब!' असेच उद्गार काढत असणार अशी मला तरी खात्री आहे. अशा व्यक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण आठवणींच्या या पुस्तकाला 'लाजवाब' याशिवाय दुसरे नाव असूच शकत नाही.



# म.टा.ने दिले अगणित धन्यतेचे क्षण

**नीला उपाध्ये**

**कथाकार** व्यंकटेश माडगूळकर यांची 'जांभळाचे दिवस' ही कथा इतकी सुरेख आहे की कोणीही, 'कुठलेही दिवस'-असा विषय काढला, तर ती कथा आठवतेच! पौगंडावस्थेतील नवथर प्रेमाची चाहूल लागलेल्या एका मुलाची गोष्ट सांगणाऱ्या त्या कथेचे शेवटचे वाक्यही असेच कायम लक्षात राहणारे होते - 'जांभळाचे ते दिवस खूप लवकर संपले!'

गेल्या महिन्यात 'शब्द रुची'चा मराठी रंगभूमीवरील एक अप्रतिम संग्राह्य विशेषांक काढणारी ग्रंथाली, येता विशेषांक दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स'च्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त काढत आहे, असे जेव्हा 'शब्द रुची'चे सहसंपादक धनंजय गांगल यांच्याकडून कळले तेव्हा, सुखद आश्चर्याचा धक्का बसला. १९६२ साली सुरू झालेल्या मटातील पहिली स्त्री पत्रकार या अधिकाराने त्या विशेषांकासाठी मी लिहावे, या त्यांच्या सूचनेचा अवमान करायचा तर प्रश्नच नव्हता.

**फिनिश्ड प्रॉडक्ट ऑफ मटा**

प्रभात चित्र मंडळाविषयी लिहिताना मी म्हटले होते- 'आय ॲम ए फिनिश्ड प्रॉडक्ट ऑफ प्रभात चित्रमंडळ!' तसेच म.टा.विषयीही म्हणू शकते - 'आय ॲम ए फिनिश्ड प्रॉडक्ट ऑफ म.टा.' मात्र 'जांभळाचे दिवस खूप लवकर संपले!'प्रमाणे मटातील दिवसांविषयी मी बोलू शकणार नाही! कारण, २१ जानेवारी १९७० रोजी एक प्रशिक्षणार्थी पत्रकार म्हणून मटात दाखल झाल्यापासून, निवृत्त होईपर्यंत तब्बल ३६ वर्षे मी मटात कार्यरत होते.

पदार्पणाबरोबरच मी लक्षणीय ठरले कारण, म.टा. सुरू झाल्यापासून, तेथे तब्बल आठ वर्षांनंतर केवळ शैक्षणिक वाङ्मयीन गुणवत्तेवर स्वीकारलेली मी पहिलीच स्त्री होते! तोवर अनेक नामवंत भगिनींनी तेथे प्रवेश करायचे खूप प्रयत्न केले होते. परंतु 'पत्रकारिता हा केवळ पुरुषांचाच व्यवसाय आहे, तेथे बायकांना प्रवेश नाहीच' असे पुरोगामी मटाकारांचे तेव्हा अघोषित धोरण होते! माझ्या सुदैवाने दोन वर्षे आधी टाइम्स ग्रुपने 'प्रशिक्षणार्थी पत्रकार' योजना जाहीर केली होती. तशी ती होती म्हणूनच इतर मागास समाजापैकी एका कनिष्ठ मध्यमवर्गीय घरातील 'नीला पाटील'ची निवड केवळ शैक्षणिक गुणवत्तेच्या बळावर, 'महाराष्ट्र टाइम्स'साठी होऊ शकली होती!

> **माझ्या सुदैवाने दि.वि. गोखले यांच्यासारखी उदारमनस्क व्यक्ती तेव्हा मटाची वृत्तसंपादक होती, तर प्रमुख वार्ताहरपदी चंद्रकांत ताम्हाणे यांच्यासारखी साक्षेपी समंजस व्यक्ती होती! मराठी मुली वार्ताहराचे पुरुषी काम करूच शकणार नाहीत, असे मानले जाण्याच्या त्या काळात, पुरुषांपेक्षा स्त्रिया या अधिक उत्कट, अनुभवक्षम व कष्टाळू असतात. त्यामुळे खास स्त्रियांचे म्हणून मानले जाणारे विषय वृत्तपत्रातून नीट 'कव्हर' व्हायचे असतील तर प्रत्येक वृत्तपत्राच्या वार्ताहरचमूत एक तरी स्त्री असलीच पाहिजे, असे मानणारे ते दोन दूरदर्शी पत्रकार होते!**

**दूरदर्शी गोखले-ताम्हाणे**

पत्रकारितेच्या प्राथमिक प्रशिक्षणानंतर, टाइम्सचे ट्रेनिंग ऑफिसर पतंजली सेठी यांनी, प्रत्यक्ष कार्यानुभवासाठी मला महाराष्ट्र टाइम्सच्या संपादकीय विभागात पाठवले. माझ्या सुदैवाने दि.वि. गोखले यांच्यासारखी उदारमनस्क व्यक्ती तेव्हा मटाची वृत्तसंपादक होती, तर प्रमुख वार्ताहरपदी चंद्रकांत ताम्हाणे यांच्यासारखी साक्षेपी समंजस व्यक्ती होती! मराठी मुली वार्ताहराचे पुरुषी काम करूच शकणार नाहीत, असे मानले जाण्याच्या त्या काळात, पुरुषांपेक्षा स्त्रिया या अधिक उत्कट, अनुभवक्षम व कष्टाळू असतात. त्यामुळे खास स्त्रियांचे म्हणून मानले जाणारे विषय वृत्तपत्रातून नीट 'कव्हर' व्हायचे असतील तर प्रत्येक वृत्तपत्राच्या वार्ताहरचमूत एक तरी स्त्री असलीच पाहिजे, असे मानणारे ते दोन दूरदर्शी पत्रकार होते!

आमचे कुटुंबस्नेही-कथाकार अरविंद गोखलेकाकांनी पत्रकार

व्हायची प्रेरणा दिल्यामुळे, प्राध्यापकीचे जुने स्वप्न नजरेआड करून, मंत्रालयातील असिस्टंटची नोकरी करता-करता, पत्रकारिता शिकण्यासाठी, वाटेवरच्या सिद्धार्थ जनसंज्ञापन महाविद्यालयात संध्याकाळच्या इंग्रजी पत्रकारितावर्गात तेव्हा मी प्रवेश जरूर घेतला होता, पण वर्गात इंग्रजीतून शिकलेली 'थिअरी' मराठीतून वृत्तलेखन करताना वापरताना, तारेवरची कसरतच वाटायची! त्या सुरुवातीच्या काळात ताम्हाणे यांनी मला माझ्या कैक बातम्यांच्या कॉप्या अनेकदा 'रिराइट' करायला लावल्या होत्या! नंतरच्या ३६ वर्षांच्या पत्रकारितेत स्थानिक/राष्ट्रीय स्तरावरचे अक्षरश: तीन-साडेतीन डझन मोठमोठे पुरस्कार उत्कृष्ट वार्तांकनासाठी मला मिळाले. ते विनम्रपणे स्वीकारताना, त्या पुनर्लिखित कॉप्या आठवत, प्रत्येक वेळी मनोमन माझ्या या दोन गुरूंना मी वंदन करत आलेय. ...कळले तुम्हाला मी स्वत:ला 'फिनिश्ड प्रॉडक्ट ऑफ मटा' का म्हणवते ते...

**मुलींची वाढती संख्या**

आता मात्र वृत्तपत्र व्यवसायात हौसेने येणाऱ्या तरुण, होतकरू मुलींचे प्रमाण वाढत आहे. मराठी मुली पुरुषी मानले गेलेले वार्ताहराचे काम पुरुषांइतकेच किंबहुना त्यांच्यापेक्षा कांकणभर सरसच करू शकतात, हे एक तप झगडून मी सिद्ध केले, म्हणूनच १९८२ नंतर अनेक मराठी वृत्तपत्रांतून मुलींना वार्ताहर म्हणून स्वीकारले जाऊ लागले, हा मराठी पत्रकारितेचा सत्य इतिहास आहे! तशात १९९०च्या सुमारास इलेक्ट्रॉनिक माध्यमाने जोरात मुसंडी मारली तेव्हा अँकरिंगसाठी मुलींना मोठ्या प्रमाणावर संधी मिळू लागली. अन् १९९५ नंतर तर दृक्‌श्राव्य तसेच मुद्रित माध्यमांत मुलींना मुक्तद्वारच मिळाले आहे.

ज्या मटात शिरण्यासाठी १९७० साली अवघड लेखी परीक्षा, डबल-ट्रिपल तोंडी मुलाखती असे सव्यापसव्य स्वत:ची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी मला करावे लागले होते, तेथे आता तब्बल अकरा मुली जबाबदारीने पत्रकारिता करत आहेत. पराग करंदीकर-श्रीकांत बोजेवार या तरुण, व्यासंगी गुणग्राही संपादक द्वयीमुळे गरवारेतील आमच्या पत्रकारितेच्या वर्गातून उत्तीर्ण झालेले नीरज पंडित, रमेश खोकराळे यांसारखे कितीतरी विद्यार्थी तेथे विविध मोक्याच्या पदांवर जबाबदारीने काम करत आहेत... आमचा वारसा पुढे चालवत आहेत! शैक्षणिक वर्षाच्या अखेरीला गरवारेच्या विद्यार्थ्यांना कार्यानुभवासाठी पाठवायची वेळ येते, तेव्हा सर्वोत्तम विद्यार्थ्यांना म.टा.मध्येच 'प्लेसमेंट' आमच्याकडून अभावितपणे दिली जात असते... कारण मनोमन मला एक ठाऊक असते - हे सारे कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी केवळ मला माझ्या मटामुळेच मिळाली आहे.

**गोखलेकृत आदर्श वृत्तमांडणी**

मी सारखा 'माझा मटा... माझा मटा' म्हणतेय कारण मटा सुरू झाल्यापासून मी त्याची वाचक आहे. खरे तर, 'मटा'च्या तेरा वर्षे आधी एक्स्प्रेस वृत्तसमूहाने 'लोकसत्ता' सुरू केला होता. त्यामुळे ते दैनिक त्या काळी 'सर्वाधिक खपाचे वृत्तपत्र' म्हणूनचे बिरूद अभिमानाने मिरवत होते! परंतु मटाला दि.वि. गोखलेंच्या कल्पकतेचा 'मिडास टच' लाभला होता! मटाचे पहिले संपादक द्वा.भ. कर्णिक, सहसंपादक गोविंदराव तळवलकर यांनी दूरदृष्टीने तेव्हा 'नवशक्ती'त वृत्तसंपादक असलेल्या दि.वि. गोखले यांना 'मटा'त वृत्तसंपादक म्हणून ओढून घेतले होते. कारण मराठी वृत्तपत्र परिपूर्ण व्हावे, याचा ध्यास घेतलेले दि.वि. या नव्या वृत्तपत्राची घडी नेमकी बसवतील, याचा विश्वास त्यांना होता! अन् गोखले यांनी आपले काम इतके चोख बजावले होते की लवकरच 'लार्जेस्ट सर्क्युलेटिंग न्यूजपेपर' (सर्वाधिक खपाचे वृत्तपत्र) म्हणून तोवर प्रस्थापित झालेल्या 'लोकसत्ता'ला मागे टाकून, 'इम्पॅक्ट पेपर' (प्रभावशाली वृत्तपत्त) म्हणून मटाची दखल घेणे मंत्रालयातील राजकारण्यांपासून घरोघरच्या सर्वसामान्य चोखंदळ वाचकांना भाग पडले होते...

तशी म.टा.ची सगळीच टीम तेव्हा उत्तम होती! गोखले-ताम्हाणे यांखेरीज मा.पं. शिखरे, रा.के. लेले, पंढरीनाथ रेगे, रा.मा. पै, शंकर सारडा, चित्तरंजन पंडित - अशा अनेकानेक नामवंत पत्रकारांची मांदियाळीच होती ती. मराठी पत्रकारितेत क्रीडा, अर्थव्यवहार या विषयांना स्वतंत्र पाने देऊन, विषयवार व्यवस्थित पृष्ठमांडणी करून म.टा.ला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त करून देण्याचे मोठेच श्रेय निर्विवादपणे वृत्तसंपादक गोखले यांचे होते! उगाच नाही, बघता-बघता सगळ्याच मराठी वृत्तपत्रांनी या 'गोखले-पृष्ठमांडणी पॅटर्न'चा अंगीकार करून कात टाकली...

**धावते जग**

तळवलकरांच्या अग्रलेखांइतकेच आकर्षण वाचकांना अग्रलेखाच्या पानावरील 'धावते जग' या संपादकीय स्फुट-सदराचे असायचे! खरे ते सदर निनावी असायचे. मात्र अभिनव विषयनिवड, प्रसन्न शैली, सोपी-रसाळ भाषा या गुणांमुळे हे 'जग' गोखले यांनीच लिहिलेले आहे, हे वाचक ओळखायचेच! कारण गोखले यांना खेळांपासून चित्रपटांपर्यंत, साहित्यापासून संगीतापर्यंत विविध विषयांत रुची होती, काही विषयांत तर विशेष गतीही होती! त्यामुळे ते संपादकीय स्फुट सदर अग्रलेखाच्या पानाचे एक विशेष आकर्षण ठरले होते!

**पत्रव्यवहाराला प्रतिष्ठा**

आपल्या या 'वडीलधाऱ्या सहकाऱ्या'ने म.टा.ला दिलेल्या विशेष लक्षणीय योगदानाबाबत डॉ. अरुण टिकेकरांनी लिहून ठेवलेले अत्यंत मौलिक आहे. 'पत्रकार दि.वि. गोखले, व्यक्तित्व व कर्तृत्व'साठी भूतपूर्व सहसंपादक डॉ. टिकेकरांनी लिहून ठेवले आहे - 'हे लक्षणीय योगदान म्हणजे, वाचकांच्या पत्रव्यवहाराला मानाच्या अग्रलेखाच्या पानावर सन्मानपूर्वक स्थान देऊन, त्या पत्रव्यवहाराला गोखले यांनी मिळवून दिलेली उचित प्रतिष्ठा!' वास्तविक, वाचकांचा पत्रव्यवहार हे वृत्तपत्राचे बलस्थान असते.

अर्थात, ती पत्रे तक्रारी-गाऱ्हाणी-तगादा या प्रकारची नसावीत, तर वृत्तपत्रात जे-जे छापून आले, त्यावर भाष्य करणारी, दुसरी विरोधी बाजू मांडणारी, सकस गमतीशीर, शैलीदार, उपरोधिक, मोजकी माहिती पुरवणारी, चुका दाखवणारी अशा प्रकारची ती पत्रे असली तर, त्यांना ताबडतोब वाचकवर्ग लाभतोच. किंबहुना, कित्येक सुजाण वाचक अग्रलेख पान वाचनाची सुरुवात वाचकांच्या पत्रव्यवहारानेच करतात! 'लोकमानस' प्रकट करणाऱ्या या पत्रव्यवहाराचा समाजावर ईप्सित परिणामही होतो... गोखले यांनी म.टा.चा वाचक-पत्रव्यवहार काळजीपूर्वक वाढवला, वाचनीय केला. ते करताना कित्येक पत्रे ते संपादित करायचे, पुन्हा लिहून काढायचे... आधी वृत्तसंपादक, त्यानंतर आणीबाणीविरोधी सत्याग्रहाबद्दल कारावास भोगून सुटल्यावर सहसंपादक म्हणून मटात सेवा बजावल्यावर गोखले १९८५ साली निवृत्त झाल्यावर 'धावते जग' बंद पडले; त्यांनी पाक-चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर लिहिले तसे सकस युद्धभाष्यलेख बंद पडले - पण 'बहुतांचि अंतरे' अद्याप मटाच्या संपादकीय पृष्ठावरच दिमाखात प्रसिद्ध होत असत - विशेष म्हणजे, सर्वच मोठ्या मराठी दैनिकांनी तो पत्रव्यवहाराचा म.टा.पॅटर्न आता कायमचा स्वीकारला आहे!

**लक्ष्मण यांचे कार्टून**

मटाचे आणखी एक मोठे आकर्षण होते, ते म्हणजे 'टाइम्स'चे ख्यातनाम व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्या 'यू सेड् इट्' या बॉक्स-कार्टूनचे मराठी रूपांतरण! त्या व्यंगचित्राखालच्या छोटेखानी भाष्यात खरे तर लक्ष्मण यांनी मारलेला तिरकस डंख असे! इंग्रजीतील ती मूळ खुमारी मराठी अनुवादात उतरवण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागायची आणि गोखले आळस न करता ती मेहनत रोज घ्यायचेच - अनुवाद करायची तांत्रिक जबाबदारी अन्य कुणाहीवर असली तरी! असे फारच थोडे दिवस असतील, की गोखलेना तो भाष्यअनुवाद बदलावा लागला नव्हता.

विशेष म्हणजे, कामात एवढे 'पर्फेक्शनिस्ट' असूनही, स्टाफवरील अगदी प्रेसकामगार, शिपायांपासून संपादकांपर्यंत सर्व सहकाऱ्यांना बरोबर घेऊन काम करण्याची विलक्षण हातोटी गोखलेंकडे होती! कुठलीही क्रीडास्पर्धा सुरू असू दे - गोखले कोणाशीही दहा रुपयांची पैज लावायचे. दहा रुपयांत टाइम्ससमोरच्या भेळवाल्याकडून भरपूर सुकी भेळ यायची त्या काळी! आमच्या भोसले-पेडणेकरांनी आणलेल्या त्या भेळीचा ढीग वार्ताहर विभागातील मधल्या मोठ्या टेबलावर पसरलेल्या वृत्तपत्रांवर ओतला, की आम्ही सर्व जण त्या सुक्या भेळेवर तुटून पडायचो...

मटात लागल्यावर, 'प्रोबेशन पिरियड'मध्येच माझ्याकडून वार्तांकनात एक मोठी घोडचूक झाली होती. त्या दिवशी ताम्हाणे-गोखले दिवसभर कार्यालयात नव्हते. संध्याकाळी आल्यावर मुसमुसत काम करत बसलेल्या मला हसवायला, गोखले यांनी आमच्या नरेंद्र बल्लाळांकडून चितारून घेतलेली 'अश्रूंची झाली फुले'ची स्माईली, भेळेच्या ढिगाशेजारी उभी केली आणि रडणाऱ्या मला हसवले होते. हसवता-हसवतानाच गंभीरपणे पत्रकारितेचा एक महत्त्वाचा धडाही त्यांनी मला शिकवला होता, ''बाई, चूक झाली, याबद्दल तुम्हाला वाईट वाटतंय, हे चांगलं लक्षण आहे! पण या चुकीपासून एक धडा घ्यायचा-पुन:श्च वाचून तपासल्याशिवाय कधीही कॉपी प्रेसला सोडायची नाही! एखाद्या शब्दाबद्दल खात्री नसेल, तो तपासून घेण्याइतपत उसंत नसेल तर, तो शब्द कॉपीत टाळायचा. 'व्हेन इन् डाउट, लिव्ह आउट' हे वर्गात शिकला असाल ना?'' एका भेळेवर शिकलेला तो धडा कायमचा लक्षात राहिला! गेल्या ५१ वर्षांच्या पत्रकारितेत माझ्या हातून कधी अशुद्धलेखनाचीही चूक झाली नाही...

**'चित्रपश्चिमा'कार**

किती-किती प्रकारे गोखले यांनी माझ्या पत्रकारितेला पैलू पाडले! ही मुलगी उत्कृष्ट ललित गद्य लिहू शकते आणि हिला चित्रपटांची आवडही आहे, हे लक्षात आल्यावर त्यांनी मला प्रभात चित्र मंडळाची सदस्य बनून जागतिक सिनेमा बघण्याचा सल्ला दिला. प्रा. निस्सिम रझिकेल टाइम्सशेजारच्या जे.जे. आर्ट स्कूलमध्ये चालवायचे तो अल्पमुदतीचा चित्रपटरसग्रहण अभ्यासक्रम पूर्ण करण्याची प्रेरणा (नि कार्यालयीन सवलत!) दिली. त्यामुळे अन्य कुठल्याही प्रतिस्पर्धी मराठी दैनिकात तेव्हा चालू नसलेले 'चित्रपश्चिमा' हे विदेशी चित्रपट समीक्षेचे लोकप्रिय सदर लिहिणाऱ्या अशोक जैन यांची, विशेष प्रतिनिधी म्हणून दिल्लीला बदली होताच, ते सदर मी विनासायास एक तप सांभाळून शकले. त्यातून मला 'चित्रपश्चिमा'कार म्हणून आणखी एक नवी ओळख मिळू शकली, केंद्र सरकारच्या फिल्म सेन्सॉर, बोर्डावर सदस्य म्हणून आठ वर्षे काम करता आहे आणि ज्यांची शताब्दी आपण नुकतीच साजरी केली, त्या सत्यजित रायबाबूंवरील मराठीतील 'रुपेरी पडद्यांचा कवी' हे पहिले चरित्रही माझ्या हातून लिहून झाले! (त्यानंतर कोणतीही अनुकूलता नसतानाही, माझी चौदा पुस्तके प्रकाशित झाली. येत्या १० जानेवारी २०२२ला तर माझे आगऱ्यांच्या इतिहासावरले इंग्रजी पुस्तक छत्रपती शिवाजीमहाराज वस्तुसंग्रहालय प्रकाशित करत आहे - हे सारे झाले नि होतेय कारण, 'प्रत्येक पत्रकाराने आठवड्याला किमान तीन तरी पुस्तके वाचलीच पाहिजेत आणि वर्षाला किमान एक तरी पुस्तक लिहिलेच पाहिजे' हा आमचे गुरू दि.वि. गोखले यांनी घालून दिलेला दंडक!)

**'मूकं करोति वाचालम्'चा चमत्कार**

गोखले यांनी मला नुसती पुस्तके लिहायलाच नव्हे, तर जलद बोलण्याची बालपणापासूनची वाईट सवय टाकून, व्यासपीठ-वक्तृत्व जोपासून, वृत्तपत्रविद्येची अध्यापक म्हणूनही घडवले! त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांनी २५ वर्षांपूर्वी विद्यापीठाच्या गरवारे पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमाच्या समन्वयकपदाची जबाबदारी विश्वासाने माझ्यावर सोपवली, तेव्हा ती आत्मविश्वासाने मी स्वीकारू शकले आणि

आजतागायत ती निभावू शकले. 'मूकं करोति वाचालम्'चा अवघड चमत्कार करणाऱ्या गोखलेंमुळेच वयात आल्यापासून ज्यांना मी माझा आदर्श मानत आले, त्या विदुषी दुर्गाबाई भागवत यांचा इतका लोभ मला लाभला, की माझ्या मधुराच्या वाढदिवशी स्वहस्ते बनवलेला देखणा बाळंतविडा त्यांनी खास सौ. सिंधुताईंच्या हस्ते पाठवला होता! विशेष पत्रकारितेबद्दल त्या ३६ वर्षांत मिळालेल्या अडीच-तीन डझन सन्मान-पुरस्कारांपेक्षा, दुर्गाबाईंनी पाठवलेला तो बाळंतविडाच मला सर्वात मोलाचा सन्मान आजही वाटतो!

सभोवारच्या सामाजिक परिस्थितीबद्दल अत्यंत संवेदनशील असलेल्या वयोवृद्ध दुर्गाबाई तेव्हा ऊठसूट मटामध्ये गोखले यांच्याकडे येत असत. काहीही विशेष घडले की त्यावर बाईंची झणझणीत प्रतिक्रिया पत्ररूपाने उमटायचीच! नऊवारी नेसलेल्या दुर्गाबाईंचा प्रवेश मटा-संपादकीय विभागात होताच, गोखले कौतुकाने सहकाऱ्यांना म्हणायचे, ''झालंऽऽ! ही बघा आली महाराष्ट्राची अँग्री यंग वुमन! आज कुणावर बॉम्ब फुटतोय, देव जाणे!' गोखले-ताम्हाणे यांना एक चांगली सवय होती - मटात कुणीही महनीय व्यक्ती आली, की ती दोघेही आपल्या नवागत सहकाऱ्याची त्या मान्यवरांशी ओळख करून देत असत! मी मटात लागल्यावर दुर्गाबाई प्रथम मटात आल्या तेव्हा, गोखलेंनी मुद्दाम मला बोलावून दुर्गाबाईंशी माझा परिचय करून दिला होता, त्यातून त्यांचा व्यक्तिश: लोभ लाभण्याचे भाग्य मला शेवटपर्यंत लाभले! - अशाप्रकारे सर्व मान्यवरांसाठी मटा तेव्हा खास आकर्षणकेंद्र होते!

**'मामा'पणही निभावले...**

सगळ्याच सहकाऱ्यांचे हितचिंतक-पालक म्हणून जबाबदारी स्वयंस्फूर्तपणे निभावणाऱ्या गोखले यांनी, व्यवस्थापनाकडे आपले वजन वापरून रदबदली करून अनवलीकर यांची नोकरी कशी वाचवली होती, हे मी प्रत्यक्ष बघितले होते! १४ ऑक्टोबर १९७५ रोजी एका छोटेखानी समारंभात मी वसंतरावांशी विवाहबद्ध झाले तेव्हा, लेखनासाठी नोकरीत खंड पाडून पुण्याला राहायला गेलेले, कर्करोगग्रस्त गोखले आमचा निरोप मिळताच, अंगात तापाची कणकण असतानाही, आमच्या लग्नाला प्रत्यक्ष आशीर्वाद द्यायला आले होते. इतकेच नव्हे, तर माझ्या आईच्या विनंतीवरून वधूला विवाहवेदीपर्यंत आणण्याची मामाची जबाबदारीही त्यांनी निभावली होती - कारण तो आणीबाणीचा काळ होता आणि अलिबागचे पाटीलबंधू म्हणून सुप्रसिद्ध शेकापनेते असलेले माझे दोन्ही मामा तेव्हा कारावासात होते! बुद्धिमंत पण माणुसकीशून्य बहाद्दरांपेक्षा, समाजाहितासाठी आपल्या लेखणीचे पावित्र्य जिवाच्या आकांताने जपलेल्या गोखले यांच्यासारखी सत्प्रवृत्त माणसेच मला आदर्श वाटतात...


**पालक ताम्हाणे नि इतर -**

पक्का 'न्यूजसेन्स', घड्याळाच्या काट्याकडे न बघता बातमी मिळवण्यासाठी जीव पाखडायची वृत्ती आणि ती बातमी नेमक्या शब्दांत आकर्षक रूपात वाचकांसाठी लिहायची हातोटी - हे वार्ताहर म्हणून माझे गुण उमजलेल्या प्रमुख वार्ताहर ताम्हाणे यांनी तर, नोकरीला लागल्यालागल्या विधिमंडळ समालोचन आणि पुढे रीतसर मंत्रालय 'बीट' ही मला दिले. त्यामुळे वार्ताहराचे पूर्णवेळ काम करणारी पहिली मराठी महिला ठरण्याबरोबरच, पहिली राजकीय महिला-वार्ताहर ठरण्याचा मानही मला मिळाला. ताम्हणेंबरोबरच वि.ना. देवधर, गो.आ. भट, अशोक आचार्य विश्वास डिग्गीकर, जॉन कोलॅसो या वार्ताहर-सहकाऱ्यांनी, रविवार पुरवणीचे दिनकर गांगल-भालचंद्र वैद्य, पूर्वसंपादक कुमार केतकर, भारतकुमार राऊत, सहसंपादक रा.के. लेले, वृत्तसंपादक (बालकथाकार) पंढरीनाथ रेगे, अ.स. मराठे, मनोहर देवधर, नरेंद्र बल्लाळ, पद्माकर कुलकर्णी, वा.य.गाडगीळ, यांसारख्या माझ्या सर्व ज्येष्ठ सहकाऱ्यांनी, तब्बल अठरा वर्षे स्टाफवर एकुलती एक राहिलेल्या माझ्यावर सख्ख्या मुलीप्रमाणे, धाकट्या बहिणीप्रमाणे प्रेम करून माझी सतत पाठराखण केली. त्यामुळे सर्वसामान्यपणे कनिष्ठ, मध्यमवर्गीय मुलीला टीव्हीव्यतिरिक्त कधी बघायलाही मिळणार नाही, असे कितीतरी मला प्रत्यक्ष अनुभवता आले.

स्वातंत्र्य उंबरठ्यावर ठेपले असता जन्मलेली मी. स्वातंत्र्यपूर्व काळातील ते रोमांचकारी जनजागरण गेल्या पिढीप्रमाणे आम्हाला अनुभवता आले नव्हते. परंतु लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या समग्र क्रांतीच्या चळवळीमुळे, आणीबाणीमध्ये एकजुटलेल्या भारतातील जनजागरण बघायला मिळण्याचे भाग्य मला लाभले! आजारी जेपींची शिवाजी पार्कवरील विराट सभा काय, किंवा आणीबाणीतील सेन्सॉरशिपविरुद्ध आग ओकणाऱ्या दुर्गाबाई भागवत यांची मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील ऐतिहासिक सभा काय; त्यांचे आव्हानात्मक वृत्तांत सेन्सॉरची कात्री सांभाळून, जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ प्रत्ययकारक देण्याची कसरत करताना जो आनंद मिळाला होता, तो अवर्णनीय होता! त्या साऱ्या उरस्फोडीची दखल घेऊन, माझी आवडती लेखिका ज्योत्स्ना देवधर हिने, एका लेखिका-संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात 'मराठी पत्रकारितेत 'नीला पाटील' ही एकमेव लक्षणीय महिला आहे' म्हणून जाहीर दाद दिली तेव्हा, अनुभवलेला कृतार्थतेचा क्षण... असे अगणित धन्यतेचे क्षण मटाने ३६ वर्षांत मला दिलेत...

माझ्या स्मृतीप्रमाणे १९६२ साली मटा सुरू झाला, तो दिवस वटपौर्णिमेचा होता! त्या दिवशी सुवासिनी 'हाच पती सात जन्म लाभावा म्हणून व्रत करतात. मला विश्वास आहे - मटाने ज्यांचे जीवन सावरले, ते माझ्यासारखे अगणित वाचक या षष्ट्यब्दीपूर्तीला मटाला प्रदीर्घ सेवेसाठी अशाच दीर्घायुष्याची शुभेच्छा देतील...

**- नीला (पाटील) उपाध्ये**
भ्रमणध्वनी : ७०२१३४६०३३
दूरध्वनी ०२२-२५२२१६८६



# ...ते सोनेरी दिवस

**दत्तात्रय पाडेकर**

**आजही** मला आठवतोय तो दिवस १९७२ मधला, ज्या सर जे.जे. उपयोजित कलामहाविद्यालयात एक विद्यार्थी म्हणून वावरलो, शिकलो त्याच विद्यालयाच्या पायर्या एक अध्यापक म्हणून चढत होतो. मन खूप आनंदून गेले होते. अध्यापनाच्या आनंदात पाच वर्षे कशी निघून गेली ते कळलेच नाही.

जे.जे.जवळच टाइम्स ऑफ इंडियाची इमारत होती. त्या इमारतीमध्ये खाली, जाता-येता छपाईचे काम पाहत असे. टाइम्स ऑफ इंडियाची अनेक दर्जेदार प्रकाशने होती- मासिके, साप्ताहिके, दैनिके. ती मी न्याहाळत असे. मुख्यत्वे त्यातील चित्रे. कारण चित्रकला हेच माझे क्षेत्र होते. सतत काहीतरी नवीन करण्याची, चित्रे काढण्याची मनात प्रचंड ओढ होती. मन आतुर होऊन टाइम्समध्ये अशी संधी मिळण्याची वाट पाहत होते आणि खरेच १९७७ साली मला ती संधी मिळाली.

टाइम्समध्ये 'इलस्ट्रेटर'ची जागा रिकामी झाली आणि माझी कलाविभागात 'इलस्ट्रेटर' म्हणून नेमणूक झाली.

जे.जे.ची सुरक्षित, सरकारी नोकरी सहजपणे सोडून मी उत्साहाने 'इलस्ट्रेटर' म्हणून टाइम्स ऑफ इंडियाच्या इमारतीमध्ये प्रवेश केला. खूप छान वाटत होते. खूप आनंद झाला होता- टाइम्सच्या कलाविभागात काम करण्याची संधी मिळाली म्हणून. माझ्या दृष्टीने टाइम्सचा कलाविभाग हा फार महत्त्वाचा होता. कोणत्याही प्रकाशनसंस्थेत एवढा मोठा कलाविभाग क्वचितच असेल. टाइम्सच्या दर्जेदार प्रकाशनांमध्ये कलाविभागाचा वाटा मोलाचा होता. या विभागात सुमारे चाळीस आर्टिस्टचा ताफा होता. त्यात इलस्ट्रेटर, लेटरिंग आर्टिस्ट, लेआउट आर्टिस्ट, पेस्टअप आर्टिस्ट, डिझायनर.. असे सर्व प्रकारचे आर्टिस्ट एका छत्राखाली होते. त्या वेळेस कम्प्युटर नव्हता. त्यामुळे सर्व आर्टवर्क हातानेच करावी लागत. टाइम्सच्या कलाविभागात उत्तमोत्तम 'इलस्ट्रेटर'ची एक उज्ज्वल परंपरा होती.

**मी मटामध्ये केलेली चित्रे ही नावीन्यपूर्ण आणि परिणामकारक वाटत होती. मुख्य म्हणजे चित्रे काढण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आम्हाला होते आणि त्यात कोणतेही बदल संपादकीय विभागाकडून सुचवले जात नसत. त्यामुळे मनाप्रमाणे चित्र काढण्याचा आनंद मिळायचा. मनात एकच विचार असायचा, की मी काढलेले प्रत्येक चित्र हे केवळ बोधचित्राच्या पातळीवर न राहता त्या चित्राचा अभिजात चित्र म्हणूनही सर्वांना आस्वाद घेता यावा. त्यात नावीन्य; सौंदर्य आणि कलात्मकता असावी, अशी माझी धारणा होती.**

बगदादोपोलस, के. निक्सन ब्लुन्डेल, लँगहॅमर, पी.जी. सिरूर, रवी परांजपे, प्रभाशंकर कवडी, मारिओ मिरांडा, वसंत सवाई, आर.के. लक्ष्मण - ही सारी नावे माझ्या डोळ्यांसमोर आली. श्यावक्ष चावडा, श्याम जोशी यांसारख्या अनेक चित्रकारांनी टाइम्सच्या अनेक प्रकाशनांसाठी 'फ्रीलान्स' कामे केली होती. त्यामुळे टाइम्सच्या प्रकाशनांना एक दर्जा प्राप्त झाला होता. 'म हाराष्ट्र टाइम्स' हे त्यातीलच एक दर्जेदार दैनिक. त्यातील रविवार पुरवणी महत्त्वाची. त्यातील लेख, कथा, कविता हे चित्रांनी आणि अक्षरांनी सजवलेले असायचे. हे सर्व काम कलाविभागातील चित्रकार करायचे. यात मुख्यत्वे शंतनू माळी, मुकुंद तळवलकर आणि मी बोधचित्रे (इलेस्ट्रेशन) करायचो आणि कमल शेडगे, सत्यनारायण वाडिशेरला, प्रदीप शेडगे, जयंत जोगळेकर हे लेटरिंग आणि लेआउट करायचे. टाइम्सच्या सर्व प्रकाशनांसाठी मी बोधचित्रे करत असे. त्यातही मटासाठी चित्र करणे माझ्यासाठी विशेष होते. कारण टाइम्सच्या अनेक प्रकाशनांमध्ये हे एकमेव मराठी प्रकाशन होते.

मटामध्ये मी केलेली बोधचित्रे ही वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यावेळी वर्तमानपत्राचा कागद म्हणजे न्यूजप्रिंट पेपर - अगदी साधा, पिवळसर आणि कमी प्रतीचा असायचा. त्यामुळे त्याच्यावर फक्त लाइन मिडियममध्ये केलेली चित्रे परिणामकारक



की मटातील चित्रांमुळेच माझी एक नवीन ओळख निर्माण झाली. टाइम्सचा कलाविभाग वेगळा होता. टाइम्सच्या सर्व मासिके, साप्ताहिके आणि दैनिकांच्या संपादकीय मंडळींशी माझा चांगला संबंध होता. त्यावेळी मटाचे संपादक गोविंद तळवलकर होते. मात्र त्यांच्याशी बोलण्याचा प्रसंग कधी आला नाही. त्यावेळी रविवारच्या पुरवणीचे काम भालचंद्र वैद्य आणि दिनकर गांगल हे पाहत असत. संपादकीय विभागात दि.वि. गोखले, अशोक जैन, मनोहर देवधर, जोजफ नरोन्हा, श्रीराम शिधये, प्रकाश अकोलकर, दिनू रणदिवे, नीला उपाध्ये आदी मंडळी होती. पानांची संख्या मर्यादित होती. जाहिरातींचा एवढा प्रचंड मारा नव्हता. मार्केटिंग'चे भूत निर्माण झाले नव्हते. वर्तमानपत्रांची

छापली जायची. हाफटोनमध्ये म्हणजे अनेक छटांची केलेली चित्रे परिणामकारक छापली जायची नाही. दुसरी गोष्ट चित्राचा आकार. चित्रे फार मोठी न करता शक्यतो ज्या आकारामध्ये छापायची त्याच आकारात मी करत असे. त्यामुळे छपाईनंतर त्याचा परिणाम मूळ चित्रासारखाच दिसत असे. न्यूजप्रिंट पेपरवर कोणत्या प्रकारच्या चित्राचा परिणाम चांगला येतो हे मला माहीत होते. मी छपाईचे तंत्रही समजून घेतले होते. कथा, कविता किंवा लेखासाठी चित्र कोणत्या आकारात – दोन कॉलम, तीन कॉलम वगैरे – हे संपादकीय विभागातून ठरलेले असायचे. ही जागेची मर्यादा असायची. त्यामुळे या सर्व बाबी लक्षात ठेवून चित्र करायला सोपे जात असे. या लाइन मिडियममध्ये मी अनेक प्रयोग केले. चित्रासाठी मी वेगवेगळ्या प्रकारचा कागद वापरला. अगदी न्यूजप्रिंट पेपरसुद्धा. तसेच, वेगवेगळ्या छटांसाठी स्क्रीनचा वापर केला. काही रेडिमेट स्क्रीन वापरले तर काही प्रोसेसिंग विभागाकडून मी तयार करवून घेतले. त्याचा परिणाम क्वार्टरटोनसारखा छान येत असे. फोटोग्राम, मोनोप्रिंट, स्क्रेपरबोर्ड आदी वेगवेगळ्या माध्यमांचाही वापर केला. त्यामुळे मी मटामध्ये केलेली चित्रे ही नावीन्यपूर्ण आणि परिणामकारक वाटत होती. मुख्य म्हणजे चित्रे काढण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आम्हाला होते आणि त्यात कोणतेही बदल संपादकीय विभागाकडून सुचवले जात नसत. त्यामुळे मनाप्रमाणे चित्र काढण्याचा आनंद मिळायचा. मनात एकच विचार असायचा, की मी काढलेले प्रत्येक चित्र हे केवळ बोधचित्राच्या पातळीवर न राहता त्या चित्राचा अभिजात चित्र म्हणूनही सर्वांना आस्वाद घेता यावा. त्यात नावीन्य; सौंदर्य आणि कलात्मकता असावी, अशी माझी धारणा होती. आणि त्यासाठी मी प्रयत्नशील असे. एक नक्की,



वाचकांशी बांधिलकी होती. वाचकांना नेहमी सकस, वैचारिक, दर्जेदार देण्याचा प्रयत्न असायचा. कार्टूनिस्ट आर.के. लक्ष्मण आणि श्याम जोशी यांचाही महत्त्वाचा सहभाग होता. मटाचा दर्जा प्राप्त करण्यामध्ये सर्व चित्रकारांचा महत्त्वाचा वाटा होता, असे मला वाटते. कारण वर्तमानपत्राचे दृश्य स्वरूपही फार महत्त्वाचे असते.

आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते, ती म्हणजे मटातील मनोहर देवधर यांनी मला मटामध्ये लिहिण्यासाठी प्रवृत्त केले. साधारण वर्षभर मी 'चित्र-शिल्प' हा चित्रप्रदर्शनांवर आधारित कॉलम लिहीत असे. त्यामध्ये मी माझी परखड मते मांडत होतो.

एकूणच टाइम्समधले माझे सोनेरी दिवस होते. चित्रनिर्मितीचा मी मनमुराद आनंद घेत होतो. टाइम्सच्या कलाविभागाचा तो सुवर्णकाळच होता. मटासाठी काम करणाऱ्या सर्वांनाच कलेचे, कलाविभागाचे आणि प्रकाशनांसाठी लागणारे दृश्यकलेचे महत्त्व माहीत होते.

टाइम्समध्ये १९८४ मध्ये अचानक महासंप सुरू झाला. टाइम्सने टाळेबंदी जाहीर केली. काही महिने टाइम्सची सर्व प्रकाशने बंद होती. पुढे हळूहळू दैनिकांसहित सर्व प्रकाशने सुरू झाली. सर्व कर्मचारीवर्ग कंपनीने घातलेल्या अटी आणि निर्बंधावर सह्या करून कामावर रूजू झाला. मी मात्र कामावर रूजू झालो नाही. व्यवस्थापनाची धोरणे आणि बंधने मला मान्य नव्हती. म्हणूनच मी





टाळेबंदी उठवल्यानंतरही कामावर रूजू झालो नाही. शेवटी १९८५ साली टाइम्सला राजीनामा सादर करून मी बाहेर पडलो.

काही दिवसांनी टाइम्सचा कलाविभागच कायमचा बंद करण्यात आल्याचे कळले. कलाविभागाच्या सर्व आर्टिस्टना वेगवेगळ्या प्रकाशनांना वाटून देण्यात आले. काहींना रिकामेच बसवून ठेवण्यात आले. कालांतराने अनेक प्रकाशने बंद करण्यात आली. प्रकाशनांमध्ये कलेचे महत्त्वही कळेनासे झाले. दर्जाबाबतची जागरूकताही राहिली नाही. हा एका सुवर्णकाळाचा अंत होता, असे मला वाटते.

काळाच्या ओघात माणसे बदलली. तांत्रिक गोष्टी बदलल्या. संगणक आला. छपाईतंत्र बदलले. सर्व रंगीत छपाई सुरू झाली. कागदही थोड्याफार प्रमाणात बदलला. एकूणच सर्व काही बदलले. बदल अपरिहार्य असेलही...

काहीही असो. माझ्यासारख्याला तो सुवर्णकाळच अधिक लोभस वाटला. मटाबाबत माझ्या मनात एक हळुवार, आपुलकीचा, जिव्हाळ्याचा छानसा कोपरा मात्र कायम घर करून राहिला!

**– दत्तात्रय पाडेकर**
भ्रमणध्वनी : +९१ ९०८२८३७३४०
dattapadekar@hotmail.com



# महाराष्ट्र टाइम्सच्या आठवणी

**अभिजित हेगशेट्ये**

**शालेय** जीवनापासूनच 'महाराष्ट्र टाइम्स' ह्या वृत्तपत्राचे एक विलक्षण आकर्षण होते. त्या काळात ते नक्की काय आहे, हे समजायचे नाही. देवरुखसारख्या कोकणातील एका खेडेगावात सायंकाळच्या मुंबई एसटीने हा पेपर यायचा आणि तो घेण्यासाठी एसटी स्टॅन्डवर गावातील बुद्धिवंत, प्राध्यापक, शिक्षक, सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, नेतेमंडळी त्याची अगदी चातकासारखी वाट पाहत राहायचे. नेहमीच उशीर होणारी गाडी एकदाची देवरुख बसडेपोत गेली की प्रथम 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पेपरचे पार्सल स्टॅन्डवरच्या पेपरस्टॉलवाल्याला दिले, की त्या पेपरवर जी काही वाचकांची झुंबड उडायची आणि पाहता पाहता या प्रती संपून जायच्या, हेच या विलक्षण आकर्षणाचे मुख्य कारण होते. महाविद्यालयीन जीवनात तर हे आकर्षण अधिकच वाढले होते. कारण महाराष्ट्र टाइम्स वाचणे हे जणू ज्ञानाचे प्रतीकच मानले जात होते. त्यातही महाराष्ट्र टाइम्सचा अग्रलेख हा बुद्धिजीवी वर्गातील विशेष चर्चेचा विषय असायचा आणि तो वाचलेला नसेल तर तो त्या वर्गात बसण्यास अपात्र, असाच जणू सामाजिक संकेत. उच्चविद्याविभूषित, उच्चवर्गाचे प्रतीक आणि प्रतिनिधित्व असाच मटाचा रुबाब होता.

**राजापूरनजीक धारतळे पॉवर स्टेशन उभारणीत त्या वेळच्या कार्यकारी अभियंत्यांनी लाखोंचा भ्रष्टाचार केला होता. या साऱ्याचे पुरावे गोळा करत त्यावर मी एक लेख लिहिला. त्यावेळी वृत्तसंपादक शिवाजी सावंत होते. त्यांनी तो दोन भागांत मटा अँकर स्टोरी 'प्रकाशगडात अंधार' या नावाने प्रसिद्ध केला आणि एकच हलचल उडाली होती.**

देवरुखसारख्या खेड्यातून मी रत्नागिरी गोगटे महाविद्यालयात जिल्ह्याच्या ठिकाणी आलो त्यावेळी जिल्ह्यात तर महाराष्ट्र टाइम्सचा दबदबा विलक्षणच डौलदार. म्हणजे आमच्या घरी महाराष्ट्र टाइम्स येतो हे जणू घरी चारचाकी असल्याच्या आविर्भावात लोक सांगत, अशी त्याला सन्मानाची प्रतिष्ठा होती. असेच एकदा मी एक मटाला लिहिले आणि ते मटात छापून आले. कॉलेजचे प्राचार्य बापू रानडे यांनी मला चक्क त्यांच्या केबिनमध्ये बोलावून माझे कौतुक केले आणि छान लिहिले आहेस अशी शाबासकी दिली. महाराष्ट्र टाइम्समध्ये जिल्ह्याची एखादी बातमी अगदी चुकून कधीतरी येत असे. मात्र त्याचा गवगवा फार मोठा असे. त्यातून या वृत्तपत्राबद्दलचे एक ग्लॅमर मनात रुंजी घालत राही.

सन १९८६ची घटना आहे. रत्नागिरी शहरालगत असणारे जुवे गाव चारही बाजूंनी ८० टक्के खाडीच्या पाण्याने वेढलेले एक अप्रतिम निसर्गसुंदर गाव. गणेशोत्सवात येथील गावकरी रत्नागिरी शहरातून गणपतीमूर्ती पारंपरिक पद्धतीने एकत्र मिरवणुकीने वाजत-गाजत नेत. ही मिरवणूक कर्ला ह्या मुस्लीम वस्ती असलेल्या गावावरून जाते. त्यावर्षी ह्या मिरवणुकीच्या जाण्याच्या मार्गावरून काही जणांनी वाद सुरू केला. काही जणांचे म्हणणे होते, मशिदीवरून जाताना गुलाल उधळू नका आणि वाद्ये मोठ्याने वाजवू नका. हा वाद इतका वाढला की प्रत्येक गट म्हणाला आम्हाला रोकणार कोण? आणि नेहमीपेक्षा कितीतरी पटीच्या आकारात ही मिरवणूक ढोल-ताशे यांच्या गजरात गुलालाची तुफानी उधळण करत निघाली. सोबत प्रचंड हेल्मेटधारी पोलीस बंदोबस्त. मशिदीच्या समोरील रस्त्यावर मिरवणूक अधिकच जोषात होती. सभोवती हेल्मेटधारी पोलीस बंदोबस्त आणि त्या अरुंद रस्त्यात सारी शेजारची घरे पूर्ण बंद झालेली, काही खिडक्यांच्या झरोक्यातून डोकावणारे घाबरलेले चेहरे, हे दृश्य इतके भीषण आणि भयावह वाटत होते, की मनातून पार हादरून गेलो होतो, अस्वस्थही होतो.

हे कोठेतरी मुंबईच्या वृत्तपत्रात यायलाच पाहिजे असे वाटत होते. दुसऱ्याच दिवशी मी मुंबईला आलो. मटाच याला न्याय देऊ शकेल असा विश्वास त्या पोरसवयात मनात होता. व्हीटी येथील टाइम्स ऑफ इंडियाच्या त्या ऐतिहासिक इमारतीत थेट शिरलो.

त्यावेळी आजच्यासारखी सिक्युरिटी नव्हती की गेटपास विचारत. चाचपडतच महाराष्ट्र टाइम्सच्या कार्यालयात गेलो. एवढ्या मोठ्या कार्यालयात गावातून थेट आल्याची धडधड मनात होती. कोणीच ओळखीचे आणि माहितीचे नव्हते. नेमका पोहोचलो त्या टेबलावर होते ते दिनू रणदिवे, नजरेनेच त्यांनी 'काय?' असे विचारले. आणि मी रत्नागिरीच्या गणेशमिरवणुकीची हकिगत सांगायला सुरुवात केली. त्यांनी मला थांबवले आणि त्यांच्या पुढच्या टेबलावर जायला सांगितले. ते गोरसे गृहस्थ होते दिनकर गांगल, त्यांनी समोरील कागदांवरून नजर वर करत, पुन्हा तसेच विचारले, 'काय?' आणि मी त्यांना सारी हकिगत सांगितली आणि म्हटले, हे मटात आले पाहिजे. रत्नागिरीत असे वातावरण यापूर्वी कधीच नव्हते. फार धोका वाटतो आहे. माझ्या सोबत मी अजय शेठ फोटोग्राफरकडून घेतलेला मशिदीसमोरील हेल्मेटधारी प्रचंड पोलीस बंदोबस्तातील गणपतीमिरवणुकीचा फोटोही होता. माझे शांतपणे त्यांनी ऐकून घेतले आणि मला रफ पेपरचा एक बंच हातात देत म्हणाले, इथे बस आणि तुला जे काही दिसले ते सगळे लिहून काढ. त्या मळकट रद्दी पेपरवर मी चार-पाच पाने लिहिली आणि मला एकदम रिते झाल्यासारखे वाटले. ती पाने त्यांच्या हाती दिली. त्यांनी ती वाचली आणि म्हणाले, तू जा, मी पाहतो. तिसऱ्या दिवशी पहिल्या पानावर माझ्या नावाने बातमी होती. 'रत्नागिरीच्या आकाशात धार्मिक ढग'! महाराष्ट्र टाइम्समध्ये पहिल्या पानावर पहिल्यांदाच आलेले माझे नाव आणि ती बातमी वाचून मी पार आश्चर्यचकित झालो.

दोन दिवसांनी रत्नागिरीला आलो. सकाळी मुंबई बसमधून उतरलो तर समोरच भाऊ सुर्वे (माजी नगराध्यक्ष) भेटले. म्हणाले, ''ढग कोसळले'' मी म्हटले काही समजले नाही. तर म्हणाले महाराष्ट्र टाइम्समध्ये तू लिहिलेस ना! ते कोसळले. आता पोलीस तुला शोधत आहेत. ह्या दंगलीची खबर ती होण्यापूर्वीच काही दिवस अगोदर तुला कशी लागली ती... माझ्या मटाच्या आणि आयुष्यातील पत्रकारितेची सुरुवात अशी झाली. या दंगलीचा रिपोर्ट मी पाठवावा असा मला फोन मटातून आला म्हणून मी काहीही अनुभव नसताना, १४४ कलम लागू असताना आणि पोलिसांना माझ्यावर भलताच काही संशय असताना आणि माझ्याकडे कोणत्याही पत्रकारितेचे अधिकृत कार्ड नसताना रिपोर्टिंग पाठवले. त्या काळात फॅक्स, टेलिग्राफ या सुविधा नव्हत्या, फोनही पोस्टात ट्रंककॉल लावून काही तास बसून करावे लागत. मी स्क्रिप्ट थेट एसटी स्टॅन्डवर घेऊन गेलो. मुंबईत जाणारा एक वकील मित्र होता. त्याला म्हटले, मटाच्या कार्यालयात पाठवायचे आहे. मुंबईत पोस्टात टाकतोस का? तर तो म्हणाला, काहीच चिंता करू नकोस, मी टॅक्सी करून मटाच्या कार्यालयात जातो. त्या निमित्ताने मला त्या कार्यालयात जाण्याची आणि ते पाहण्याची संधी मिळेल. तिसऱ्या दिवशी तो रिपोर्ट मटात प्रसिद्ध झाला. त्याच्यापूर्वीच येथील मुख्य वितरक बभूतमल शहा यांनी शहरभर थेट काळ्या फलकावर वार्तफलकच लावले की आजच्या मटामध्ये वाचा, 'रत्नागिरी दंगलीचा स्पेशल रिपोर्ट'. जोरदार आवाजात मटा विकणारा गजा सांगत होता, मटा पेपर लोक वाचत आणि पुन्हा विकत चक्क पाच रुपयाला. ब्लॅकने पेपर विकला गेल्याची या शहराच्या इतिहासातील ती पहिली घटना होती.

महाराष्ट्र टाइम्सची बातमी म्हणजे ती तंतोतंत खरीच असणार इतका प्रबळ विश्वास या पेपरबद्दल त्या काळात होता. तो काळ होता गोविंद तळवलकर यांचा. वृत्तपत्राची ओळख त्याच्या संपादकाच्या नावाने होत होती. बातम्यांच्या हेडिंगमध्ये बटबटीतपणा आणि भडकपणाला थारा नसे. ब्लॅक अ‍ॅन्ड व्हाईट फोटोग्राफीची जी कलात्मकता होती ती त्या काळात मटाला होती. बातम्यांची आणि त्यातील लेखांची निवड इतकी काटेकोरपणे होत असे की त्यातील प्रत्येक बातमी आणि त्यातील प्रत्येक ओळ अगदी ऱ्हस्वदीर्घासह बिनचूक असण्याकडे कटाक्ष असे. तळवलकर यांचे प्रचंड वाचन, व्यासंग आणि अफाट बौद्धिक प्रतिभा त्यांच्या अग्रलेखांतून प्रतिबिंबित होत असे. प्रादेशिक मराठी भाषेतील मटा हा राज्याच्या सीमा पार करत देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकारण, उद्योग, कला, संस्कृती, आंतरराष्ट्रीय संबंध यावर भाष्य करणारा आणि वैचारिक भूमिका मांडणारे वृत्तपत्र म्हणून एक मानदंड होता.

वृत्तसंपादक पुरुषोत्तम महाले यांनी मला बोलावले आणि मी रत्नागिरी जिल्ह्याचा वार्ताहर झालो. जिल्हा वार्ताहर म्हणजे अगदीच किरकोळ पद. धनाचा तर थांगपत्ताच नसे; मात्र मान मोठा होता. आपल्या परिसरातील अन्याय-अत्याचाराला तडाखा देण्याची, प्रसंगी त्यात सकारात्मक बदलाची ताकद या वृत्तपत्रात मोठी होती. रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे काँग्रेसचे मंत्री भाई सावंत हे अत्यंत लोकप्रिय आणि कार्यशील मंत्री होते. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात त्यांचा मोठा प्रभाव होता. कोकणच्या प्रश्नासाठी कोकणात मंत्रिमंडळ बैठक व्हावी आणि कोकणातील प्रश्नावर प्राधान्याने चर्चा होऊन त्याची सोडवणूक व्हावी त्यासाठी त्यांनी मंत्रिमंडळाची पहिली बैठक रत्नागिरी येथे घेतली होती. या दरम्यान रत्नागिरी शहरात तीव्र पाणीटंचाई होती. त्यावर महाराष्ट्र टाइम्समध्ये माझे 'मंत्रिमंडळ आले पाणी पिऊन गेले' हा रिपोर्ट फार गाजला आणि रत्नागिरीच्या पाणीटंचाईची दखल राज्याला प्राधान्याने घ्यावी लागली.

असाच किस्सा म.रा.वि.म.च्या लाखोच्या भ्रष्टाचाराचा होता. राजापूरनजीक धारतळे पॉवर स्टेशन उभारणीत त्या वेळच्या कार्यकारी अभियंत्यांनी लाखोंचा भ्रष्टाचार केला होता. या साऱ्याचे पुरावे गोळा करत त्यावर मी एक लेख लिहिला. त्यावेळी वृत्तसंपादक शिवाजी सावंत होते. त्यांनी तो दोन भागांत मटा अँकर स्टोरी 'प्रकाशगडात अंधार' या नावाने प्रसिद्ध केला आणि एकच हलचल उडाली होती. या वृत्ताची दखल संबंधित खात्याने इतक्या गांभीर्याने घेतली की प्रकाशगडात खळबळ उडाली. संबंधित अभियंत्याला तत्काळ निलंबित करत या प्रश्नाचा तपास लावला. एखाद्या प्रकरणाची महाराष्ट्र टाइम्सने दखल घेणे आणि त्यावर त्यात काही येणे हे फारच महत्त्वाचे असे, अशी त्याची विश्वासार्हता होती.

रत्नागिरीसारख्या कोकणातील एका छोट्या जिल्ह्यातून काम करताना, मटाने येथील प्रश्नांना समोर आणण्याची मोठी


संधी मला दिली होती. या माध्यमातून अगदी हेडलाइन, अँकर स्टोरी ते रविवार पुरवणीची कव्हर स्टोरी या बहुविध पानांवर काम करण्याची संधी मिळाली आणि त्याचवेळी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, संस्थात्मक, क्रीडा, लोककला, आदी विविध उपक्रमांना मटाच्या माध्यमातून कोकणला संधी मिळत राहिली. मटा हे मुंबईचे वृत्तपत्र असा समज असे. मात्र दर्जाबाबत कधीही तडजोड न करणाऱ्या मटाने कोकणच्या कन्येला छत्रपती पुरस्कार मिळाला तेव्हा मागील पानावर जागा देत तिचे कौतुक महाराष्ट्रासमोर केले. तर त्याचवेळी थीबा राजाची नात टूटूची दर्दभरी कहाणी तिच्या विलक्षण अनवट वाटेसह रंगीत फोटोंच्या माध्यमातून पूर्ण मागील पानातून व्यक्त करत साऱ्या महाराष्ट्राच्या पुरातत्त्व अभ्यासकांना रत्नागिरीला खेचून आणले. निवडणुकीच्या काळातील राजकीय विश्लेषणे हा तर मटाचा एक वैशिष्ट्यपूर्ण आणि तितकाच विश्वसनीय आविष्कार. जिल्ह्यातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचा धांडोळा आणि राजकीय आढावा हा तर राजकीय नेते आणि कार्यकर्ते अत्यंत विश्वनीय अंदाज मानत आणि आपल्या मतदारसंघाचा अंदाज मटात कधी येणार याची वाट पाहत असत. मटाच्या माध्यमातून ही संधी मला मिळाली. १९९१ मधील देशाच्या जागतिकीकरणाच्या निर्णयानंतर कोकणात दाभोळ येथे आलेली पहिली बहुराष्ट्रीय कंपनी एन्रॉनचे आगमन, आंदोलन, पुनरागमन यातील महाराष्ट्र टाइम्सचा सहभाग आणि भूमिका फार महत्त्वाची होती. वृत्तपत्र हे फक्त सत्य, अचूक आणि बित्तंबातमी आणि वृत्तांकन देण्यापुरते मर्यादित नाही, तर बातमीमागची बातमी, त्यामागच्या घडामोडी याचा आढावा घेतानाच संभाव्य परिणामांची नोंदही त्यांनी देणे आवश्यक, ही वैचारिक भूमिका ठामपणे घेत संपादकीय वाटचालीचा एक अभूतपूर्व इतिहास नोंदणारी भूमिका मटाने अनेक वेळा बजावली. वैचारिक आणि प्रबोधनात्मक सकारात्मक मार्गदर्शकाची भूमिका बजावली आहे.

मटासोबत जिल्हा वार्ताहार म्हणून काम करण्याचा एक दीर्घ अनुभव मला मिळाला. जिल्हा पातळीवरील एक बातमीदार म्हणून भूमिका निभावताना गोविंद तळवलकर ते भरतकुमार राऊत या बदलाचा साक्षीदार होण्याची संधी मिळाली होती. गोविंद तळवलकर यांच्यानंतर कुमार केतकर मटाचे संपादक झाले आणि एका उच्चतम बौद्धिक वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा मटा जणू हस्तिदंती मनोऱ्यातून बाहेर पडला. त्याला इंद्रधनुच्या विविध रंगांची स्वप्ने पडू लागली. मोठमोठ्या आर्टिकलच्या जागा अत्यंत आकर्षक आणि बोलक्या फोटोंनी घेत मटा अधिक फोटोजेनीक झाला. विविध क्षेत्रांना मटाच्या बातम्या आणि लेखांच्या विषयात संधी मिळाली. पुरवण्यांचे स्वरूप अधिक आकर्षक, रंगतदार आणि युवाप्रेमी झाले.

एक दिवस मटाने राज्यातील सर्व जिल्हा वार्ताहरांची बैठक टाइम्स ऑफ इंडियाच्या हॉलमध्ये आयोजित केली होती. कुमार केतकर मटातून जाणार आणि भरतकुमार राऊत नवे संपादक म्हणून येणार असा तो दिवस होता. वार्ताहरांसोबत मीटिंग चालू असतानाच गर्ग नावाचे वरिष्ठ अधिकारी आले. ते व्यवस्थापकीय प्रमुख होते. त्यांच्या हातात एक वृत्तपत्र होते. ते त्यांनी सर्वांना दाखवत सांगितले. हे फ्रान्सचे वृत्तपत्र आहे. ते वृत्तपत्र म्हणजे एक उभा मोठा कागद होता. तो पाहून प्रश्न पडला– हे वृत्तपत्र इतके छोटे. त्या काळात मटा खूप मोठ्या भारदस्त आकाराचा होता. गर्ग पुढे सांगत होते. जग बदलत आहे. यापुढच्या काळात महाराष्ट्र टाइम्स या आकारात छापला जाणार आहे. या आकारात वृत्तपत्र छापणारी मशिनरी विकसित झाली आहे. वृत्तपत्रांच्या व्यवसायीकरणाची सुरुवात असणारीच ती ऐतिहासिक मीटिंग होती. संपादक हाच वृत्तपत्राचा सर्वेसर्वा असतो असे तोपर्यंत वृत्तपत्राबाबत एक प्रमाण मत होते. मात्र त्याहीपेक्षा वृत्तपत्रातील व्यावहारिकता ही यापुढे महत्त्वाची राहणार आणि त्यावर अंकुश असणारा व्यवस्थापकीय संपादक वृत्तपत्राचे ध्येयधोरण ठरवणार हा संदेशच त्या मीटिंगमध्ये गर्ग यांनी दिला. त्यानंतर हे बदल इतक्या वेगाने घडले. मटा त्या बदलातही आघाडीवर होता. आज मटा खूपच व्यावसायिक झाल्याचे त्याच्या प्रत्येक पानातून दिसते. साठ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत मटा आपली रूपे बदलत गेला. मटाने अनेक पिढ्यांना त्यांच्या विविध उपक्रमांना एक विचारपीठ देतानाच, वैचारिक आणि प्रबोधनात्मक पातळीवर मार्गदर्शक म्हणून काम केले. महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा वाटचालीत आणि विविध सामाजिक न्यायाच्या लढाईत 'मटा' मराठी मनाचा बुलंद आवाज ठरला आहे. आज मटा खूप बदलला तरी मटा वाचणे ही आंतरिक उत्कटता मनात असते. डिजिटल जगात ॲपच्या माध्यमातून तर तो प्रत्येकाच्या हातात आज उपलब्ध आहे.

**– अभिजित हेगशेट्ये**
भ्रमणध्वनी : +९१ ९४२२०५२३१४
abhijit.shriram@gmail.com

ग्रंथाली



**गणित अध्यापक आणि प्रसारक स. पां. देशपांडे**

**संपादन : अ.पां. दशपांडे**

**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**

अभियांत्रिकी महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक असलेल्या स.पां. देशपांडे यांनी, अध्यापन करीत असताना, मुलांना गणिताची फारशी आवड नसल्याचे पाहिले असल्याने, ती सर्वसामान्य जन–तेत निर्माण करण्यासाठी, वर्तमानपत्रे आणि मासिकांत, आपल्या ८२ वर्षांच्या आयुष्यात, २१८ लेख लिहिले. अर्थात, हे सगळे लेख गणितविषयकच आहेत असे नाही. त्यांच्या २१८ लेखांतील निवडक १०० लेखांचे हे पुस्तक असून, आजही ते वाचनीय आहे.

# मटा - अविभाज्य घटक



**नीना कुळकर्णी**

'मटा' हे वृत्तपत्र मी लहानपणापासून पाहते आहे. आमच्या घरी वडील इंग्रजी वृत्तपत्र वाचायचे आणि आई 'मटा' वाचायची. त्यामुळे तेव्हापासूनच मलाही 'मटा' वाचायची सवय लागली आणि हळूहळू पेपर वाचायची गोडी वाढत गेली. मी नाट्यक्षेत्रात गेल्यावर तर आधी नाटकांच्या जाहिराती असलेले पान उघडून बघायचे. मटा'मध्ये आपल्या नाटकाची जाहिरात छापून आलेली दिसली की हायसं वाटायचं. 'मटा'शी असा जुना ऋणानुबंध आहे.

'मटा' हे एक निरपक्ष वृत्तपत्र आहे. त्यातील संपादकीय वाचायला मला नेहमी आवडतं. वृत्तपत्राचं पहिलं पान महत्त्वाचं. ते वाचून आजूबाजूच्या घटनांचा एक पटकन आढावा घेता येतो. मला वाटतं, की वृत्तपत्र वाचणं ही सुद्धा एक प्रक्रियाच आहे. त्याचं पहिलं पान, मग संपादकीय, नंतर इतर बातम्या, वाचकांची पत्रं असं एकेक आपण वाचत जातो. आवडीचा विषय असेल तर त्या विषयाशी संबंधित बातम्या, लेख, संपादकीय असं सगळं मी वाचून काढते.

लॉकडाऊनमध्ये घरी वृत्तपत्र येणं बंद झालं होतं, तेव्हा या वृत्तपत्राची खूप उणीव भासली. खरं तर मी तंत्रज्ञानस्नेही आहे. मी पुस्तकांच्या किंडल आवृत्त्या वाचते, इ-पेपर वाचते, ऑनलाइन बातम्या बघते, तरीही त्यावेळी असं वाटायचं, की काहीतरी चुकतंय, काहीतरी राहून जातंय. पेपर वाचल्याशिवाय बाहेर कसं पडायचं, पेपर हातात नसताना नुसता चहा काय प्यायचा! मग लक्षात आलं, की अरे, मटा हे केवळ वृत्तपत्र नाही तर आपल्या आयुष्याचा तो एक अविभाज्य घटक आहे. वृत्तपत्र हातात धरून, त्याची ती घडी सांभाळत, त्याची पानं खाली पडू न देता वाचायचा, पुन्हा पानं एकसारखी करून घडी घालून आपल्याला हवी ती बातमी वाचायची यात जी मजा आहे ती दुसऱ्या कशात नाही. लॉकडाऊननंतर पुन्हा पेपर घरी येऊ लागले तेव्हा मी आधी 'मटा' हातात घेतला आणि एकेक पान मनसोक्त वाचून काढलं. तो नव्हता तेव्हा त्याचं महत्त्व अधिक जाणवलं. बातम्या देणारी इलेक्ट्रॉनिक माध्यमंसुद्धा आहेतच की! पण तिथे सगळं झटपट असतं. त्यामुळे अशी इतर कितीही माध्यमं आली तरी वृत्तपत्र हातात घेऊन वाचणारी पिढी यापुढेही कायम असणारच आहे. त्यामुळे मला वृत्तपत्रांच्या भवितव्याविषयी कधीच काळजी वाटत नाही. मोबाइलवर पेपर स्क्रोल करून तुम्हाला बातम्या कळतील; पण विस्तृत बातम्या वाचण्यासाठी हातात वृत्तपत्र हवंच. सोफ्यावर निवांत बसून, वृत्तपत्र हातात घेऊन एकेक पान वाचण्यात खरी मजा आहे, ती एक अनुभवण्याची प्रक्रिया आहे आणि मला त्या प्रक्रियेतून 'मटा' वाचायला आवडतो. अशा या माझ्या आवडत्या 'मटा'ला पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा.

# क्रीडाक्षेत्राला प्रोत्साहन देत राहा



**अंजली भागवत**

'मटा'चे आणि माझे नाते खूप जुने आहे. लहानपणापासून मी मटा वाचते आहे किंबहुना लहानपणी वृत्तपत्र वाचायची सवय 'मटा'मुळेच लागली. रोज वृत्तपत्र वाचायचेच असा आमच्या घरचा नियमच होता, त्यामुळे सकाळी मटा वाचून मगच बाहेर जायचे. हातात मटा आणि सोबतीला चहा हे समीकरण मटामुळेच तयार झाले आहे. आजही मी मटा नियमित वाचते. मला शनिवारी-

रविवारी निवांतपणे पुरवण्या वाचायला आवडतात. चहाचा आस्वाद घेत मटा वाचायची सवय अजूनही कायम आहे.

क्रीडाक्षेत्रात माझे करिअर घडल्यावर तर 'मटा'ने माझे पावलोपावली कौतुक केलेले आहे, मला नेहमीच प्रोत्साहन दिलेले आहे. राष्ट्रीय पातळीवरची स्पर्धा असो की आंतरराष्ट्रीय स्पर्धा असो, मी ज्या स्पर्धेत असेन त्याची सविस्तर बातमी मटामध्ये यायची. त्यामुळे 'मटा'तील क्रीडा पत्रकार माझ्या चांगले ओळखीचे झाले होते. ते नेहमी प्रोत्साहन द्यायचे, भरभरून लिहायचे तेव्हा खूप छान वाटायचे की मटा नेमबाजी या क्रीडाप्रकाराला चांगले कव्हरेज देत आहे. त्यासाठी मी मटाची नेहमीच आभारी असेन. मीसुद्धा मटासाठी काही लेख लिहिले होते.

'मटा'पूर्वीपेक्षा आता तांत्रिक बाबतीतही खूप सुधारला आहे. फोटोंची, पेपरची क्वालिटी आता खूप छान असते. खेळांना आणखी प्रोत्साहन द्यावे असे वाटते. यावर्षी ऑलिंपिक आहे. आपले काही खेळाडू त्यात आहेत. त्यांना भरपूर प्रसिद्धी द्या, प्रोत्साहन द्या. क्रीडाविषयक पानावर खेळांच्या बातम्या तर सगळेच देतात, पण मटाने त्याहून अधिक म्हणजे खेळांवरील लेख त्या त्या खेळप्रकारातील तज्ज्ञांकडून लिहून घेऊन ते प्रसिद्ध करावेत असे मला वाटते. यामुळे विविध खेळप्रकारांविषयी पालकांना माहिती मिळेल. विविध प्रकारचे खेळ इथे रुजतील आणि त्या विषयाची आवड असलेल्यांना एक दिशा मिळेल. असे खेळविषयक सदर सुरू करावे. एरवी लोकांच्या मानसिक आरोग्याबद्दल खूप चर्चा होते, पण खेळ किंवा कोणताही क्रीडाप्रकार घ्या, तुम्हाला तो खेळून आनंदच मिळेल. खेळाने मानसिक आरोग्यसुद्धा चांगले राहते आणि म्हणून 'मटा'ने क्रीडाविषयक प्रबोधन अधिक करावे असे मला वाटते. बाकी 'मटा' चांगला आहेच. साठीनिमित्त 'मटा'ला खूप शुभेच्छा.

# खेळांचं महत्त्व जाणणारं वृत्तपत्र

**दिलीप वेंगसरकर**



मी 'महाराष्ट्र टाइम्स'चा अनेक वर्षांपासूनचा वाचक आहे आणि हे संबंध कायम राहिले ते 'मटा'मध्ये येणाऱ्या क्रीडाविषयक बातम्यांमुळे! इतर वृत्तपत्रांच्या तुलनेत या वृत्तपत्रात क्रीडाविषयक बातम्या, लेख तसंच इतर मजकूर आणि सामन्यांचे वृत्तांकन अधिक सखोल असतं आणि म्हणून खरंतर मी नियमित 'मटा' वाचायला लागलो. आमचे क्रिकेट असेल किंवा इतर कोणताही खेळ असेल, महाराष्ट्र टाइम्स हे वृत्तपत्र क्रीडा विषयाला नेहमीच चांगलं स्थान आणि योग्य महत्त्व देत आलं आहे. पूर्वी आमचे मित्र वि.वि. करमरकर क्रीडाविषयक बातम्या, लेख लिहायचे. सगळ्या सामन्यांना ते आवर्जून उपस्थित राहायचे आणि त्याविषयी फार अभ्यासपूर्ण लिहायचे. त्यांचे लेख मी न चुकता वाचायचो. त्यानंतर चंद्रशेखर संतदेखील सामन्यांचं उत्तम वृत्तांकन करायचे. मुळात या पत्रकारांचा क्रीडाविषयक अभ्यास खूप दांडगा होता, त्यामुळे ते फार बारकाईने सामन्यांविषयी आणि आम्हा खेळाडूंविषयी लिहायचे. त्यांचंही लेखन मी आवर्जून वाचायचो. अतिशय जवळून ते परीक्षण करायचे. अलीकडे महेश विचारे यांनीही चांगल्या पद्धतीनं खेळांविषयी लिहिलं आहे. क्रीडाविषयक बातम्यांना या वृत्तपत्रात चांगलं स्थान मिळतं. केवळ आंतरराष्ट्रीय सामनेच नव्हे तर आंतर्देशीय सामने असतील, क्लबच्या मॅचेस असतील किंवा १४-१६ वर्षांखालील मुलांचे सामने असतील, या सामान्यांना, खेळाडूंना 'मटा'नं वेळोवेळी प्रसिद्धी दिलेली आहे. 'मी चांगला खेळलो तर माझं नाव वृत्तपत्रात झळकलं पाहिजे' अशी या मुलांची अपेक्षा असते. ती अपेक्षा 'मटा' पूर्ण करतो. क्रिकेट सामन्यांची बातमी पेपरमध्ये छापून आल्यानं निश्चित फरक पडतो. 'मटा'नं हे काम चांगल्या पद्धतीने यापूर्वीही केलेलं आहे आणि पुढेही करतील अशी अपेक्षा आहे. खेळाव्यतिरिक्त इतर विषयांवरील लेखसुद्धा कधीच एकतर्फी नसतात हे या वृत्तपत्राचं वैशिष्ट्य आहे. एखादा विषय तुम्हाला नीटसा ठाऊक नसेल तर 'मटा' वाचल्यावर त्या विषयाच्या दोन्ही बाजू कळतात.

दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे 'अग्रलेख'. संपादकीय लेखन वाचण्याचा खूप फायदा असतो. आपल्याला बातमीच्या पलीकडील माहिती संपादकीय मजकुरातून कळते. लोकांना त्यांची मतं ठरवण्यात, जनजागृती करण्यात अग्रलेखांचं विशेष महत्त्व आहे. त्यामुळे अग्रलेखांच्या वैशिष्ट्यांसह ती परंपरा 'मटा'नं पुढे कायम चालू ठेवावी. क्रिकेटमध्ये कसोटी क्रिकेटचे जे महत्त्व आहे तेवढंच महत्त्व प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात वृत्तपत्रांना आहे. त्यामुळे कितीही आधुनिक प्रसारमाध्यमं आली तरी हातात घेऊन वाचायचं जे वृत्तपत्र आहे त्याला मरण नाही आणि हे लक्षात घेऊन 'महाराष्ट्र टाइम्स'ने पुढील वाटचाल अधिक जोमदार करावी व त्यासाठी त्यांच्या संपूर्ण टीमला माझ्या शुभेच्छा.

# कौतुक आणि अपेक्षा



**सचिन खेडेकर**

'महाराष्ट्र टाइम्स' ६० हे वाचायला खूपच छान वाटतंय. 'मटा' वृत्तपत्र म्हणून वाचकांसमोर येतोच, याव्यतिरिक्तही 'मटा'तर्फे अनेकविध उपक्रम आयोजित केले जातात. त्यापैकी, गुणवंत गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य मिळवून देणाऱ्या 'मटा हेल्पलाईन' या उपक्रमाचं मला विशेष कौतुक वाटतं. गेली अनेक वर्षं हा उपक्रम 'मटा' हिरीरीनं राबवत आहे. एका वृत्तपत्रानं सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून उभारलेला हा उपक्रम आज अनेक गरजू मुलांसाठी मदतीचा हात ठरतो आहे, ही मोठी गोष्ट. 'मटा'च्या या उपक्रमामुळे आतापर्यंत अनेक हुशार परंतु परिस्थितीनं गांजलेल्या गरीब मुलांचं उच्चशिक्षण मार्गी लागलं आहे. मीसुद्धा त्यांच्या या कार्यक्रमात एकदा सहभागी झालो होतो आणि तेव्हा त्या गुणवंत मुलांच्या हातात धनादेश देताना खूप समाधान वाटलं होतं. 'मटा'चा हा उपक्रम पुढेही असाच चालू राहावा.

महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्राला साठ वर्षं झाली, त्यासाठी 'मटा'चं अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. मटा' मी नियमित वाचतो अशातला भाग नाही, पण 'मटा'ची एक वेगळी ओळख आहे हे निश्चित. अशा या 'मटा'ला शुभेच्छा द्यायचं ठरवलं आणि यानिमित्तानं माझ्या डोक्यात एक विचारचक्र सुरू झालं. एकूणच मराठी वृत्तपत्र, मराठी पत्रकारिता, वृत्तपत्रांची आजची भाषा, आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडी आणि त्याचं वृत्तपत्रांमध्ये उमटणारं प्रतिबिंब या सगळ्या मुद्यांचा मी यानिमित्तानं विचार करू लागलो, तेव्हा काही गोष्टी मला प्रकर्षानं जाणवल्या, त्या आज एक वाचक म्हणून मी मांडणार आहे. मला वाटतं, ह्या गोष्टी सर्वच वृत्तपत्रांनी एकदा अवश्य तपासून पाहाव्यात.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाषा. वृत्तपत्रांची भाषा फार महत्त्वाची असते. आजकाल ती नको तेवढी विशेषणं लेऊन येते. म्हणजे कधी कधी 'हाहाकार', 'भीषण' अशी दोन-दोन भडक विशेषणं एकाच वाक्यात वापरलेली असतात. हे टाळलं पाहिजे असं मला वाटतं. वृत्तपत्रांची भाषा साधी, सरळ, सोपी आणि नेमकी असावी. जी घटना घडली आहे त्याची अचूक माहिती देणं हे वार्ताहराचं काम आहे. वार्ताहरानं बातमी आणि संपादकीय यातील फरक लक्षात घ्यावा. त्याने बातमी देताना संपादकीय मतं मांडू नयेत, त्यासाठी संपादक आहेत आणि ते त्यावर लिहितीलच. बातमी ही बातमीसारखीच असावी, असं माझं वैयक्तिक मत आहे. 'एक्स्प्रेस वे की मृत्यूचा सापळा' असं वारंवार न म्हणता त्याच मार्गावरून रोज हजारो गाड्या व्यवस्थितपणे, विनाअपघात सुखरूपपणे पुढे जाताहेत हेही सांगा. सकाळी वृत्तपत्र उघडल्यावर मथळे वाचून 'आता पुढे काही वाचूच नये' असं वाटायला नको, एवढी काळजी घेतली तरी पुरेसं आहे. भडक किंवा अतिरंजक गोष्टी दाखवायला इलेक्ट्रॉनिक माध्यमं आहेतच. तो भडकपणा वृत्तपत्रात यायला नको. वृत्तपत्रांनी आपली गरिमा सांभाळावी. सगळ्याच वृत्तपत्रांनी वाचकांना सकारात्मकतेकडे न्यायला पाहिजे कारण तेच तर त्यांचं वेगळेपण आहे आणि सध्याच्या काळात तर हे फार गरजेचंसुद्धा आहे. वृत्तपत्र वाचकांचं मत घडवत असतात, पण ही मतं घडवताना मनं दूषित होणार नाहीत याचीही काळजी घेतली पाहिजे, हे या निमित्तानं सर्व वृत्तपत्रांना सांगावंसं वाटतं. झटपट बातम्या सांगणारे इतर कितीही डिव्हाइस आले तरी घरी येणारं वृत्तपत्र, मग ते लोकसत्ता असो किंवा महाराष्ट्र टाइम्स असो, 'काय म्हणतोय आजचा पेपर' असं म्हणत आवडीनं हातात घेऊन वाचणारी एक पिढी ही कायमच तुमच्या सोबत असणार आहे आणि म्हणून तुमच्याकडून जास्त अपेक्षा आहेत. आशा करतो की माझं म्हणणं तुम्हालाही पटलं असेल. धन्यवाद आणि 'मटा'ला पुन्हा एकदा खूप शुभेच्छा.

# जडणघडणीत महत्त्वाचे योगदान



**भूषण गगराणी**

'महाराष्ट्र टाइम्स' हे वृत्तपत्र मी नेमकं कधीपासून वाचतोय हे आता आठवतही नाही, इतक्या आधीपासून वाचतोय. माझ्या लहानपणापासून आमच्या घरी 'मटा' येतो. त्यावेळी जास्त आवृत्त्या नव्हत्या. फक्त एकच आवृत्ती होती. तेव्हा कोल्हापूरला आमच्या घरी दुपारी तीन-चार वाजता 'मटा' यायचा. त्या वयात एवढं काही कळायचं नाही; पण आई-वडिलांनी वृत्तपत्र वाचायची गोडी लावली. ती दोघंही नित्यनेमानं पेपर वाचायची त्यामुळे आम्हालाही सवय लागली. मला आठवतंय, माझ्या एका वक्तृत्वस्पर्धेची बातमी 'मटा'मध्ये छापून आली होती. तो पेपर मी अनेक दिवस जपून ठेवला होता. राज्यस्तरीय वृत्तपत्रात आपलं नाव येणं याचं खूप अप्रूप वाटलं होतं. एकदा तर 'मटा'नं त्यांच्या रविवारच्या पुरवणीत वक्तृत्व स्पर्धेतील आम्हा विजेत्यांची भाषणं सुद्धा छापली होती, त्यावेळी तर 'मटा' म्हणजे आमचं विद्यार्थ्यांचं दैवतच झालं होतं. तेव्हा मोजकीच वृत्तपत्र निघायची आणि त्यातही राज्य स्तरावर महाराष्ट्र टाइम्सचा लौकिक होता. पुढे मग वृत्तपत्रवाचन वाढत गेलं. कॉलेजला असताना अशोक जैन यांचं सदरलेखन मी आवर्जून वाचायचो. राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय घडामोडींविषयी रस निर्माण व्हायला लागला. 'आयफेल टॉवर', 'राजधानीतून' ही सदरं मी नियमित वाचायचो. महाराष्ट्र टाइम्स हे एक असं वर्तमानपत्र त्यावेळी होतं ज्यात माहिती आणि विश्लेषण दोन्ही दिलेलं असायचं. फक्त सवय किंवा आवड म्हणून नव्हे तर वेगवेगळ्या विषयांवर स्वतःची मतं तयार करण्यासाठी मटा वाचला जायचा. लहानपणी आपल्याला चांगल्या सवयी लावणाऱ्या काही व्यक्ती असतात, संस्था असतात; ज्या आपल्या मनावर संस्कार करतात आणि ते संस्कार आयुष्यभर आपल्या बरोबर राहतात. माझ्या लहानपणी महाराष्ट्र टाइम्स वर्तमानपत्राचाही या संस्कार करणाऱ्या संस्थांमध्ये सहभाग होता. त्यावेळी आम्ही गोविंद तळवळकरांचे अग्रलेख वाचायचो. त्या वयात फारसं काही कळत नसलं तरी आम्ही वाचत राहिलो. त्यांनी घेतलेल्या भूमिका, त्यांचे विचार, त्याचं म्हणणं काय यावर आम्ही कॉलेजमध्ये तावातावानं बोलायचो. आमच्या पिढीच्या जडणघडणीत मटाचं महत्त्वाचं योगदान होतं. पुढे मग 'आयएएस'च्या यादीत नाव लागल्यावर त्याविषयी 'मटा'मध्ये आलेल्या बातम्या असतील किंवा प्रत्यक्ष प्रशासकीय सेवेत केलेल्या कामाच्या संदर्भातील बातम्या असतील, अशा माध्यमातून मी या वृत्तपत्राशी जोडलेला राहिलो. पुढे मुंबईत आल्यावर 'मटा'बरोबरचा संबंध वाढला. मटाचे पत्रकार माझ्या चांगल्या परिचयाचे झाले. मला आठवतंय, तेव्हा मटामध्ये प्रकाश अकोलकर होते. मी तेव्हा ज्युनिअर होतो पण ते आम्हाला छान सांभाळून घ्यायचे. आम्ही त्यांचे लेख, सदर, स्फुटलेखन वाचायचो. संजीव साबडे यांच्याशीही चांगला परिचय होता. ज्यांचे लेख नियमित वाचतो त्यांना प्रत्यक्ष भेटायला मिळणं हाही एक सुखद अनुभव असायचा. अग्रलेखांच्या बाबतीत मला एक सुचावसं वाटतं ते म्हणजे एकापेक्षा जास्त अग्रलेख असू नयेत. आजकाल संपादकीय विभागात अग्रलेखाचं काम वाटून घेतलं जातं. पण अग्रलेख एकच असावा आणि तो नेमका, थेट भाष्य करणारा असावा, कारण वृत्तपत्रांच्या बाबतीत अग्रलेखांचं महत्त्व अनन्यसाधारण आहे, ते जपलं जावं. तर असा हा अनेक वर्षांचा 'मटा'बरोबर संबंध आहे. हे केवळ वृत्तपत्र नाही तर त्यापलीकडेही बरंच काही आहे आणि म्हणून 'मटा'चं कौतुकही वाटतं. आता आवृत्त्या वाढल्या, गावाला पेपर सकाळी मिळायला लागला, 'मटा' रंगीत झाला, थोडे मनोरंजनाचे विषय वाढले वगैरे हे सगळे अलीकडे झालेले महत्त्वाचे बदल आहेत आणि ते निश्चितच स्वागतार्ह आहेत. परंतु अजूनही, डिजिटल आवृत्ती जरी मी वाचत असलो तरी सकाळी महाराष्ट्र टाइम्स हातात घेऊन वाचतोच. या वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी माझ्याकडून अनेक शुभेच्छा.

# दोन दशकांचा ऋणानुबंध



**स्वप्निल जोशी**

'महाराष्ट्र टाइम्स' या वृत्तपत्राशी माझी अनेक वर्षांची ओळख आहे. किमान दोन दशकांची तरी नक्कीच! 'उत्तर रामायण' मालिकेत मी लव-कुशपैकी कुशची भूमिका केली होती तेव्हा देशभरात माझं कौतुक होत होतं. मी अवघा नऊ वर्षांचा होतो आणि त्या भूमिकेमुळे सगळ्यांचा लाडका बालकलाकार ठरलो होतो. मला आठवतंय, तेव्हा वेगवेगळ्या वृत्तपत्रांनी माझ्याबद्दल लिहिलं होतं, परंतु मला खरा आनंद तेव्हा झाला जेव्हा माझं कौतुक 'मटा'मध्ये छापून आलं होतं. आमच्या घरी फार पूर्वीपासून 'मटा' यायचा आणि आजही येतो. इंग्रजी वृत्तपत्रदेखील आम्ही घेतो पण 'मटा' येतोच. लहानपणी मी वृत्तपत्र वाचायला सुरुवात केली, ती सुरुवातच माझी महाराष्ट्र टाइम्सच्या वाचनाने झाली. वृत्तपत्र म्हणजे मटा हे समीकरण ठरलेलं होतं. आपल्या लहानपणीच्या काही सवयी अशा असतात की ज्या तुमच्या जडणघडणीचा एक भाग असतात. तसा मटा हा माझ्या आणि माझ्याप्रमाणे अनेक मराठी कुटुंबातील तरुणांच्या जडणघडणीचा एक भाग आहे. मागच्या वर्षी लॉकडाऊनमध्ये 'मटा' बंद होता तेव्हा काहीतरी राहून गेल्यासारखं वाटायचं. इतक्या वर्षांची सवय खंडित झाली होती. लॉकडाऊन उठवल्यावर देखील अनेक लोकांनी घरी पेपर घेणं बंद केलं होतं पण आम्ही मात्र लगेच 'मटा' सुरू केला. माझे आई-बाबा, मी, आम्हाला नेहमीच असं वाटतं की जोपर्यंत आपण वृत्तपत्र प्रत्यक्ष हातात घेत नाही; तोपर्यंत पेपर वाचल्याचा 'फील'च येत नाही. त्यामुळे एका हातात सकाळचा चहा आणि दुसऱ्या हातात 'मटा' घेतल्याशिवाय सकाळ झाल्यासारखं वाटत नाही.

एक कलाकार म्हणून माझं 'मटा'बरोबर नातं आहेच पण एक वाचक या नात्यानंही मी 'मटा' जोडला गेलो आहे. हा दोन दशकांपासून असलेला ऋणानुबंध फार छान, सुखद आहे. आत्तापर्यंत माझ्या शेकडो मुलाखती 'मटा'ने छापल्या आहेत. मी सुद्धा त्यांच्या अनेक उपक्रमांचा एक भाग होतो. 'मटा सन्मान' सोहळ्याचे निवेदन केलेले आहे, मटा' कार्निव्हल, 'मटा'चा कल्चर क्लब यासारख्या त्यांच्या अनेक उपक्रमांचे उद्घाटन माझ्या हस्ते झालेले आहे. माझ्याही अनेक कार्यक्रमांच्या ब्रेकिंग न्यूज मटानं दिलेल्या आहेत. आयुष्यातील आनंदाच्या बातम्या मी सगळ्यात आधी मटाबरोबर शेअर केलेल्या आहेत, असं हे आमचं नातं आहे. या वृत्तपत्राचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काळानुरूप बदल करणं. मग ते 'कार्निवल'सारख्या उपक्रमांमधून तरुणाईला आपल्याकडे खेचून आणणं असेल किंवा 'मुंबई टाइम्स' या पुरवणीनं बॉम्बे टाइम्सचे ग्लॅमर मराठीत आणण्याचा केलेला प्रयत्न असेल, वेळोवेळी 'मटा'नं स्वतःमध्ये बदल केलेले आहेत आणि त्यातूनच आता महाराष्ट्र टाइम्स हे केवळ वृत्तपत्र नाही, तर ती एक मोठी संस्था झालेली आहे. अर्थातच, वृत्तपत्र चालवणं हे एका माणसाचं काम नाही. त्यात अनेक लोक नानाविध प्रकारे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे हातभार लावतात तेव्हा ती संस्था उभी राहते. गेल्या साठ वर्षांत 'महाराष्ट्र टाइम्स'चे वटवृक्षात रूपांतर करण्यात ज्या-ज्या लोकांचा हातभार लागलेला आहे त्या सगळ्यांना मी यानिमित्तानं वंदन करतो आणि 'मटा'ला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

या लेखाचा शेवट करण्यापूर्वी एक गोष्ट मला सर्वच प्रसारमाध्यमांना आवर्जून सांगावीशी वाटते. ती म्हणजे, प्रसारमाध्यमांनी माहिती पुरवावी, निर्णय देऊ नये. आजकाल एकूणच पत्रकारितेमध्ये, विशेषतः वृत्तांकन करताना घाईघाईनं निर्णय देऊन टाकण्याचे प्रकार खूप वाढले आहेत. आपण ट्रायल कोर्ट सुरू केलं आहे की काय असं वाटतं! उदा. एखादा चित्रपट - मग तो चांगला आहे की वाईट आहे, बघा की बघू नका, अमुक एखादा माणूस खरंच चोर

आहे की निष्पाप आहे, अमुक एखादी कंपनी आर्थिक गैरव्यवहार करतेय की चांगलं काम करतेय याबद्दल थेट निर्णय देऊन मोकळे होतात. कालांतरानं सत्य समोर येतं, पण तोपर्यंत पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं असतं. प्रसारमाध्यमांचं काम माहिती पुरवणं हे आहे; चांगली आणि वाईट बाजू समान पद्धतीनं लोकांसमोर ठेवून त्यांना त्यांचं मत ठरवायला मदत करणं हे काम आहे. निर्णय देणे हे जर प्रसारमाध्यमांचं काम असतं तर आपल्याकडे न्यायालयं कशाला बनवली असती? पोलिसांनासुद्धा तो अधिकार नाही.... त्यासाठी न्यायालयं सक्षम आहेत. निर्णय न देता प्रसारमाध्यमांनी बाजू मांडावी किंवा दोन्ही बाजू लोकांसमोर ठेवाव्यात, मग काय योग्य-अयोग्य हे लोकांना ठरवू द्या. हा दृष्टिकोन ठेवून वृत्तांकन करणं आज फार महत्त्वाचं आहे, तरच बातम्या वाचाव्या किंवा पाहाव्याशा वाटतील. धन्यवाद!

# मटा ५८ वर्षांपासूनचा सोबती



**अशोक नायगावकर**

'महाराष्ट्र टाइम्स' हे वृत्तपत्र लहानपणापासूनचा माझा सोबती आहे. १९६२ साली मी मनमाडला शाळेत शिकत होतो. त्याकाळी काशी एक्स्प्रेसनं मुंबईतील वृत्तपत्रं दुपारी मनमाडला पोहोचायची तेव्हा कुठे आम्हाला ती वाचायला मिळायची. स्थानिक वृत्तपत्रं असायची; पण मुंबईहून येणारं वृत्तपत्र म्हणून महाराष्ट्र टाइम्सचा बोलबाला होता. द्वा.भ. कर्णिक तेव्हा संपादक होते. त्यांच्या अग्रलेखांमुळे खरं तर मला अग्रलेख वाचायची सवय लागली. त्यानंतर गोविंद तळवलकर, कुमार केतकर, भारतकुमार राऊत अशी पुढची संपादकांची पिढीही मी पाहिली आहे. आम्ही सगळे गोविंद तळवलकरांचे चाहते. ते कसे व्यक्त होतात याकडे आमचं लक्ष लागलेलं असायचं. माझ्यावर तळवलकरांच्या लेखनाचा मोठा प्रभाव होता; किंबहुना आमच्या पिढीच्या एकंदरच वैचारिक घडणीवर त्यांचा प्रभाव होता. 'वाचता वाचता' हे सदर असेल किंवा 'राजधानीतून' हे दिल्लीहून येणारं वार्तापत्र असेल, हा सगळा ऐवज आमच्यासाठी महत्त्वाचा असायचा. बातम्या इतर माध्यमांतूनही कळायच्या त्यामुळे बातम्यांचं अप्रूप नसायचं. त्या तर वाचायचोच, परंतु अमुक एका घटनेवर हे महत्त्वाचं वृत्तपत्र कशा पद्धतीनं आपला अभिप्राय देतंय, संपादकीयमध्ये काय लिहून येतंय याकडे जास्त लक्ष असायचं. मग आम्ही संपादकीय भूमिका आणि आमची भूमिका ताडून पाहायचो. एखाद्या घटनेबाबत माझ्या मनात येणाऱ्या विचारांशी 'मटा'ची वैचारिक भूमिका तंतोतंत जुळत गेलेली आहे. प्रक्षोभक पद्धतीनं एखाद्या घटनेवर तुटून पडणं ही विकृती 'मटा'कडे कधीच नव्हती. अतिशय संयत अशा भूमिकेतून 'मटा' व्यक्त होत आलेला आहे. हातातला पेपरवेट फेकून मारावा असं प्रक्षोभक फीलिंग मटा वाचताना कधी आलेलं नाही. वृत्तपत्रवाचनाची माझी सवय गेली ५८ वर्षं तरी कायम आहे. तुमचं लेखन, तुमच्या कविता, तुमचं व्यक्त होणं, तुमची भूमिका घडवणं यावर वृत्तपत्रवाचनाचा परिणाम होतच असतो. इतकी वर्षं मी मटाचा वाचक आहे याचा अभिमान वाटतो. आताच्या संदर्भात सांगायचं झालं तर मी म्हणेन, की 'रविवार संवाद' ही आठवड्याची पुरवणी आणखी जास्त पानांची आणि बहुविध लेखांनी भरलेली असावी, असं मला वाटतं आणि ही अनेकांची अपेक्षा आहे. चार पानांच्या पुरवणीतील बराचसा भाग जाहिरातीत जात असेल तर आम्हाला वाचायला काय मिळणार? हे सगळं जाहिरातींमुळे चालतं हे मला मान्य आहे. तरीसुद्धा एक वाचक म्हणून मला असं वाटतं, की वृत्तपत्र हे वाचण्यासाठी असतं याचं कुठेतरी भान ठेवावं. बाकी मटा उत्तमच आहे. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**मान्यवरांच्या प्रतिक्रियांचे शब्दांकन**
**मनीषा नित्सुरे-जोशी**



# स्मरणरंजनातली काही पाने!

**सुरेश भटेवरा**

**महाराष्ट्र** टाइम्सचे साठाव्या वर्षात पदार्पण ही माझ्या पिढीसाठी नक्कीच अलौकिक घटना आहे. इयत्ता पाचवीत प्रवेश केल्यापासून महाराष्ट्र टाइम्सचा मी नियमित वाचक. वडील वकील होते. घरी तीन-चार वर्तमानपत्रे यायची. टाइम्स गटाचे महाराष्ट्र टाइम्स, एक्स्प्रेस गटाचे इंडियन एक्स्प्रेस, स्थानिक वृत्तपत्रे, गावकरी आणि देशदूत. स्पष्ट शब्दोच्चारासाठी वडील इंग्रजी वृत्तपत्रे मुद्दाम मोठ्याने वाचायला सांगायचे. आमच्या घरी सुरुवातीला इंग्रजीतले 'द भारत ज्योती' यायचे. कालांतराने 'फ्री प्रेस' आणि नंतर 'इंडियन एक्सप्रेस' असे बदल त्यात होत गेले. 'महाराष्ट्र टाइम्स' मात्र आजपर्यंत कायम राहिला. घोषवाक्याप्रमाणे अगदी मित्रासारखा! तळवलकरांचे अग्रलेख, धावते जग, आयफेल टॉवर, बहुतांची अंतरे, अशा समृद्ध मजकुराने संपादकीय पान भरलेले असायचे. शालेय जीवनापासून माझी वैचारिक जडणघडण (मेंटल नरिशमेंट) महाराष्ट्र टाइम्समुळेच झाली हे आवर्जून सांगावेसे वाटते. काही वर्षांनंतर त्याच वृत्तपत्रात, प्रतिनिधी, मग विशेष प्रतिनिधी आणि अंततः साहायक संपादकाच्या भूमिकेत सलग २२ वर्षे (दिल्लीतल्या १२ वर्षांसह) प्रत्यक्ष काम करण्याचा योग आला. असे काही घडेल असे लहानपणी स्वप्नातही वाटले नव्हते.

**प्रसारमाध्यमे आता सत्ताधाऱ्यांना अनुकूल 'मेक टू ऑर्डर' बातम्या तयार करणारे कारखाने बनत आहेत. निर्भीड पत्रकारितेचा त्यात नि:संशय संकोच झाला आहे. नव्याने सुरू झालेला ओटीटी प्लॅटफॉर्म अद्याप मनोरंजनापुरता मर्यादित आहे. त्यात व्यापक बदल झाला तर खऱ्या बातम्या आणि चांगल्या वृत्तविश्लेषणाला त्यात कितपत संधी मिळेल, याची आज कोणालाही शाश्वती नाही.**

टाइम्स समूहाच्या पत्रांना ज्या काळी भांडवलदार गटाची साखळी वृत्तपत्रे मानले जायचे, त्या काळात महाराष्ट्र टाइम्सची ओळख मात्र गोविंदराव तळवलकरांचा पेपर अशीच होती. 'पत्र नव्हे मित्र' या घोषवाक्यानंतर 'बातम्या तर सगळेच देतात, आम्ही विचार देतो' हे महाराष्ट्र टाइम्सचे नवे घोषवाक्य होते. याचे महत्त्वाचे कारण चिंतनशील वैचारिक परंपरा जपणाऱ्या तळवलकरांना, विलक्षण राजकीय आणि सामाजिक भान होते. समाजजीवनातल्या अपप्रवृत्तींवर ते बेधडक प्रहार करत. अभिजनवर्गाबरोबर कामगार-वर्गातही महाराष्ट्र टाइम्स आपुलकीने वाचला जायचा. राजकीय भाष्याच्या जोडीला शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातल्या ठळक घडामोडी, महाराष्ट्र टाइम्समधेच सविस्तर वाचायला मिळायच्या. त्यातल्या अनेक विषयांना न्याय मिळवून देण्यासाठी तळवलकर कमालीचे आग्रही असायचे. वृत्तपत्राच्या संपादकाचा वैचारिक आवाका आणि दृष्टिकोन किती व्यापक असावा, याचा आदर्श मानदंड ठरलेले तळवलकर, मराठी पत्रकारितेचे खऱ्या अर्थाने 'लिजंड' होते. तळवलकरांच्या कारकिर्दीत महाराष्ट्र टाइम्समध्ये काम करण्याची संधी मिळणे हा मराठी पत्रकारांच्या आयुष्यातला मोठा सन्मान मानला जायचा. अपघाताने का होईना, माझ्या आयुष्यात तो योग आला. असे म्हणतात, 'When passion becomes your profession, Life becomes poetry'. आपण कोणाची नोकरी अथवा काम करतो आहोत, असे कधी वाटतच नाही. महाराष्ट्र टाइम्समधला माझा २२ वर्षांचा कालखंड अशीच एक सदाबहार 'मैफल' होती.

कॉलेजला असताना, नाशिकच्या देशदूत दैनिकात ('हवा कॉलेजची' सदराच्या धर्तीचे) 'युवकांचा मागोवा' नावाचे सदर मी लिहायचो. चंदुलाल शहा यांच्या 'भ्रमर' सायंदैनिकातही काही काळ हौसेखातर लिहिले. अरुण साधूंचे 'मुंबई दिनांक' याच काळात वाचले. ते वाचल्यापासून झपाटल्यागत लेखनाचा छंद आणि पत्रकारितेचे आकर्षण वाढले. आयुष्यात मोठ्या कॅनव्हासवर पत्रकारितेची संधी मिळाली तर त्यासारखी आनंदाची बाब नाही, असे त्यावेळी वाटायचे. १९७८ साली एलएल.बी.ची परीक्षा मी प्रथम वर्गात उत्तीर्ण झालो. सलग बारा वर्षे नाशिकच्या

जिल्हा न्यायालयात वकिली केली. परंतु वकिलीत माझे मन काही रमले नाही. आयुष्याची दिशा चुकल्यासारखे वाटले. वकिलीचा व्यवसाय सोडून, राजकारणाच्या बांधावरून चालत, १९९१ अखेर साली महाराष्ट्र टाइम्सच्या सांस्कृतिक तिशीत, या वृत्तपत्रात माझा प्रवेश झाला. आयुष्यातला तो एक सुखद अपघातच म्हणावा लागेल.

वकिलीच्या व्यवसायातून अचानक महाराष्ट्र टाइम्समधे मी कसा आलो, त्याची कहाणी खरे तर रंजक आहे. पण प्रस्तुत लेखात ती लिहिण्याचा मोह मी टाळला आहे. थोडक्यात सांगायचे तर अशोक जैन व प्रकाश अकोलकर यांच्या आग्रहामुळे, १९९१च्या डिसेंबर महिन्यात, महाराष्ट्र टाइम्सचा नाशिक प्रतिनिधी म्हणून माझी नियुक्ती झाली. नाशिकला महाराष्ट्र टाइम्सचा पूर्णवेळ प्रतिनिधी असे पद त्यावेळी नव्हते. साडेतीन वर्षे स्ट्रिंगर म्हणून काम केले. त्यानंतर १९९५ साली कुमार केतकरांनी नाशिकचा पूर्णवेळ प्रतिनिधी म्हणून माझी रीतसर निवड केली. 'मराठी मुलखात' हे उत्तर महाराष्ट्राचे वार्तापत्र लिहिण्याची जबाबदारीही त्यांनी माझ्यावर सोपवली. २००१ च्या मध्यापर्यंत सलग दहा वर्षे नाशिकला महाराष्ट्र टाइम्सचा प्रतिनिधी म्हणून मी काम केले. 'मैफल' पुरवणीत, अशोक जैन यांनी नाशिक आणि उत्तर महाराष्ट्रातल्या काही खास विषयांवर मला लिहायला लावले. याच काळात कुमार केतकरांनी कोलकाता व बंगळुरू येथील काँग्रेसची महाअधिवेशने, मध्यप्रदेशची विधानसभा निवडणूक, असे काही महत्त्वाचे इव्हेंट कव्हर करायला मला पाठवले. देशाच्या राजधानीत पत्रकारिता करण्याचे वेध खरे तर तेव्हापासूनच लागले होते. २००१च्या ऑगस्ट महिन्यात महाराष्ट्र टाइम्सचा विशेष प्रतिनिधी म्हणून मी दिल्लीत दाखल झालो. त्याचे श्रेय अर्थात तत्कालीन संपादक भारतकुमार राऊत यांचे.

महाराष्ट्र टाइम्स सुरू झाला तेव्हापासून दिल्लीत या पत्राचे विशेष प्रतिनिधी मराठीतले दिग्गज पत्रकार होते. सुरुवातीच्या काळात गंगाधर इंदूरकर त्यानंतर शंकर सारडा, वि.ना देवधर यांनी ही धुरा वाहिली. माझे पूर्वसुरी अशोक जैन १९७८ ते १९८९ अशी अकरा वर्षे दिल्लीत महाराष्ट्र टाइम्सचे विशेष प्रतिनिधी होते. तेव्हापासूनच त्यांचा व माझा उत्तम परिचय होता. जैन यांच्या 'राजधानीतून' वार्तापत्राद्वारे दर सोमवारीच दिल्लीतल्या राजकीय घडामोडींचे तपशील सर्वांना समजायचे. नर्मविनोदी शैलीत शब्दांची सदाबहार कारंजी फुलवणारी जैन यांची वार्तापत्रे, दिल्लीचा माहोल प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभा करायची. 'राजधानीतून' वाचल्यावर अनेकदा मी त्यांना पत्र लिहीत असे अथवा फोनवर संवाद साधत असे. कालांतराने जैन मुंबईत आले. महाराष्ट्र टाइम्सचे कार्यकारी संपादक झाले. जैन यांच्यानंतर दिल्लीत संजीव साबडे, नितीन वैद्य व काही महिन्यांसाठी धनंजय गोडबोले यांनी विशेष प्रतिनिधी म्हणून काम केले. त्यानंतर २००१ ते २०१३ असा बारा वर्षांचा सर्वाधिक काळ दिल्लीत महाराष्ट्र टाइम्सचा मी विशेष प्रतिनिधी होतो. सुरुवातीला माझ्या पूर्वसुरींच्या गाजलेल्या कारकिर्दीचे मानसिक दडपण माझ्यावरही होते मात्र जसजसा दिल्लीत रुळलो, हे दडपणही सरत गेले. माझ्या निवृत्तीनंतर, सुनील चावके या पदाची जबाबदारी सांभाळत आहेत.

भारतीय संसदेवर १३ डिसेंबर २००१ रोजी दहशतवादी हल्ला झाला. त्याप्रसंगी मी संसद भवनाच्या आतच होतो. सुरक्षा रक्षकांच्या जागरूकतेमुळे आतले सारे जण सुदैवाने वाचले. त्यापैकी एक भाग्यवान मी देखील होतो. या हल्ल्याचा थ्रीलिंग अनुभव काल घडल्यासारखा अजूनही स्मरणात आहे. संसदेच्या ऐतिहासिक वास्तूत लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज कव्हर करताना, खूप गोष्टी नव्याने शिकायला मिळाल्या. प्रश्नोत्तराच्या तासाला अथवा शून्यप्रहरात विविध राज्यांतले खासदार ज्या पोटतिडकीने आपल्या भागातले प्रश्न मांडायचे, ते ऐकताना भारतासारख्या विशाल देशाचे अंतरंग आणि त्याच्या समस्या समजायच्या. शाळेत अथवा कॉलेजमध्ये जे शिकायला मिळाले नाही असे बरेच काही प्रेस गॅलरीत बसून मी शिकलो. एका अर्थाने हे माझे नवे विद्यापीठच होते. खरे तर संसदेतली आणि संसदेबाहेरची प्रत्येक बातमी वृत्तवाहिन्यांद्वारे क्षणाक्षणाला लोकांपर्यंत पोहोचत असते. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात त्याचे विश्लेषणही वाचायला मिळते. छोट्या पडद्यावर घराघरात लोकांना जे दिसते, त्याच घटना दिल्लीत संसदेच्या परिसरात अथवा प्रेस गॅलरीतून मी प्रत्यक्ष पाहायचो. फरक इतकाच की हा प्रत्यक्ष साक्षीयोग महाराष्ट्र टाइम्सच्या बातमीदारीमुळे दिल्लीत माझ्या वाट्याला आला. या कालखंडात संसदेची दोन्ही सागृहे कव्हर करण्याखेरीज, काँग्रेसची सारी महाअधिवेशने, चिंतन-बैठका, महासमितीच्या बैठका, मुख्यमंत्री परिषदा, भारतातल्या नऊ राज्यांतल्या कधी विधानसोच्या तर कधी लोकसभेच्या निवडणुका कव्हर करण्याची संधी मला मिळाली. पंतप्रधान वाजपेयींबरोबर मीडिया टीममध्ये पाकिस्तानात सार्क परिषदेला, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्याबरोबर व्हिएतनाम व इंडोनेशियाचा दौरा, राष्ट्रपती प्रणव मुखर्जींबरोबर न्यूझिलंड व पापुआ न्यू गिनीचा दौरा, यांचे वृत्तांकन करण्याचा योग आला.

राजकारण हा दिल्लीचा आत्मा. दिल्लीच्या रक्तात सत्तेची कट-कारस्थाने हजारो वर्षांपासून भिनलेली. राजकीय डावपेचांची अनेक कथानके इथल्या वातावरणात भिरभिरत असतात. दिल्लीत लखलखत्या सत्ताप्रकाशाचा उजेड आहे. सत्तेसाठी चाललेली छोटीमोठी कारस्थाने, पाठोपाठ येणारा बेदरकार मस्तवालपणा, राजधानीच्या हवेत निनादत असतो. संसद परिसरातले 'जंतरमंतर' आंदोलनांचे ठिकाण आहे. प्रेस क्लब, राजकीय पक्षांची मुख्यालये, या दिल्लीच्या राजकारणातल्या काही प्रमुख चावड्या. चावडीवर नेहमीच गप्पा रंगतात. आठवणींच्या, सुखदु:खांच्या, वेदनेच्या कहाण्या सांगणाऱ्या अन् औत्सुक्याची असंख्य कोडी उलगडणाऱ्या! संसदेच्या सभागृहात कधी वांझोट्या चर्चा ऐकल्या तर कधी संवेदनशील विषयांवर रंगलेल्या चर्चेच्या मैफिलीही अनुभवल्या. संसदेच्या लॉबीत, प्रांगणात, सेंट्रल हॉलमध्ये, मंत्र्यांच्या दालनात अनेक घडामोडी घडत असायच्या. याखेरीज राजकीय पक्षांची मुख्यालये, दिल्लीतल्या सत्तेच्या गल्ल्या, वाहनांच्या गर्दीने

अव्याहतपणे वाहणारा राजधानीतल्या प्रमुख रस्त्यांचा परिसर, दररोज डोळ्यांसमोर उभा असायचा. इथल्या प्रत्येक घटनेचा वेध घेताना बातमी मिळवणे हा उद्देश तर होताच, त्यापेक्षाही अशा घटनांचे मर्म समजावून घ्यावेसे वाटायचे. त्यातूनच राजकीय नेत्यांचे स्वभाव, लकबी, संधीसाधूगिरी, बेरडपणा इतकेच नव्हे तर अनेकदा त्यांच्यातला प्रांजळपणाही सहज जाणवू लागला. देशाच्या राजकीय तारांगणातल्या अनेक राष्ट्रीय नेत्यांना प्रत्यक्ष भेटण्याचा, त्यांच्याशी संवाद साधण्याचा योग दिल्लीत आला. त्यात दररोज भेटणारे काही प्रसन्न चेहरे होते तर अनेक चेहऱ्यांवर केवळ मुखवटेच होते. दिल्लीच्या वास्तव्यात मनापासून वार्तांकन करण्याबरोबर महाराष्ट्र टाइम्समधे 'राजधानीतून' आणि 'जंतरमंतर' दोन साप्ताहिक सदरे अनेक वर्षे मी लिहिली. अशोक जैन यांच्या बहारदार लेखनशैलीचे मॉडेल डोळ्यांसमोर होते, मात्र त्यांची नक्कल कधीही करावीशी वाटली नाही. जी शैली मला जमली, तसे लिहीत गेलो. वाचकांनीही उदार अंत:करणाने ते स्वीकारले. राजधानीत संसद भवनाची वास्तू आणि त्याच्या सभोवतालचा विस्तीर्ण परिसर, माझ्या आयुष्यातल्या अनेक मौल्यवान क्षणांचा साक्षीदार आहे.

महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० साली झाली. जून १९६२मध्ये महाराष्ट्र टाइम्स सुरू झाले. १९६२ ते १९६७ या काळात द्वा.भ. कर्णिक या पत्राचे पहिले संपादक होते. १९६७ साली संपादकपद गोविंदराव तळवलकरांकडे चालत आले. वयाच्या पंचाहत्तरीपर्यंत तळवलकर संपादक होते. त्यांच्या कारकिर्दीत मला १९९१ ते १९९६ असा जवळपास पाच वर्षे काम करण्याचा योग आला. १९९६ साली तळवलकर निवृत्त झाले. निवृत्तीच्या काही दिवस अगोदर एका कार्यक्रमाच्या निमित्ताने मी त्यांना नाशिकला नेले होते. कार्यक्रम आटोपल्यावर विनायकराव पाटील यांच्या निवासस्थानी, तळवलकरांच्या सन्मानार्थ स्नेहभोजन आयोजित केले होते. तळवलकरांसमवेत यावेळी कुसुमाग्रज, बाळासाहेब दातार, बापूसाहेब उपाध्ये, श्रीनिवास पाटील, मी आणि प्रकाश अकोलकर अशी गप्पांची मैफल रंगली. कुसुमाग्रजांनी तळवलकरांना विचारले, निवृत्तीनंतर तुम्ही मुंबईतच राहणार की आणखी कुठे? गोविंदराव म्हणाले, पुणे, दिल्ली, बंगळुरू अशा विविध ठिकाणांचे पर्याय, काही मित्रांनी मला सुचवले आहेत. त्यांचे उत्तर ऐकताच, तुम्ही कुसुमाग्रजांच्या जोडीला नाशिकलाच कायमच्या वास्तव्यासाठी का येत नाही? नाशिकच्या वैभवात आणखी भर पडेल, असा आग्रह आम्ही सर्वांनी केला. विशेष म्हणजे नाशिकचा पर्याय स्वीकारायला तळवलकर लगेच तयार झाले. विनायकरावांनी आपल्या घराशेजारचा मित्राचा रिकामा प्लॉट लगेच तळवलकरांना दाखवला. महिन्याभरात त्याचे खरेदीखत माझ्या हातून झाले. नाशिकला तळवलकरांचा 'अक्षय' बंगला या प्लॉटवर उभा राहिला. तळवलकर नाशिकला आले. वर्षभर 'अक्षय' बंगल्यात राहिले. नंतर अमेरिकेत कन्येकडे पुन्हा निघून गेले. २०१७ सालच्या मार्च महिन्यात तेथेच त्यांची प्राणज्योत मालवली.

तळवलकर यांच्यानंतर २००१ पर्यंत कुमार केतकर महाराष्ट्र टाइम्सचे संपादक होते. प्रचंड व्यासंग, आक्रमक विचारशैली, उत्तम वक्तृत्व, सहकाऱ्यांना हुरूप देण्याची वृत्ती असे अनेक गुण केतकरांमध्ये होते. त्यांच्यातला विशेष गुण म्हणजे आपल्या वार्ताहराने अथवा प्रतिनिधीने दिलेल्या बातमीमागे ते ठामपणे उभे राहायचे. बातमीच्या दोन्ही बाजू प्रसिध्द व्हाव्यात, याबद्दलही ते आग्रही असायचे. केतकरांच्या कारकिर्दीपर्यंत टाइम्स मॅनेजमेंटचा अनावश्यक हस्तक्षेप वृत्तपत्रात नव्हता. २००१ साली भारतकुमार राऊत संपादक झाले. महाराष्ट्र टाइम्सच्या स्वरूपात अनेक बदल त्यांनी घडवले. तरुण पिढीत मटाचे वाचक वाढले पाहिजेत, या दिशेने त्यांचे सारे प्रयत्न होते. मुंबई टाइम्स, म.टा. सन्मान पुरस्कार, राऊत यांच्या कारकिर्दीतच सुरू झाले. कालांतराने शिवसेनेतर्फे राऊत राज्यसभेवर निवडून आले. त्यानंतर अशोक पानवलकर संपादक झाले. पानवलकरांच्या निवृत्तीनंतर पराग करंदीकर महाराष्ट्र टाइम्सचे विद्यमान संपादक आहेत.

लोकसभेच्या २०१४ सालच्या निवडणुकीनंतर, सात वर्षांत भारतात पत्रसृष्टीत झपाट्याने बदल झाले आहेत. देशात घोषित आणीबाणी नसली तरी बहुतांश वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांचे वेगाने अध:पतन झाले आहे. काही सन्माननीय अपवाद वगळले तर बहुतांश प्रसारमाध्यमांच्या मालकांनी, सत्ताधाऱ्यांचे मांडलिकत्व पत्करले आहे. वाहिन्यांवर कोणत्या बातम्या दाखवल्या जाव्यात, बातमीत काय हवे, काय नको, याचे सल्ले, सूचना आणि प्रसंगी आदेशही सत्ताधाऱ्यांची काही पथके धाडू लागली आहेत. प्रसारमाध्यमे आता सत्ताधाऱ्यांना अनुकूल 'मेक टू ऑर्डर' बातम्या तयार करणारे कारखाने बनत आहेत. निर्भीड पत्रकारितेचा त्यात नि:संशय संकोच झाला आहे. या अंधारयात्रेत अनेक ध्येयवादी तरुण पत्रकारांनी आपल्या नोकऱ्या गमावल्या. नव्याने सुरू झालेला ओटीटी प्लॅटफॉर्म अद्याप मनोरंजनापुरता मर्यादित आहे. त्यात व्यापक बदल झाला तर खऱ्या बातम्या आणि चांगल्या वृत्तविश्लेषणाला त्यात कितपत संधी मिळेल, याची आज कोणालाही शाश्वती नाही. सकस विचारांच्या वृत्तपत्रांना आणि वाहिन्यांना, डिजिटल मीडिया काही फारसा सुखावह पर्याय नाही. तळवलकरांच्या काळापासून चालत आलेला महाराष्ट्र टाइम्स अशावेळी आठवल्याशिवाय राहत नाही. महाराष्ट्र टाइम्स ६० ला हार्दिक शुभेच्छा देताना, स्मरणरंजनातली ही काही पाने आहेत. या सोनेरी कालखंडाचा समावेश इतिहासाच्या अडगळीत होऊ नये, इतकीच अपेक्षा आहे.

**– सुरेश भटेवरा**
भ्रमणध्वनी : ९८१०५३५५७०
suresh.bhatewara@gmail.com

# मनोरंजनाच्या दुनियेत 'श्रावण क्वीन'चं महत्त्व



**अपर्णा पाटील**

**मिस** इंडियाप्रमाणे 'महाराष्ट्र टाइम्स'ने 'श्रावण क्वीन' ही सौंदर्यस्पर्धा सुरू केली. मुंबई शहर, उपनगरे आणि ठाणे जिल्ह्यातील तरुण मुलींना या स्पर्धेने एक वेगळाच आत्मविश्वास दिला आहे. शिवाय ग्लॅमरच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकण्यासाठी मदत झाली आहे. या स्पर्धेत उतरणाऱ्या सगळ्याच मुली मनोरंजनाच्या क्षेत्रात येत नसल्या तरी ज्या आल्या त्यांनी अल्पावधीत आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. मॉडेलिंग, सिनेमा, मालिका अगदी वेबसीरिजमध्येही 'श्रावण क्वीन'मधील विजेत्या आणि स्पर्धक मुलींनी आपल्या कामगिरीची दखल घ्यायला लावली आहे. अगदी पुणे, नाशिकमधल्या तरुणींनाही मनोरंजनाच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकण्यासाठी 'श्रावण क्वीन' एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे.

महाराष्ट्र टाइम्सच्या वतीने २००७ मध्ये पहिल्यांदा 'श्रावण क्वीन' ही महाराष्ट्रातील मुलींसाठीची सौंदर्यस्पर्धा मुंबईत सुरू झाली. देशात 'मिस इंडिया' स्पर्धेचे महत्त्व वाढल्यानंतर महाराष्ट्रात शहर पातळीवर अशी एखादी स्पर्धा घेण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. खरे तर श्रावण महिन्यात येणारे अनेक सणवार आणि त्या निमित्ताने महिलांसाठी काही उपक्रम राबवावेत, या दृष्टिकोनातून श्रावणात वेगवेगळे कार्यक्रम घेण्याचे 'महाराष्ट्र टाइम्स'ने ठरवले होते. त्यात पाककलेपासून वक्तृत्व, अभिनय अशा कलागुणांना वाव देणाऱ्या विविध स्पर्धा महिलांसाठी जाहीर करण्यात आल्या होता. त्यात अठरा ते पंचवीस वयोगटातील मुलींसाठी मात्र कोणतीच स्पर्धा नव्हती. ही उणीव भरून काढली ती 'श्रावण क्वीन' या सौंदर्यस्पर्धेने. सुरुवातीला फक्त मुंबई आणि ठाणे जिल्ह्यापुरती मर्यादित असलेली ही स्पर्धा आता महाराष्ट्र टाइम्सच्या पुणे आणि नाशिक आवृत्तीकडून आयोजित केली जाते. त्यात शेकडो मुली सहभागी होतात आणि तीन मुलींना विजेते होण्याची संधी मिळते.

**महाराष्ट्रातील मराठी मुलींसाठी सौंदर्यस्पर्धा असा लौकिक मटा 'श्रावण क्वीन'ला पहिल्याच दिवसापासून मिळाला. श्रावण क्वीनमध्ये भाग घेतलेल्या प्रत्येकीला मनोरंजन क्षेत्रातच करिअर करायचे, असे नसले तरी या इंडस्ट्रीला अनेक चेहरे मिळवून देण्याचं काम केलं आहे.**

'मिस इंडिया'प्रमाणेच या श्रावण क्वीन स्पर्धेचे नियोजन करण्यात येते. आधी नोंदणी, मग पात्रता फेरी असते. ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई या महापालिका क्षेत्रातील मुलींना त्यात सहभागी होता येते. कलागुण, प्रश्नोत्तरांच्या आधारे विजेत्यांची निवड होते. या मुलींचे किमान दहा दिवसांचे ग्रूमिंग सेशन आयोजित करण्यात येते. या दहा दिवसांच्या सत्रात मुलींना रॅम्प वॉकपासून कलागुण सादरीकरणापर्यंतचे प्रशिक्षण दिले जाते. मान्यवरांचं मार्गदर्शन मिळत असतं. दहा दिवसांच्या या प्रशिक्षणामुळे मुलींच्या व्यक्तिमत्त्वाचा अक्षरश: कायापालट होतो.

त्यानंतर अंतिम स्पर्धा आयोजित केली जाते. वीस मुलींमधून आधी दहा जणींची निवड होते, मग पाच मग अंतिम फेरीत तीन विजेत्या मुलींच्या नावाची घोषणा होते. शिवाय बेस्ट स्कीन, बेस्ट हेअर यासारख्या टायटलची बक्षिसे दिली जातात. स्पर्धेच्या अंतिम दोन फेऱ्यांमधील प्रश्नोत्तरे हे स्पर्धा जिंकण्यासाठी अत्यंत महत्त्वाची फेरी असते. त्यामुळे केवळ दिसण्यावर या मुलींची निवड न होता, त्यांच्यातील बुद्धिमत्तेचीही चाचणी घेतली जाते.

या स्पर्धेदरम्यान घेतले जाणारे ग्रूमिंग सेशन हे अधिक महत्त्वाचे असते. दहा दिवसांच्या कालावधीत नामवंत अशा तज्ज्ञांकडून विविध प्रकारच्या मार्गदर्शनातून मुलींचं व्यक्तिमत्त्व खुलवण्याचे काम केले जाते. त्यातून मिळालेला आत्मविश्वास स्पर्धेत उतरलेल्या मुलीच्या पुढील आयुष्यात खूप महत्त्वाचा ठरला आहे. अगदी ज्या मुली मनोरंजनाच्या क्षेत्रात आलेल्या नाहीत, त्यांच्यासाठीही ते फायद्याचे ठरले आहे. तर या स्पर्धेतून ज्या मुली मनोरंजनाच्या क्षेत्रात उतरल्या आहे, त्यांच्यासाठी 'श्रावण क्वीन' हे मोठे व्यासपीठ ठरले आहे.

महाराष्ट्रातील मराठी मुलींसाठी सौंदर्यस्पर्धा असा लौकिक मटा 'श्रावण क्वीन'ला पहिल्याच दिवसापासून मिळाला. श्रावण क्वीनमध्ये

## सिनेसृष्टीत अनपेक्षित प्रवेश



**कुंजिका काळविंट**

'श्रावण क्वीन'मध्ये उतरण्याआधी मी बँकेमध्ये काम करत होते. माझं आयुष्यच वेगळं होतं. आपल्या करिअरमध्ये मी काय करायचं हे ठरवूनही टाकलं होतं. माझा मॉडेलिंग किंवा अभिनयाशी काहीही संबंध नव्हता. श्रावण क्वीननं माझं आयुष्यच बदललं.

मी गिरगावात लहानाची मोठी झाले. २०१६मध्ये केवळ वडिलांच्या आग्रहाखातर या स्पर्धेत उतरले होते. तेही अगदी शेवटच्या क्षणी. या स्पर्धेच्या पहिल्या म्हणजे पात्रता फेरीत उतरले तेव्हा १०५ मुली आलेल्या होत्या. माझा १४वा क्रमांक होता. माझं सादरीकरण झाल्यानंतर दादरहून माझ्या घरी परत गेले. इतक्या मुलींमध्ये आपली निवड होईल, असं वाटलं नव्हतं. तरी मित्रांच्या आग्रहाखातर मी निकाल ऐकायला परत गेले आणि त्या पहिल्या फेरीत माझी निवड झाली.

ग्रूमिंग सेशनमध्ये असलेल्या वीस जणींमध्ये आधीपासून अभिनयाच्या क्षेत्रात असलेल्या किंवा मॉडेलिंग करणाऱ्या मुली होत्या. त्यांच्यापैकी कदाचित मी एकटीच नोकरी करणारी होते. स्पर्धकांमध्ये काही मुली अभिनय, मनोरंजनाच्या क्षेत्रातून आलेल्या होत्या. त्यामुळे आधी मी जिंकेन, असं काही वाटलं नव्हतं. परंतु ग्रूमिंगमध्ये वाढलेल्या आत्मविश्वासामुळे मी जिंकण्यासाठी का प्रयत्न करू नये, असं वाटलं. याच आत्मविश्वासमुळेच ग्रूमिंगमध्ये आठव्या दिवशी रात्री मी अंतिम फेरीसाठी तयार केलेला परफॉर्मन्स बदलला.

मी पेन्टोमाइन अॅक्ट करायचं ठरवलं. एका मित्राच्या मदतीने त्या दिवशी सराव केलेल्या परफॉर्मन्सनं पुढचं सगळं आयुष्यच बदललं. शिवाय अंतिम फेरीत प्रश्नोतरांची जी फेरी असते, तीत मला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देताना एक वेगळाच विश्वास मला मिळवून दिला. अंतिम फेरीत मला या स्पर्धेनं काय दिलं, असा प्रश्न विचारला गेला होता. ते उत्तर मी इथेही सांगेन की, या स्पर्धेसाठी आम्ही वीस जण ग्रूमिंग सेशनमध्ये एकत्र आलो होतो. मैत्रिणी झालो होतो. ज्यावेळी स्पर्धेसाठी उतरतो, तेव्हा उरलेल्या मुलींसाठी त्या प्रोत्साहन देण्याचं काम केलं जातं, हेही मी या स्पर्धेच्या निमित्तानं पाहिलं होतं. या सगळ्यातून अभिनयाच्या क्षेत्रात अनपेक्षित असा प्रवेश झाला.

'श्रावण क्वीन'नंतर चित्रपटात आले. त्यानंतर 'स्वामिनी' केलं. त्यानंतर 'चंद्र आहे साक्षीला' केलं. मला आता यापेक्षा वेगळ्या प्रकारच्या भूमिका साकारून पाहायच्या आहेत. मला जे-जे करता येईल ते करून पाहायचं आहे. मला या स्पर्धेच्या निमित्तानं मला 'मटा'नं प्रोत्साहन दिलं आहे. मटा सन्मान पुररस्काराच्या रूपानं कौतुकाची थाप दिली आहे. या स्पर्धेच्या निमित्तानं या मटा परिवाराची सदस्य झाले. मी मला 'मटा बेबी' म्हणते. मी जे काही आहे, ते मटाच्या 'श्रावण क्वीन'मुळेच आहे.

भाग घेतलेल्या प्रत्येकीला मनोरंजन क्षेत्रातच करिअर करायचे, असे नसले तर या इंडस्ट्रीला अनेक चेहरे मिळवून देण्याचे काम केले आहे. सायली पाटील, जुई बेंडखळे, रूपल नंद, प्राची पिसाट, भाग्यश्री लिमये, माधुरी देसाई, रुचिका पाटील, अदिती कन्याळकर, ऋचा अग्निहोत्री अशी असंख्य उदाहरणे सांगता येतील.

'श्रावण क्वीन'विजेत्या पूजा सावंत हिचा सर्वसामान्य घरातील मुलगी ते हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्रीपर्यंतचा प्रवास या क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी प्रेरणादायी ठरला आहे. तिच्याच शब्दांत सांगायचे तर, 'कॉलेजच्या दिवसांत मी अभ्यास एके अभ्यास करायचे. परंतु श्रावण क्वीननं मला एका अनोख्या विश्वात प्रवास करण्याची संधी दिली.' श्रावण क्वीनच्या दुसऱ्याच वर्षात म्हणजे २००८मध्ये पूजाने श्रावण क्वीन स्पर्धा जिंकली होती. त्यानंतर अभिनेत्री म्हणून लोकांसमोर आली. 'क्षणभर विश्रांती' सिनेमातून तिने मराठी सिनेसृष्टीत प्रवेश केला. 'झकास', 'सतरंगी रे', 'पोस्टर बॉइज', 'दगडी चाळ', 'भेटलीस तू पुन्हा', 'लपाछपी' आदी मराठी चित्रपटांत काम केले. त्यानंतर पूजाने 'जंगली' या सिनेमाद्वारे हिंदी सिनेमात प्रमुख भूमिका करण्याइतकी मोठी मजल मारली. या सगळ्या प्रवासाबद्दल बोलताना तिने श्रावण क्वीन स्पर्धेमुळे मिळालेले प्रोत्साहन आणि संधीमुळेच हे करू शकल्याचे सांगितले.

रूपल नंद हिला याच स्पर्धेनंतर सतीश राजवाडेंनी 'मुंबई-पुणे-मुंबई २' या सिनेमासाठी विचारणा केली होती. श्रावण क्वीननंतरच्या प्रयत्नांमुळेच 'गणपती बाप्पा मोरया' आणि 'अस्सं सासर सुरेख बाई' या मालिका सायली पाटीलला मिळाल्या. तर इंजिनीयरिंग करत असलेल्या रुचिका पाटीलच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. स्पर्धा संपल्यानंतर 'असे हे कन्यादान' आणि 'गणपती बाप्पा मोरया' या दोन मालिकाही तिला मिळाल्या. 'मोशन इन इमोशन', 'मॅरेज मटेरिअल' या वेबसीरिजमध्ये काम केलेल्या अदिती कनयाळकरने या स्पर्धेकडे उत्तम संधी म्हणून

## स्पर्धक ते परीक्षक



**शिवानी रांगोळे**

श्रावण क्वीन या स्पर्धेनं मला खूप छान मित्रमैत्रिणी दिल्या. मी आणि सानिया चौधरी एकाच वेळी स्पर्धेत होतो, आता आम्ही दोघी एकाच मालिकेत एकत्र काम करतोय. सिद्धार्थ चांदेकर यांनी मला स्पर्धेचे परीक्षक म्हणून जज केलं होतं, आता आम्ही दोघे एकत्र काम करतोय. एकदा मी शिवराज, सानिया यांनी या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणूनही काम पाहिलंय. कधी काळी या स्पर्धेत मी स्पर्धक म्हणून उतरले होते, त्याच स्पर्धेत परीक्षक म्हणून येण्याची संधी या श्रावण क्वीनमुळे मला मिळाली आहे.

मी या स्पर्धेत उतरण्याआधीच मनोरंजनाच्या क्षेत्रात काम करत होते. २०१२पासून मी मालिकांमध्ये काम करत होते. 'शेजारी शेजारी पक्के शेजारी' मी केलं होतं. पण श्रावण क्वीनविषयी खूप ऐकून होते. विशेषतः ग्रूमिंग सेशनविषयी. मला अभिनयाबरोबरच स्वतःला पर्सनॅलिटी डेव्हलमेंटसाठी म्हणून या स्पर्धेत उतरायचं होतं. त्यानुसार मला लाइफ स्टाइलशी संबंधित टिप्सही मिळाल्या. कुठल्याही मुलीला आपण कसे, किती छान दिसतो, हे माहीत असतं. पण स्वतःचं व्यक्तिमत्त्व कसं खुलवलं पाहिजे, ते मला या स्पर्धेतून शिकायला मिळालं. अभ्यंग कुवळेकर यांनी केलेलं मार्गदर्शन उपयोगी पडलं.

मला प्रामाणिकपणे या स्पर्धेचा अनुभव घ्यायचा होता, म्हणून मी यात सहभागी झाले होते. मी पुण्यातून या स्पर्धेत उतरले होते. मी मॉडेल नाहीये, त्यामुळे कसं काय हे जमेल अशी शंकाही होती. परंतु तिथल्या ग्रूमिंग सेशनमधल्या मैत्रिपूर्ण वातावरणामुळे एखाद्या कार्यशाळेसारखा हा वेळ गेला.

'श्रावण क्वीन'नं मला अशा गोष्टी शिकवल्या ज्या कलाकार म्हणून शिकणं गरजेच्या असतात. अनेकदा असं वाटतं हे फक्त मॉडेलनाच उपयोगी पडणारं आहे, पण कलाकारांनाही ते शिकून घेणं आवश्यक आहे, असं मला वाटतं. त्यानुसार अगदी छोट्या-छोट्या गोष्टीही या निमित्तानं समजून घेता आल्या. दुसरी गोष्ट म्हणजे 'मटा'च्या टीमशी चांगलं नातं झालं. त्यातून मला लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिलं गेलं. माझ्या आयुष्यातली ही सगळ्यात मोठी गोष्ट आहे.

मी आता अभिनेत्री आहे, पण नुसता अभिनयच करावा असं मला वाटत नाही. म्हणून मी लिहिते. मी सायकॉलॉजीशी संबंधित खूप अभ्यास करत असते. मला वाचायला आवडतं. आपल्या प्रोफेशनखेरीज आपल्या आणखी काही बाजू असाव्यात असं मला नेहमी वाटतं.अशा आपल्यात दडलेल्या गोष्टी शोधायला या श्रावण क्वीनसारख्या स्पर्धेची मदत होते, असं मी सांगू शकते.

मी अगदी पहिली-दुसरीत असल्यापासून मी स्पर्धेत उतरत होते. कथाकथन, वक्तृत्वस्पर्धांमध्ये भाग घ्यायचे. मात्र ही स्पर्धा त्यापेक्षा खूप वेगळी होती. मुळात ती स्पर्धा आहे असं वाटण्यापेक्षा आपल्यातलं जे-जे सर्वोत्तम आहे, ते सादर करण्याची ती माझ्यासाठी संधी होती. मी या स्पर्धेत सोलो परफॉर्मन्स करताना मस्तानी म्हणून प्रेक्षकांसमोर आले. तो अनुभव खरंच खूप छान होता. त्याच वेळी 'क्यू'वर चालायचं, 'क्यू' वर थांबायचं, अशा तांत्रिक गोष्टीही समजल्या.

ज्यांच्याबरोबर काम केलं ते परीक्षक म्हणून माझ्यासमोर होते. विभाताई, सिद्धार्थ चांदेकर परीक्षक होते. त्यामुळे स्पर्धेपेक्षाही, जिंकण्याइतकंच मला तिथे काय शिकायला मिळेल, यात रस होता. त्यामुळे त्या ग्रूमिंग सत्रात जे शिकवलं ते मी खूप चांगल्याप्रकारे ते समजून घेतलं. त्याचा कलाकार आणि नेहमीच्या आयुष्यात उपयोग होतोच.

सध्या मी 'स्टार प्रवाह'वरील 'सांग तू आहेस का' ही मालिका करत आहे. महिन्यातले वीस-पंचवीस दिवस चित्रीकरण सुरू असल्यानं बिझी आहे. याशिवाय गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'शी' यावेबसीरिजच्या दुसऱ्या सिझनसाठीही चित्रीकरण सुरू आहे.

## यशातला वाटा मोठा



योगिता चव्हाण

श्रावण क्वीनमध्ये येणारी प्रत्येक मुलगी ही फॅशन किंवा सिनेइंडस्ट्रीतच येईल, असं नाही. पण या स्पर्धेनं सहभागी झालेल्या प्रत्येक मुलीला ती ज्या क्षेत्रात काम करते, तिथे काम करण्याचा आत्मविश्वास मिळवून देण्याचं काम केलं आहे.

श्रावण क्वीन महाराष्ट्रात लोकप्रिय आहे. मराठी मुलींसाठी सुरू झालेली ती पहिली, एकमेव सौंदर्यस्पर्धा आहे. २०१६मध्ये मी अभिनयाच्या क्षेत्रात यायचं निश्चित केलं, तेव्हा या स्पर्धेत उतरायचं, हे मी ठरवलं होतं. ही स्पर्धा श्रावण महिन्यात होते, हे सगळ्यांनाच माहीत आहे. त्यामुळे यात भाग घेऊन सहा महिने आधीपासून त्याची तयारी सुरू केली होती. या स्पर्धेमुळे मला खूप काही गोष्टी शिकायला मिळाल्या. शिस्त तर आलीच, त्यासह कसं चालावं, कसं बोलावं, इतक्या आमच्या बारीकसारिक गोष्टींची तयारी करून घेण्यात आली. वेगवेगळ्या क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळालं. प्रश्नांची उत्तरं कशी द्यावीत, हेही शिकवण्यात आलं. त्यातून दहा दिवसांत आत्मविश्वास वाढत गेला. श्रावण क्वीन स्पर्धेच्या अंतिम फेरीपूर्वी केलं जाणारं दहा दिवसांचं ग्रूमिंग सेशन तुमचं व्यक्तिमत्त्वच बदलून टाकतं. माझ्यासाठी तो प्रवास खूपच छान होता. त्या दिवसांत आम्ही मेहनतही केली.

ही स्पर्धा जिंकल्यानंतर मला बरेच लोक ओळखायला लागले. मटामध्ये लेख, फोटो यायचे त्यामुळे ऑडिशनसाठी बोलावलं जायचं. वेगळी ओळख निर्माण झाली. अर्थात स्पर्धा जिंकल्यानंतर मलाही संघर्ष करावा लागला. मात्र श्रावण क्वीनमुळे या क्षेत्रात पुढे जाणं थोडं सोपं झालं. आमच्यावेळी तर संधी कमी होत्या. आता श्रावण क्वीन स्पर्धेत उतरणाऱ्या मुलींच्या वाट्याला अधिक जास्त संधी येत आहेत. नुसतीच फिल्म किंवा मालिकांसाठी नाही तर संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी ही स्पर्धा खूपच उपयोगी पडते. स्पर्धेत वेगवेगळ्या फेऱ्या असतात. कलागुण, बुद्धिमत्ता, प्रश्नोत्तरं अशा वेगवेगळ्या कसोट्यांतून पार पडता येतं. ही स्पर्धा मुळात सौंदर्य, फॅशन, ग्लॅमरशी संबंधित आहे. त्यामुळे सहभागी होणाऱ्या मुली या क्षेत्रात येण्याच्या प्रयत्नात असतात, त्यांना आत्मविश्वास देण्याचं काम या स्पर्धेनं केलं आहे. आज या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मुलींना मिळणाऱ्या संधीही अधिक आहे, हे लक्षात घ्यायला हवं.

मी या स्पर्धेपूर्वीही स्टेजवर काम केलेलं होतं, पण या स्पर्धेतून मिळलेला आत्मविश्वास वेगळाच होता. इथे स्टेजवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं द्यायची असतात. त्यामुळे आत्मविश्वास वाढला. श्रावण क्वीन ही नुसती सौंदर्यस्पर्धा नाही, तर ही स्पर्धा तुमचं संपूर्ण व्यक्तिमत्त्व खुलवते.

मी ठाण्यात जन्मले, लहानाची मोठी झाले. आधी 'मराठी बाणा' केलं होतं. त्यानंतर हिंदीमध्ये बॅकग्राऊंड डान्सर म्हणूनही काम केलं. त्यावेळी बॅकग्राऊंडमधल्या गर्दीमधून समोर यायला हवं, असा विचार केला आणि ती संधी मला श्रावण क्वीननं मिळवून दिली. 'श्रावण क्वीन'च्या प्रवासाने मला वेगळाच आत्मविश्वास दिला. ज्यांना मी पडद्यावर पाहिलं होतं, त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. अंकुशबरोबर मी नुकतंच काम केलं. ज्यांचा अभिनय पाहून मी लहानाची मोठी झाले, आज त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळली. हे श्रावण क्वीनमुळे माझ्या वाट्याला आलं.

नुकतीच माझी कलर्स वाहिनीवर 'जीव माझा गुंतला' ही मालिका सुरू झाली आहे. मी यात रिक्षा ड्रायव्हर मुलीची भूमिका करतेय. मी आजवर जे यश मिळवलंय, त्यात 'श्रावण क्वीन'चावाटा मोठा आहे.

पाहिले आणि त्या संधीचे सोनेही केले. या स्पर्धेनंतर मला फॅन शोज मिळाले. 'पुढचं पाऊल', 'स्वप्नांच्या पलीकडले', 'नकळत सारे घडले' अशा काही मालिकाही मिळाल्या, हे सांगताना श्रावण क्वीनने आपल्याला घडवल्याची प्रतिक्रिया प्राची पिसाट हिने दिली होती. या स्पर्धेमुळे माधुरी देसाईला 'पुढचं पाऊल', 'एक नंबर' या मालिका तसेच काही नाटकांत अभिनय करण्याची संधी मिळाली. ऋचा अग्रिहोत्री ही 'ढोलकीच्या तालावर'मध्ये नृत्यांगना म्हणून सहभागी झाली. त्यानंतर 'घाडगे अँड सून' मालिकेतही चमकली. अशी अनेक उदाहरणे सांगता येईल.

श्रावण क्वीन स्पर्धेत सहभागी झालेल्या, विजेत्या झालेल्या मुली आज अभिनय, मनोरंजनाच्या श्रेत्रात स्थिरावत आहेत. कधी स्पर्धक असलेल्या मुलींना या क्षेत्रात स्वतःच्या मेहनतीवर स्थान निर्माण केल्यानंतर आता या स्पर्धेच्या परीक्षक म्हणूनही निमंत्रित करण्याचा सुखद अनुभव मिळाला आहे.

**– अपर्णा पाटील**
भ्रमणध्वनी : +९१ ८९८३८२०२०२
aparna.patil1@gmail.com



# ‘मटा’ने गोव्यात वाचकांची पिढी घडवली

**संजय ना. ढवळीकर**

**स्थापनेची** साठी पूर्ण करीत असलेल्या ‘मटा’ म्हणजेच ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये बारा वर्षे काम करण्याची संधी मिळाली हा मी माझा मोठा गौरव समजतो. मराठी पत्रकारितेची भरभराट जेथे झाली त्या मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर यासारख्या ठिकाणी माझे मूळ नव्हते; पत्रकारितेशी माझ्या पूर्वजांचा सुतराम संबंध नव्हता. महाराष्ट्राबाहेर गोव्यात माझे मूळ. घरातील कोणाचेही पत्रकारितेशी काही नाते होते ते फार तर वर्तमानपत्राचे वाचक एवढ्यापुरते. तरी पत्रकार व्हायचे आहे हे माझे ठरलेले होते. एकदा पत्रकार बनल्यानंतर महत्त्वाकांक्षा होती ती ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये काम करण्याची. गोव्यात बी.कॉम. करून पत्रकारितेच्या शिक्षणासाठी पुण्यात गेलो. तेथे बी.सी.जे पदवी मिळवण्याबरोबरच ‘तरुण भारत’ आणि ‘केसरी’ या वर्तमानपत्रांतून प्रत्यक्ष पत्रकारितेचे शिस्तबद्ध धडे घेतले आणि गोव्यात परतलो. परंतु पुण्यातील पत्रकारितेचा अनुभव घेतल्यानंतर गोव्यात मन रमेना. तेव्हाच मुंबईत जाण्याचे वेध लागले, अर्थात ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये आपल्याला संधी कशी मिळेल या विचारात तेव्हा मी असायचो. १९९२ मध्ये उपसंपादक या पदावर काम करण्यासाठी माझी निवड झाली तेव्हा स्वप्नपूर्तीचा आनंद काय असतो याचा मी अनुभव घेतला.

‘पत्र नव्हे मित्र’ असे बिरुद लेऊन ‘महाराष्ट्र टाइम्स’ तेव्हा मराठी वाचकांमध्ये सन्मानाचे स्थान प्राप्त करून होता. बुद्धिजीवींचे वर्तमानपत्र असे वलय या वर्तमानपत्राभोवती होते. अर्थात प्रदीर्घ काळ संपादक म्हणून काम केलेल्या गोविंद तळवलकर यांच्यामुळे हे वलय निर्माण झाले होते. ‘मटा’ आपल्या घरात असणे ही बाब हजारो मराठी घरांमध्ये प्रतिष्ठेची समजली जायचीच, त्याचबरोबर या वर्तमानपत्रात स्वत:संबंधीची बातमी किंवा आपण लिहिलेला लेख प्रसिद्ध होणे हे तर फारच कौतुकाचे ठरायचे. वाचन, चिंतन, अभ्यास आणि लेखन या महामार्गावर ठामपणे राहिलेल्या गोविंद तळवलकरांच्या व्यासंगाची किनार ‘महाराष्ट्र टाइम्स’ला लाभली होती यात आश्चर्य ते काय! लार्जर दॅन लाइफ अशी प्रतिमा बनलेल्या तळवलकरांनी माझी मुलाखत घेऊन अनेक उमेदवारांमधून उपसंपादकपदासाठी माझी निवड केली ही बाब मी अजूनही अभिमानाने सांगत असतो. उपसंपादक घेण्यासाठी तेव्हा आधी लेखी परीक्षा व्हायची आणि त्यात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी निवडले जायचे. स्वत: तळवलकर, आणखी एक दोन ज्येष्ठ संपादकीय सहकारी, व्यवस्थापनातील ज्येष्ठ अधिकारी, मनुष्यबळ विभागप्रमुख असे मोठे पॅनेल समोर बघून मुलाखत देण्यासाठी आलेला उमेदवार सर्वप्रथम हादरून जायचा. मुलाखतीतून तावूनसुलाखून निघालेल्यांची अंतिम निवड व्हायची. अतिशय काटेकोर असलेल्या या निवड प्रक्रियेमुळे त्यावेळी ‘महाराष्ट्र टाइम्स’मध्ये रुजू होणारे उपसंपादक हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले हुशार युवक-युवती असत. माझ्या निवडीने त्यात १९९२ मध्ये गोव्यातील एका उपसंपादकाची भर पडली!

अनेक उपसंपादकांमधील एक बनून मुंबईत काम करत असताना दर्जेदार सहकाऱ्यांच्या संगतीमुळे आपण या क्षेत्रात ज्ञानाने कसे श्रीमंत बनत चाललो आहोत याची जाणीव व्हायची आणि अधिक चांगले काम करण्याचा, नवीन तंत्र शिकण्याचा हुरूप वाढायचा. प्रकाश अकोलकर, अशोक जैन, संजीव साबडे, सतीश कामत, प्रकाश बाळ, दिवाकर देशपांडे, वि.वि. करमरकर, अशोक पानवलकर, चंद्रशेखर कुलकर्णी, नितीन वैद्य, सुरेश भटेवरा यांसारखे

**महाराष्ट्र टाइम्स हे महाराष्ट्रातील दैनिक. त्यातही नवीन सहस्रकाच्या पहिल्या दशकापर्यंत या दैनिकाचा मुंबईवर बहुतांश भर असायचा. तरी गोव्यातील चोखंदळ वाचकांमध्ये या दैनिकाला आदराचे स्थान मिळाले होते ते मुख्यत: दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण वाचनाची भूक भागते म्हणून. गोव्यात गांभीर्याने वाचणाऱ्यांची पिढी घडवण्याचे काम मटाने केले यात शंकाच नाही.**

दिग्गज आपल्या ज्येष्ठतेचा बाऊ न करता आमच्यात मिसळून काम करत असत. त्यांच्या वर्तुळात वावरून आत्मविश्वासाचा स्तर उंचावल्याचा अनुभव घेता आला. १९९२ ते १९९६ या काळात मी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मुंबईत काम केले. मुख्यत: न्यूज डेस्कवर उपसंपादक म्हणून काम करत असताना रिपोर्टिंगची थोडीफार कामगिरी बजावायला मिळाल्यामुळे मुंबईचे पाणी चाखता आले. निवडणुकांचे वृत्तांकन करण्यासाठी मध्य प्रदेश, कोकण, गोवा आदी प्रदेशांतून हिंडलो. प्रत्येक ठिकाणी 'मटा'चा उच्चार करताच कमालीचे कुतूहल आणि आदर जाणवत असे. गोव्यातून मुंबईत माझ्यामागोमाग आलेला मित्र इब्राहिम अफगाण, मृण्मयी रानडे, मुकेश माचकर, रोहित चंदावरकर, अभिजित ताम्हणे, प्रवीण टोकेकर, सारंग दर्शने, आशा कबरे-मटाले, संजय परब, शरद कद्रेकर यांसारख्या बरोबरीच्या सहकाऱ्यांमुळे हा काळ पत्रकारितेच्या दृष्टिकोनातून सुवर्णकाळ होता असे मी म्हणेन.

कुमार केतकर 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक म्हणून आले तेव्हा साहजिक वर्तमानपत्राचे स्वरूप बदलले. एवढेच नव्हे तर कार्यालयातील वातावरणाचा नूरही पालटला. जणू काही सगळेच काही वर्षांनी तरुण बनले आणि 'महाराष्ट्र टाइम्स' स्मार्ट मित्र बनला, राजकीय आणि इतर विषयांवर थेट आणि ठाम भूमिका घेऊन वाद ओढवून घेण्यातही अग्रेसर बनला. पत्रकार हा पूर्णपणे तटस्थ राहून काम करू शकत नाही, त्याने भूमिका घेतली पाहिजे; ही भूमिका व्यापक सामाजिक न्यायाच्या बाजूने झुकणारी असली पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या केतकरांनी मा यासारख्या तरुणांना पुढे जाण्याबाबत तेव्हा निश्चित दिशा मिळवून दिली. वैयक्तिक मते काहीही असली तरी पत्रकारिता समाजाच्या हिताच्या दृष्टिकोनातून केली पाहिजे हा मंत्र केतकरांकडून तेव्हा 'मटा'मधील माझ्यासारख्या उपसंपादकांनी घेतला.

केतकर संपादक असताना १९९६ मध्ये 'महाराष्ट्र टाइम्स'च्या संपादकीय विभागात काही बदल करण्यात आले. तेव्हा गोव्यात प्रतिनिधी म्हणून काम करणारे गिरीश कुबेर यांची मुंबईत बदली झाली आणि गोवा प्रतिनिधी म्हणून मला मा या राज्यात जाण्याची संधी मिळाली. काही वर्षांसाठी गोव्यात जाऊन नंतर मुंबईत परतायचे असे केतकरांशी बोलून मी १९९६ मध्ये 'महाराष्ट्र टाइम्स'चा गोवा प्रतिनिधी म्हणून पणजीत दाखल झालो. पुढे वेगवेगळ्या कारणास्तव मुंबईत परतणे झाले नाही, गोव्यात चांगल्या संधीही मिळाल्या. स्थानिक वर्तमानपत्रांतून विविध पदे भूषवत संपादक पदापर्यंत पोहोचता आले. दोन मराठी वर्तमानपत्रे सुरू करण्याची संधी मिळाली. त्यानंतर नुकतीच राज्य माहिती आयुक्त या पदावर निवड झाल्यामुळे पत्रकारितेतून बाजूला होऊन नवीन पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. या संपूर्ण वाटचालीत 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मिळालेला अनुभव, तेथे अनुभवलेले दर्जेदार व्यावसायिक वातावरण, या वर्तमानपत्राने मिळवून दिलेली प्रतिष्ठा आणि ओळख या बळावर कधी कोठे काही कमी पडले नाही.

महाराष्ट्रात आघाडीचा आणि प्रतिष्ठेचा असलेला 'महाराष्ट्र टाइम्स' गोव्यातही विशेष आपुलकीने वाचला जायचा. डिसेंबर १९६१ मध्ये पोर्तुगीजांच्या राजवटीतून गोवा मुक्त झाला आणि काही महिन्यांत मुंबईत 'महाराष्ट्र टाइम्स' सुरू झाला. सुरुवातीच्या अनेक वर्षांत 'महाराष्ट्र टाइम्स' गोव्यात पोहोचायचा तो दुसऱ्या दिवशी; तरी आवडीने आणि आपुलकीने वाचला जायचा. बहुधा १९८० दशकात 'महाराष्ट्र टाइम्स' गोव्यात विमानाने येऊ लागला. पार्सल दुपारी विमानतळावर पोहोचायचे, पेपर वाचायला मिळेपर्यंत संध्याकाळच्या चहाची वेळ व्हायची, तरी वाचकांची काही तक्रार नसायची. त्यानंतर सकाळच्या विमानाने येऊ लागल्यापासून गोव्यातील वाचकांना दुपारी जेवणानंतर 'महाराष्ट्र टाइम्स' वाचायला मिळू लागला. नवीन सहस्रकात पर्यटन वाढले, प्रवाशांची संख्या वाढली, तशी विमानांची संख्याही वाढली आणि 'महाराष्ट्र टाइम्स'



**कोल्हापुरातील जगन फडणीस ट्रस्टचा स्व. जगन फडणीस स्मृती शोधपत्रकारिता पुरस्कार निखिल वागळे यांच्या हस्ते स्वीकारताना (२००२)**



**महाराष्ट्र टाइम्स प्रतिनिधी म्हणून काम करत असताना तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी गोव्यात सुटीसाठी आले होते, तेव्हा झालेली भेट. (२००३)**



**गोव्यात भरलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जब्बार पटेल यांच्यासोबत**

सकाळीच गोव्यात दाखल होऊ लागला. तरी भल्या सकाळी दारात येणाऱ्या स्थानिक वर्तमानपत्रांच्या बरोबरीने मुंबईतील पेपर येऊ शकत नसत. मुंबई, बंगळुरू येथील दैनिके गोव्यात सकाळी दहाच्या सुमारास उपलब्ध होतात. अर्थात कोरोनाच्या प्रसारानंतर सगळेच चित्र बदलले, गोव्याबाहेरील वर्तमानपत्रे येणे जवळपास बंदच झाल्यामुळे गोवेकरांना स्थानिक वर्तमानपत्रांवरच आपली वाचनाची तहान भागवावी लागली. त्याचबरोबर हातातील मोबाइलवर ई-पेपर, वेबसाईट वाचण्याची सवय लागली. त्याआधीच्या काळात महाराष्ट्र टाइम्सचा असा एक वाचकवर्ग गोव्यात तयार झाला होता. संपादकीय पान आणि पुरवण्या, पुस्तकपरीक्षणे वाचण्यासाठी या दैनिकाला प्राधान्य मिळायचे. महाराष्ट्राच्या विविध भागांतील तसेच वेगवेगळ्या राज्यांतील प्रादेशिक वार्तापत्रे वाचणे हे गोव्यातील वाचकांच्या दृष्टीने आनंददायी असे. 'मराठी मुलखात' या सदरात मी गोव्यावर वेगळ्या अंगांनी लिहिलेली वार्तापत्रे सर्वदूर चांगली वाचली गेली, त्याचबरोबर गोव्याबाहेरील मराठी प्रदेशांत मला चांगली ओळख मिळवून दिली. गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यांवर माडाच्या झावळ्यांनी शाकारलेली, तात्पुरत्या स्वरूपाची रेस्टॉरंट असतात, त्यांना शॅक असे म्हटले जाते. या शॅकबद्दल आणि एकुणातच पर्यटनक्षेत्राबाबत लिहिलेल्या बातम्यांना आणि वार्तापत्रांना चांगला वाचक होता. गोव्यातील तेव्हाच्या एकमेव फार्मसी कॉलेजच्या प्राचार्यांची पीएच.डी बोगस असल्याची माहिती कागदपत्रांसह हातात आल्यानंतर या गौप्यस्फोटाची तीन भागांतील माझी मालिका महाराष्ट्र टाइम्समध्ये पहिल्या पानावर प्रसिद्ध झाली. ही बातमी केतकरांना सांगताक्षणी त्यांनी ती पहिल्या पानावर घेण्याच्या सूचना दिल्या होत्या असे आठवते.

भारतीय जनता पक्षाचे दिवंगत ज्येष्ठ नेते प्रमोद महाजन गोव्याचे प्रभारी होते. १९९० च्या दशकाच्या अखेरीस महाजनांनी आपल्या विशेष मित्रमंडळींसोबत गोव्याच्या समुद्रात खास बोटीवर रात्रभर चाललेली जंगी पार्टी केली होती. मीडियाला याचा थांग लागू नये अशी व्यवस्था असताना मला त्याबाबत माहिती मिळाली आणि त्या रंगलेल्या पार्टीची बातमी मटामध्ये आली. बातमी प्रसिद्ध होताच गाजावाजा झाला, महाजनांनी, कोण हे संजय ढवळीकर, त्यांना ही माहिती कशी मिळाली, अशी विचारणा मनोहर पर्रीकरांकडे केली. पर्रीकरांकडूनच ही हकीगत काही दिवसांनंतर कळली होती.

भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात गोव्यात २००१ मध्ये झालेल्या क्रिकेटच्या एक दिवसाच्या सामन्यात गोवा क्रिकेट असोसिएशनचे तेव्हाचे अध्यक्ष आणि माजी उपमुख्यमंत्री दयानंद नार्वेकर यांनी केलेल्या कथित तिकीट घोटाळ्याच्या आणि त्यानंतर सलग महिनाभर चौकशीबाबतच्या मी लिहिलेल्या बातम्या मटामध्ये ठळकपणे प्रसिद्ध झाल्या. कोल्हापूरच्या स्व. जगन फडणीस स्मृती ट्रस्टने या कामगिरीची दखल घेऊन २००२ मधील पहिल्या जगन फडणीस शोधपत्रकारिता पुरस्काराने मला गौरवले. या प्रकरणात नार्वेकरांना तुरुंगाची हवा खावी लागली. महाविद्यालयांतील आणि विद्यापीठातील गैरकारभाराच्या बातम्यांच्या काही मालिका केल्या, त्यावेळी महाराष्ट्र टाइम्स मुंबईतील दैनिक असूनही त्याचा गोव्यात किती प्रभाव पडतो हे दिसून आले. महाराष्ट्र टाइम्सचा प्रतिनिधी म्हणून आठ वर्षे काम करता आले, यातील बहुतांश काळ कुमार केतकर संपादक होते. त्यांचा कसलाही दबाव नसायचा, आढ्यता नव्हती, त्यामुळे मस्त काम करता आले. केलेल्या बातम्यांना मटामध्ये नेहमीच चांगले स्थान मिळाले.

गोविंद तळवलकर, कुमार केतकर आणि भारतकुमार राऊत हे तीन संपादक माझ्या कारकिर्दीत झाले. तिघांचीही भिन्न प्रकृती, वेगळा पिंड, स्वतंत्र कार्यशैली. गोव्यात राहिल्याचा फायदा असा झाला की या नामवंत संपादकांशी, ते गोव्यात येत तेव्हा वैयक्तिक स्तरावर संवाद साधता आला. तळवलकर गोव्यात आले की ठरावीक मित्रमंडळींना भेटत. गदिमा-सुधीर फडकेंच्या रामायणाचे पडद्यामागील कलाकार सीताकांत लाड, अर्थतज्ज्ञ आणि उद्योजक प्रभाकर आंगले, वास्कोतील माजी आमदार आणि उद्योजक वसंत जोशी हे तळवलकरांचे खास मित्र. त्यांच्याशी गप्पांचा अड्डा जमवल्याशिवाय तळवलकरांना चैन पडत नसे. दुर्दैवाने यातील

कोणीच आता हयात नाही. एकदा तळवलकरांसोबत एकट्यानेच बसण्याची वेळ आली तेव्हा तणाव आला होता. परंतु त्यांचा असा छान मूड लागला होता की रात्रीचे जेवण उरकून कितीतरी तास ते बोलत होते, ज्ञानाचा व माहितीचा तो खजिना मी साठवून ठेवत होतो.

'मटा'चे संपादक असताना तसेच नंतरही केतकर बऱ्याचदा गोव्यात आले, दर वेळी कोणत्या ना कोणत्या कार्यक्रमाच्या निमित्ताने. केतकरांचा लोकसंग्रह अफाट. ते येणार हे समजताच अनेकांकडून त्यांना भेटण्यासाठी, बोलण्यासाठी, पुढील कार्यक्रमाला बोलावण्यासाठी, घरी चहाला-जेवणाला येण्याचे आग्रह व्हायचे. केतकरांचे वैशिष्ट्य आणि मोठेपणा असा की वेळ काढून प्रत्येकाच्या विनंतीला मान देण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. केतकर माझ्याही घरी काही वेळा येऊन गेले याचे घरातील सगळ्यांनाच भारी अप्रूप! राऊतांच्या काळात मी गोव्यात असल्यामुळे त्यांच्याशी कार्यालयीन कामाव्यतिरिक्त फारसा संपर्क आला नाही. २००४ मध्ये मी महाराष्ट्र टाइम्सचा निरोप घेतला.

महाराष्ट्र टाइम्स हे महाराष्ट्रातील दैनिक. त्यातही नवीन सहस्रकाच्या पहिल्या दशकापर्यंत या दैनिकाचा मुंबईवर बहुतांश भर असायचा. तरी गोव्यातील चोखंदळ वाचकांमध्ये या दैनिकाला आदराचे स्थान मिळाले होते ते मुख्यत: दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण वाचनाची भूक भागते म्हणून. गोव्यात गांभीर्याने वाचणाऱ्यांची पिढी घडवण्याचे काम मटाने केले यात शंकाच नाही. राजकारण, व्यवसाय, उद्योग, शिक्षण आदी क्षेत्रांतील नामवंत मटाची दखल हटकून घेत. मी मुंबईतून गोव्यात येताच तत्कालीन मुख्यमंत्री प्रतापसिंग राणे, माजी मुख्यमंत्री शशिकला काकोडकर यांच्याशी लगेचच विनासायास चांगला परिचय झाला तो मटामुळे. माजी उपमुख्यमंत्री रमाकांत खलप, बांदोडकरांच्या काळातील शिक्षणमंत्री प्रा. गोपाळराव मयेकर हे तर जवळचे मित्र बनले. पुढच्या काळात मनोहर पर्रीकरांचा राजकारणात उदय झाला, ते इतर वर्तमानपत्रांबरोबर मटाचेही चिकित्सक वाचक. 'मटातील तुझ्या बातम्यांमुळे आपली महाराष्ट्राला चांगली ओळख झाली' असे ते नेहमी सांगत; टीकात्मक बातमीवर वादही घालत. उद्योजक अवधूत तिंबलो, श्रीनिवास धेंपे, दत्तराज साळगावकर आदींना मटा परिचित असायचा. गोवा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. दुभाषी, प्रा. सोंदे, दिलीप देवबागकर आदी मटाचे नियमित वाचक होते. गोव्यात कामासाठी येणारे मराठी सरकारी अधिकारी, व्यावसायिक, कंपन्यांचे बडे अधिकारी यांना मटा वाचायला हवा असायचा. अशा वाचकांपर्यंत महाराष्ट्र टाइम्स पोहोचवणे ही जणू काही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे असे मटावर नितांत प्रेम करणारे पणजीतील पुस्तक व वृत्तपत्रविक्रेते वामन भाटे यांना आजही वाटते.

जवळपास साडेतीन दशके पत्रकारितेत गेली, त्यातील 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मुंबईत चार आणि गोव्यात आठ, असा बारा वर्षांचा काळ हा माझ्या पत्रकारितेच्या कारकिर्दीतील सुवर्णकाळ. आधुनिक काळात वृत्तपत्र पत्रकारिता आणि एकुणातच पारंपरिक माध्यमे मागे पडू लागली आहेत हे वास्तव आहे. 'टिकून राहण्यासाठी' आपले पारंपरिक स्वरूप बदलण्याची प्रक्रिया मराठी वर्तमानपत्रसृष्टीत मटाने सर्वात आधी सुरू केली. मात्र मटाचे बदललेले, बदलणारे स्वरूप किती वाचकांना पसंत पडले हा प्रश्नच आहे. अशा परिस्थितीत साठीनंतरचा 'महाराष्ट्र टाइम्स' नवीन आव्हानांना सामोरा जाण्यासाठी सरसावून तयारी करेल आणि बहुसंख्य वाचकांच्या पसंतीला उतरेल अशी अपेक्षा आहे.

**– संजय ढवळीकर**
भ्रमणध्वनी : +९१ ९८८१०९९२३९
sanjay139@gmail.com

ग्रंथाली




# नाटक
## काही निरीक्षणे काही परीक्षणे
**प्र.ना. परांजपे**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**


लेखकाने ज्या नाटकांबद्दल लिहिले आहे ती नाटके तर कधीच विसरली गेलेली आहेत. त्या नाटकावरचे लेखन पन्नास-साठ वर्षानंतरही ताजे आणि अद्ययावत वाटते. कारण जगभराची नुसती नाट्यसमीक्षाच नव्हे तर इतरही समीक्षा वाचून प्रगल्भ झालेल्या लेखकाने ते लिहिले आहे म्हणून. **– महेश एलकुंचवार (प्रस्तावनेतून....)**

# राजा कालस्यकारणम्
**बा.ग. केसकर**




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

'राजा कालस्यकारणम्...' या पुस्तकात एका साखर कारखान्याच्या संदर्भातल्या घडामोडींमधून चितारलं चित्रण अस्वस्थ करणारं. कादंबरीत ते एका भागातल्या एका कारखान्यापुरतं मर्यादित असलं तरी प्रातिनिधिक म्हणता येणारं. स्थानिक पातळीपासून जागतिक स्तरापर्यंत अनेक उदाहरणं पाहिली तर त्याची साक्ष पटेल. **– विजय कुवळेकर**




# निसर्ग आणि पुस्तकांच्या सहवासात रमणारा अवलिया

**विनोद पवार**

**सतीश** काळसेकर मला चळवळीतले आणि मोठे कवी म्हणून माहीत होते. खऱ्या अर्थानं आमची प्रत्यक्ष भेट झाली ९४-९५ च्या सुमारास, पार्ले स्टेशनवर. नुकताच कलाग्रामचा 'चित्रकुटीर' हा पेण इथला, लॉरी बेकर शैलीतील घरांचा प्रकल्प सुरू होणार होता. काळसेकर त्यात होते. मुंबईत मीटिंग व्हायच्या. तेव्हा काळसेकर मागे बसलेले असायचे, चेहऱ्यावर एक मंद हसू घेऊन.

तिथे आमची जुजबी ओळख झाली होती. ही स्टेशनवरची भेट लक्षात राहणारी. तेच मंद स्मित.



सतीश काळसेकर

म्हणाले, ''तुम्ही आहात म्हणजे नक्की होणार चित्रकुटीर.'' पंधरा मिनिटं उभं राहूनच गप्पा झाल्या.

''आता मी निवृत्त होणार आहे. मग ठरवलं आहे पेणलाच जायचं. खूप वाचायचं आहे, लिहायचं आहे. निसर्गात राहायचं हे नक्की.''

''काय वाचतोस? हे वाचलं का?'' या नोट वर गप्पा संपल्या.

अनेक अडचणींना सामोरे जाऊन चित्रकुटीर तयार झालं. पेण शहरापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावरच्या आंबेघर गावातील छोट्या डोंगरावर कलाकार आणि कलेवर प्रेम करणाऱ्यांनी केलेला हा प्रोजेक्ट. साधारण ४८ घरे डोंगरात खुपसलेली. लॉरी बेकरचा शिष्य जय गोपाळ यानं सर्वांच्या मुलाखती घेऊन ज्याला हवं तसं घर डिझाईन केलं. प्रत्येकाचं घर वेगळे वेगळं. त्याच्या आवडी आणि छंद लक्षात घेऊन. काळसेकर यांचं घर लेखकाचं, कवीचं, आणि मुळात वाचणाऱ्याचं. तशी त्याची रचना. निळू दामले, अशोक शहाणे, गोपी कुकडे, सुनील महाडिक, चित्रकार दीपक शिंदे, अनिल नाईक, रोहिणी हट्टंगडी, राणी वर्मा, वंदना गुप्ते, बाळा ठाकूर, दिलीप वारंग, अजित दांडेकर, राजू शुक्ला आणि खूप जण. प्रत्येकाचं घर वेगळं.

खूप धापा टाकत १९९९-२००० ला चित्रकुटीर पूर्ण झालं. त्या काळात आम्ही साधारण दर शनिवारी-रविवारी पेणला जायचोच.

प्रकल्प पूर्ण झाला आणि आमचं जाणं कमी कमी होत गेलं. मात्र काळसेकर आणि त्यांच्या पत्नी चक्क मुंबईतून कायमचे पेणला आले. साप, उंदीर आणि त्यांच्या पुस्तकांच्या गराड्यात हा माणूस तिथं एकवीस वर्षं राहिला. आपल्या चेहऱ्यावरचं मंद स्मित तसेच ठेवून.

प्रसिद्ध लेखक जयंत पवारनं एका लेखात लिहिलं आहे, ''शंकर-पार्वतीसारखे काळसेकर दाम्पत्य पेणच्या डोंगरावर तब्बल वीस वर्षं राहत आहे एकटे! तिथे विजेचा तुटवडा, नेटवर्क जवळजवळ नाहीच. पण काळसेकर कुठलीही तक्रार करत नव्हते. ४८ घरांपैकी एकच घर सदैव राहते आणि सगळ्यांच्या स्वागतासाठी उघडे म्हणजे कबिरा.''

मला म्हणायचे काळसेकर, ''येत जा रे. तुम्ही एवढे कष्ट घेतले. आता आस्वाद घ्यायला या.''

माझी बायको अरुणा आणि मी बऱ्याचदा पेणला जायचो. अरुणा आणि मी 'कबिरा'ला भेट द्यायचोच. मग काळसेकर आमच्या घरी यायचे.

एका रात्री पेणला अरुणानं घरी जेवण बनवलं. मला दिनेश गुणे भेटले. त्यांच्याकडे पाहुणे आले होते. तेही आमच्याकडे जेवायला आले. एवढं कौतुक केलं अरुणाचं की बोलायची सोय नाही. पार्टी संपली आणि म्हणाले, 'आमची अरुणा, अहो, ती

मालवणची आहे. आमच्या गावाकडली.'

आणि अरुणा पवार काळसेकरांच्या घरातली एक झाली.

नवी खरेदी झाली की काळसेकर कुटुंबाला अरुणा सांगायचीच. एवढे एकरूप होऊन गेले होते.

आमचा मुलगा दहावी पास झाला तेव्हा ते आमच्या जोगेश्वरीच्या घरी आले. ऋतूसाठी 'एक होता कार्व्हर' आणि माझ्यासाठी अरुण टिकेकरांचं 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी' असं देणं त्यांनी शेवटपर्यंत चालू ठेवलं. खूप लोभ आणि माया दिली आमच्या कुटुंबाला. अरुणावर तर विशेष लोभ होता.

अरुणा गेली तेव्हा आमच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांनी अरुणावर छोटेखानी भाषण केलं होतं. एवढ्याशा छोट्या भाषणात त्यांनी अख्खी अरुणा उभी केली.

मी म्हणालो, मला लिहून द्या ना. मी पुस्तक करतोय. त्यातच लेख घायचाच आहे.

म्हणायचे, खूप आठवण येते रे तिची. लिहीन. नक्की. तो दिवस ११जुलै २०२१. रविवार. अरुणावरचा अगदी आत्मीयतेनं लिहिलेला लेख मला दिला.

त्यांनी लिहिलं आहे - ''धाकट्याचे मरण हे नेहमीच क्लेशदायक आणि सहन करण्यास कठीण असते. मी दीर्घायुषी असल्याने माझ्या आयुष्याला या सगळ्यांची किनार आहे. अरुणाचे जाणे हे अवेळी होते. आताही आमच्या दगडी पायऱ्यांवरून घरात झेपावणारी अरुणा डोळ्यांसमोर दिसते. 'मी आले' ही तिची पायांवरील हाक मला जाग आणायची. अरुणात सतत देण्याची ओढ होती. ती नेहमीच काहीतरी घेऊन यायची. रिकाम्या हाताची अरुणा असा आमचा कधीच अनुभव नव्हता. तिला नटण्याथटण्याची अतिरेकी आवड नव्हती, पण टापटीपपणात ती कुठेच कमी नव्हती. तिचे आमच्यावरचे आणि आमचे तिच्यावरचे प्रेम व्यक्त करण्याची तऱ्हा विलक्षण होती. एकाचवेळी अरुणा माझ्यासाठी 'थोरली आई' (great mother) आणि 'धाकटी ताई' या दोन्ही भूमिकांत वावरायची. तिच्या चेहऱ्यावरील हास्य कधीही उणावले नाही. त्याही आजारात ती उड्या मारत... आमच्या दारात यायची. या दुर्धर आजारातही देण्याची तिची अंगभूत लय कधी थांबली नव्हती. टाटा हॉस्पिटलच्या आत असताना आणि तिथून बाहेर पडल्यावरही तिची देण्याची सवय सुटली नव्हती. आजारी मुलांना लोकरीचे स्वेटर ती स्वतःहून द्यायची आणि हे करत असताना तिला त्या मुलांच्या चेहऱ्यावरचे निरागस हास्यही पाहता यायचे. एखादी माहेरवाशीण गावाच्या आवारात शिरली की हातातली पिशवी ठेवून तत्काळ वाडीतल्या घरांची ख्याली-खुशाली घेत आपल्या घरी येते, अरुणा तशी होती. तिचे मरण आम्हालाही ठाऊक होते आणि तिनंही ओळखले होते. तरीही तिच्या चेहऱ्यावरचे हास्य मावळतीकडे वळले नव्हते. ती आजही आम्हा दोघांसाठी काहीतरी घेऊन उड्या मारत खाली येईल आणि भेटेल असे वाटत राहते. मरण समोर दिसू लागल्यावर ऋतू या आपल्या मुलाला म्हणाली होती, की पैशांच्या मागे लागू नकोस. माणसे जवळ कर. हेही तिचे सांगणे



'थोरच' आहे.''

लेख दिल्यावर म्हणाले, 'हा अरुणाचा लेख बहुतेक माझ्या आयुष्यातील शेवटचा असं वाटतंय.'

मी म्हणालो, 'काहीतरी काय बोलताय.'

म्हणाले, 'नाही रे आता सुचत. डोळ्यांतून पाणी पण येतं सारखं.'

मग मी विषय बदलला आणि त्यांच्या भ्रमंतीवर बोललो. 'जवळपास अख्खा भारत फिरलो रे विनोद समाधान आहे.'

निसर्गसत्तेवर नितांत विश्वास होता त्यांचा. अखेरची २१ वर्षं ते निसर्गात लिहिते आणि वाचते राहिले.

काळसेकर म्हणजे गप्पांचा फड. त्यात हे वाचलं का. ते नक्की वाच, असायचं. वैचारिक भूमिका पक्की आणि त्यावरची निष्ठा अगदी प्रामाणिक. त्यावर चर्चा अपरिहार्य. साहित्य, कला या पलीकडले मित्र होतो आम्ही.

एकदा श्याम आणि शुभा सामंत यांच्या घरी मी माझ्या परीनं माझी आवडती 'आता आमोद सूनासी आले' ही दि.बा. मोकाशी यांची गोष्ट वाचली. काळोख होताच. मी टॉर्चच्या प्रकाशात गोष्ट वाचली. त्यांनी ती वाचलीच होती आधी, पण जवळपास पन्नास मिनिटं ते श्रोते होते, शांत.

अशा खूप साहित्यिक आठवणी आहेत.

त्यांनी वाचणाऱ्याची रोजनिशी लिहिली तशी कदाचित ऐकण्याऱ्याची रोजनिशी लिहिली असणार. काळसेकर मॅडम म्हणल्यात, खूप लिहून ठेवलंय. प्रकाशित करायला हवं.

एखादं पुस्तक त्यांना आवडलं की ते आवर्जून फोन करणारच. असाच तीन महिन्यापूर्वी फोन आला, मिलिंद चंपानेरकरनं 'द ग्रेप्स ऑफ रॉथ' या जॉन स्टाईन बेकच्या पुस्तकाचा अनुवाद भारी केलाय. नक्की विकत घेऊन वाच. त्यांच्या लोभस सहवासानं आमचं आयुष्य समृद्ध केलं.

मौज दिवाळी २०१७ अंकातील काळसेकर यांची पुढील कविता या संवेदनशील माणसाबद्दल बरंच काही सांगून जाते.

हे सगळे काही घडत आहे
हे असे प्रथमच घडते आहे
असे तर बिलकूल नाही

हे अख्खे गाव गाडले गेले आहे
पाण्याखाली आणि चिखलाखाली
हे असे ढगफुटीचे, धरणफुटीचे प्रकरण
प्रथमच आपल्यासमोर आले आहे
असेही काही नाही.

हे जळलेले किंवा जाळलेले
बुडालेले किंव बुडवलेले
गाथांचे असंख्य कागद
या भूमीने आताआताच
अनुभवले आहेत प्रथमच
असे तर ओळखीचे नाही

ही समोर उभी ठाकलेली अजस्र भिंत
ही कधीच ओलांडता येणार नाही
आणि तरीही भिंतीवर हातांचे ठसे
या खुणा काही पहिल्याच आहेत
असे तर काही नाही

ही अशी कितीतरी माणसे
झुंडीने आणि गटागटाने
इकडून तिकडे आणि तिकडून इकडे
ये जा आणि जा ये करताहेत.
हे काही धक्का बसावा
असे अघटित तर नाहीच नाही.

या बोटावरची थुंकी त्या बोटावर झेलण्याची
अंगात मुरवलेली चतुर हातचलाखी
अशी माणसे आसपास वावरताना
पाहण्याची सवय आपल्यासाठी
तशी काही नवी नाही.

या पृथ्वीची कूस ओल गमावून बसली आहे.
इथे आता नव्याने काही उगवणारच नाही
वाळत चाललेल्या झाडांवर पुन्हा
नव्याने पालवी फुटणारच नाही
हा तर आपला अनुभव नाही..

आजवरचा.

असे तर बिलकूल नाही.

काळसेकर आयुष्यभर भटकत राहिले. त्यात काळसेकर मॅडमनी त्यांना प्रचंड साथ दिली.

त्यांच्या पायपीट पुस्तकाची अर्पणपत्रिका बरंच काही सांगून जाते–

प्रिय विद्या,

तू पाठीशी ठाम उभी नसतीस आणि खांद्याला खांदा भिडवून सोबत नसतीस तर ही पायपीट अशक्य होती....

काळसेकर मॅडम परवा सांगत होत्या, आम्हाला चित्रकुटीरनं आणि पेणनं खूप प्रेम दिलं. पेणचे डॉक्टर, केमिस्ट, चित्रकुटीरचा रवी म्हात्रे, रामचंद्र हे आमच्यासाठी कधीही हाक मारली की यायचे.


त्या आणि पुढे असंही म्हणाल्या, हे म्हणायचे, तुझ्या आधी मी गेलो तर बरं होईल. तू आहेस म्हणून माझं निभावलं. तू आधी गेलीस तर माझं काही खरं नाही. मला बांडगुळासारखं नाही जगायचं.

त्यांना मुळात चित्रकुटीर नव्हतं सोडायचं, पण मुलांची दगदग त्यांना पाहवत नव्हती. जड मनानं त्यांनी ठरवलं होतं ठाण्याला जाण्याचं. पण नियतीच्या मनात... खरं म्हणायचं तर त्यांनीच ठरवलं असणार या पुस्तकांच्या कुशीत जायचं. आणि तसंच झालं.

हजारो पुस्तकांच्या कुशीतच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

**– विनोद पवार**
भ्रमणध्वनी : +९१ ९८२०४००५९३
addfizz@gmail.com

ग्रंथाली





**शब्द जायबंदी होण्याचे दिवस**

**योगिनी सातारकर–पांडे**

**(कवितासंग्रह)**

**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**





# आमचे वृत्तपत्र

प्रभाकर भिडे

**मी** गेली ५०-६० वर्षे महाराष्ट्र टाइम्स वाचत आहे. एकप्रकारे आमच्या पिढीची जडणघडण (वय वर्षे ७०-७५) आणि मटाची वाटचाल बरोबर झाली. या साठ वर्षांत मटाची सामान्य वाचकांशी कशी मैत्री झाली याच्या अनेक गोष्टी आठवतात. दुर्दैवाने गेल्या दीड-दोन वर्षांत कोरोनामुळे मध्ये संपर्क तुटला होता, पण आता तो पुन्हा चालू झाला आहे. गेल्या चारपाच वर्षांचा विचार केला आणि सध्याची विविध सदरे बघितली तर मटाने सामान्य वाचकांना त्यांच्या लिखाणात सहभागी करून घेतले आहे असे जाणवते. त्यामध्ये 'ताण विसरा - सकारात्मक राहा' यामध्ये पाळीव प्राण्यांच्या सहवासाचे अनेक अनुभव वाचक लिहितात. अनेक पाळीव प्राणी माणसांना समाधानाची/सकारात्मकतेची सोबत देतात यासारखे अनुभव/आठवणी असतात. तसेच, वाचकांना एखाद्या चांगल्या आवडलेल्या पुस्तकाविषयी ते का आवडले याविषयी थोडक्यात सांगता येते. (पुस्तकाची समीक्षा करण्यापेक्षा ते का आवडले ते सांगता येते.) आपण लिहिलेली प्रतिक्रिया लगेच छापून येते ही भावना समाधान देते. आणखी एक कॉलम म्हणजे 'लाइक आणि शेअर' यामध्ये प्रवासामधील एखादी लक्षात राहिलेली आठवण किंवा आयुष्यात अनपेक्षितपणे एखादी व्यक्ती येते आणि ती आपल्याला मदत करते, त्यामुळे आपल्या आयुष्याला चांगले वळण मिळते किंवा फायदा होतो ती आठवण किंवा प्रसंग आपल्या कायम लक्षात राहतो. याबद्दल लिहिण्याची संधी मिळते. अशा तऱ्हेच्या सहभागाने सामान्य वाचक वृत्तपत्राशी जोडला जातो.

याव्यतिरिक्त पूर्वी मराठी भाषा/संस्कृतीशी जोडणाऱ्या गोष्टी म्हणजे 'श्रावण क्वीन'ची निवड किंवा फिल्मफेअरसारखा मानाचा 'म.टा.सन्मान'पुरस्कार (हा ग्लॅमरस असतो.) मराठी कलाकार त्याची आवर्जून वाट बघतात. असे उपक्रम मनाला समाधान देतात. यावेळी आठवण येते ती पुण्याच्या सकाळची. पुण्यात नानासाहेब परुळेकरांनी सकाळ वृत्तपत्र सुरू केले. त्यावेळी ते आवर्जून शेतकऱ्यांविषयी किंवा पिकाविषयी बातम्या छापत. सामाजिक व राजकीय बातम्यांबरोबर सामान्य शेतकऱ्यांच्या बातम्यांमुळे वाचकांना बरे वाटे. सामान्य जनांना वृत्तपत्र आपले वाटे साहजिकच खपही वाढत असे (अर्थात ही कल्पना ७०/८० वर्षांपूर्वीची आहे) साहजिकच ते वृत्तपत्र सामान्य वाचकांचे होत असे. मटासुद्धा अशा गोष्टींमुळे सामान्य लोकांचे वृत्तपत्र झाले. (याचे श्रेय मुख्य संपादक व संपादक मंडळाच्या धोरणाला जाते.) पत्र नव्हे मित्र ही त्यांची 'टॅगलाइन' वास्तवात खरी ठरली. प्रत्येक वृत्तपत्राचे स्वत:चे म्हणून धोरण असते. त्यामध्ये संपादक मंडळ आपल्या बुद्धिचातुर्याने अनेक उपक्रम/कल्पना राबवत असते.

सुदैवाने गेली ५० वर्षे मटा वाचत असल्यामुळे सुरुवातीपासून त्याची वाटचाल बघता आली. त्यावेळी लक्षात राहिलेल्या बाबी अजूनही आठवतात. मटा हे टाइम्सचे प्रकाशन असल्यामुळे त्याला प्रथमपासूनच प्रेस्टिज होते. मटाचे पहिले संपादक द्वा.भ.कर्णिक पुरोगामी विचारवंत होते. साहजिकच त्यांनी मटाची व्यवस्थित घडी बसवली. त्यांना दुसरे ज्ञानोपासक गोविंदराव तळवलकरांची जोड मिळाली. पुढे ते मुख्य संपादक झाले. त्यांनी म.टा.ला एक वैचारिक उंची दिली.

आदरणीय शरद पवारांनी एके ठिकाणी म्हणले आहे की राजकीय कारकिर्दीत देशाच्या कोणत्याही समस्यांवर गोविंदराव काय मत देतात किंवा काय सल्ला/उपाय सुचवतात यावर आम्ही काँग्रेसवाले बारकाईने नजर ठेवून वाचत असू. त्यांचे अफाट इंग्रजी/मराठी वाचन, नेहरू व तत्सम पुरोगामी नेतृत्वाबद्दल आपुलकी, तसे मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय लेखकांशी जवळीक, मधूनमधून परदेशांत जाऊन भेटणे यामुळे आंतरराष्ट्रीय लोकांना भारताबद्दल काय वाटते याबाबत त्यांचे लिखाण अनेक बाबतींत मौलिक असे.

आपल्या व्यासंगातून अनेक पुस्तकांमधील विचार मराठी जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यावेळच्या संपादकांनी केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र टाईम्सची गोडी लागली. तो पेपर नियमित वाचला जाई. (ज्यांना विशेषत: इतिहास, आपला भूतकाळ याची आवड होती). एवढेच नव्हे तर नवोदित लेखकांना आपला लेख

मटामध्ये यावा यामध्ये फार आनंद व समाधान वाट असे. जसे पूर्वी सत्यकथा या मासिकाविषयी वाटे. त्यावेळी संपादकीय स्टाफमध्ये प्रसिद्ध साहित्यिक शंकर सारडा, अशोक जैन, राजकीय विश्लेषक दि.वि.गोखले, अनेक कलाकारांना व नवोदित लेखकांना लिहिते करणारे दिनकर गांगल यांसारखे लोक होते. त्यांनी मटा हा महाराष्ट्र राज्याची अस्मिता जपणारा पत्र नव्हे मित्र वाटे.

आम्ही सारे वाचक म्हणजे मराठी भाषासाहित्य याविषयी आस्था बाळगणारे होतो. त्यावेळी चित्रपटातील नटाविषयी लोकांना आदर/ग्लॅमर वाटते तसे महाराष्ट्र टाइम्सच्या संपादक विभागातील लोकांविषयी मराठी सुशिक्षित/सुसंस्कृत लोकांना वाटत असे. त्यावेळी विशेष प्रसंगी म.टा.मध्ये ग.दि.माडगूळकर, पु.ल.देशपांडे, पु.भा.भावे यांचे लेख असत. पुढे पुढे रवींद्र पिंगे व इतर साहित्यिक लिहीत. प्रसिद्ध नाटककार अशोक समेळ यांनी पूर्वी आवर्जून सांगितले की माझा मटामधील पहिला लेख दिनकर गांगल यांच्या सांगण्यावरून लिहिला. त्यांनी २०-२५ नाटके व अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांची 'अश्वथामा' ही सहाशे पानाची कादंबरी २-३ वर्षांपासून गाजत आहे. समाजामधील प्रतिभावान मग ते लेखक असो की नाट्य-सिनेमा कलाकार, त्यांना आरंभी प्रोत्साहन द्यायचे काम मटा करत असे. काळाप्रमाणे पुढे अनेक संपादक बदलले. जागतिक घटनांचे अभ्यासक व अफाट वाचन असलेले कुमार केतकर संपादक म्हणून आले. त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणावर/जगातील विविध घडामोडींवर (मग त्या सामाजिक, वैज्ञानिक) लिहिले. अशोक जैन यांच्या साप्ताहिक सदर व मटाच्या संपादकीयाची लोक वाट पाहत. त्यामुळे जगात काय चालले आहे व आपण कोठे आहोत ते कळे. पुढे भारतकुमार राऊतांनी श्रावण क्वीन/मटा सन्मान अशा सांस्कृतिक/व्यवहारी अंगांनी मटाला समृद्ध केले. त्यानंतर संपादकांनी वैयक्तिक लोकांच्या विशेषत: ज्येष्ठ नागरिक/तरुण यांच्या वाचनाच्या आवडीनिवडीवर भर देऊन, अनेकांच्या मुलाखती घेऊन मटा सामान्यांसाठी खुला केला. अनेक छोटे/मोठे कलाकार उजेडात आले. अशा तऱ्हेने आमची ज्येष्ठ पिढी (वय ७०/७५ वर्षे) म.टा.ची वाटचाल डोळस नजरेने बघत आहे. यादृष्टीने मटा आम्हाला आमचे वृत्तपत्र वाटते यामध्ये त्याचे यश आहे.

कोरोनामुळे मध्यंतरी थोडा खंड पडला असला तरी कालचक्र फिरतच असते. मटा पूर्वीच्या जोषात येऊन नवीन पिढीला आवडते पत्र बनेल यात शंका नाही. साठाव्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल 'मटा'ला शुभेच्छा.

**– प्रभाकर शं. भिडे**
भ्रमणध्वनी : +९१ ९८९२५६३१५४
bhideprabhakar@gmail.com

ग्रंथाली


## डॉ. मृण्मयी भजक यांची दोन पुस्तके




# अमेरिका : खट्टी-मीठी

**अमेरिका प्रवासवर्णन**


**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




# चुटकीभर गंमत

**लेखसंग्रह**

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



# ...आणि माझ्या शैलीवर शिक्कामोर्तब झाले!

मारुती शेळके

**अवखळ** खळखळणाऱ्या लयबद्ध रेषांनी दिशाबद्ध विषयांना खुलवणारे काही क्षण प्रत्येक कलाकाराच्या आयुष्याच्या कंगोऱ्यांना अधोरेखित करत असतात.

ढसढसा रडण्याऐवजी ओघळवलेले रंग ओथंबूत वाहताना, डोळ्यांतील अश्रूंसारखे मोत्यासम चमकत असतात.

कवचकुंडले ओरबाडून काढल्यासारखं ओकंबोकं आयुष्य रंगाच्छदनांनी सारवून सावरण्याला चित्तचित्रण म्हणण्याऐवजी पेंटिंग असं नाव देऊन गौरवल्यागत पाहत बसतात. त्यास कलाकार ऐसे नाव.

माझं बालपण खूप साऱ्या भावंडांसोबत, गाईगुरांबरोबर डोंगरदऱ्यांमध्ये, खळखळत्या ओढ्यात; नदीच्या पात्रात लुटूपुटूचा संघर्ष करण्यात, यथेच्छ हुंदडण्यात; उघडय़ा आकाशाखाली निसर्गाच्या सोबतीनं वाऱ्यावर डोलणाऱ्या शेताबरोबर डोलण्यात-बागडण्यात गेलं. खेळायला वाळलेल्या आंब्याच्या पानांचं किंवा कोयीचं भिरभिरं; आणि बाभळीचे काटे व शेळीच्या लेंड्यांपासून बनवलेलं रहाटगाडगं कुणाचं जास्त फिरतं; बाभळीच्या काटेरी झाडावरून सोनेरी भुंगा पकडून त्याची काळजी घेत कुणाचा भुंगा जास्त दिवस जगतो, अशा स्पर्धा असायच्या. अर्थात तो जगायचा नाहीच, पण त्याचं आयुष्यच तेवढं होतं की बंदिस्त ठेवल्यानं तो मरायचा हा प्रश्न ही कधी पडत नसायचा. आपण प्रचंड जीव लावून पाळतोय, संभाळतोय तरीही मरतोय याचं वाईट वाटायचं. विटी-दांडू, गोफण, गलुल बनवून त्यांच्या निष्णात वापरासाठी झगडण्यात मजा होती. तीर-तीर खेळताना दहावीस फुटांवरून ऊड्या फेकण्यात कधी भीती वाटत नव्हती की कधी दुखापत झाली नाही. ओल्या मातीवर काठीनं किंवा ओढ्यातल्या खडकावर व ओल्या वाळूवर कोळशानं किंवा ओल्या पायांनी रेघोट्या ओढून प्रचंड अवाढव्य नक्षीकाम करायला मला खूप आवडायचं किंवा आपोआप नकळत व्हायचं. आठचल्लस तर मी आजही आवडीनं खेळतो, गावात एखादा तमाशाचा फड येऊन गेल्यानंतर आमचं वगनाट्य गावात नवीन फड येईपर्यंत सुरू राहायचं. दगडाची पाटी आणि पेन्सिलनं अभ्यास करण्याऐवजी एका बाजूनं ब्राऊन पट्टी असलेल्या पेन्सिल निवडून, दोन रंगांचा उपयोग करून डिझाईन करायला किंवा फुटलेल्या पाट्या बेमालूमपणे जोडून नवीन जोडपाटी तयार करण्यात किंवा त्या फुटलेल्या खापरातून काही आकार शोधण्यात किंवा बनवण्यात मला जास्त इंटरेस्ट होता. पाऊस पडल्यावर आम्ही भावंडं मातीत पाय घालून घर बनवत असू. मीपण असंख्य घरं बनवायचो. त्याला कोटी म्हणायचो. दोन मजली-तीन मजली कोटी बनवायचो. त्याच्यावर वाळलेल्या काड्यांच्या तुकड्यानं नक्षीकाम करायचो. कधी काड्या चिकटवून, कधी काडीनं कोरून, अर्थात ही माझ्या कलात्मकतेची सुरुवात होती हे त्यावेळी लक्षात येणं अवघड होतं. पाण्यात मनोसक्त डुंबायचो, डोंगरदऱ्यांत हुंदडायचो. यातून शरीर आणि मन दोन्हीही बरंच काही शिकत होतं.

गावाला पहिलीला प्रवेश घेऊन शाळेत न जाता नापास झाल्यावर आणि एकत्र कुटुंबातील काही गृहकलहांमुळे आम्ही मुंबईला शिफ्ट झालो. ठाणे स्टेशनजवळच्या मंत्री प्लॉटमधील झोपडपट्टीत स्थिरावलो. गावदेवी मैदानातील नगरपालिकेच्या ३१ नंबर शाळेत प्रवेश घेऊन गावदेवी मैदानात आणि शेजारच्या लोकमान्य टिळक उद्यानात हुंदडायला सुरुवात झाली. तिथेही चित्रकलेत आणि हस्तकलेत हातखंडा होताच. लोकमान्य टिळक उद्यानात पिवळ्या रंगाच्या फुलांचे खूप मोठे झाड होते. आम्ही ती फुले तोडून त्याच्या देठातील गोडसर रस चोखून घ्यायचो, पण मी माझ्याकडे रंग नसल्यानं ती फुलं चुरगळून आणि त्यांच्या बिया फोडून त्यांच्यापासून निघणाऱ्या पिवळसर रंगाचा वापर चित्रात करायचो. केळीच्या खोडाचा तुकडा पेपरवर घासून ब्राऊन रंगाचे डाग पडाल्यासारखा; पण त्याचा रंग म्हणून मी अनेक वेळा वापर केलाय. एकदा तर पानं-फुलं योग्य आकारात कापून-चिकटवून कोलाज केलं होतं. ते शाळेत दाखवायच्या अगोदरच वाळल्यानं रंग गायब होऊन एक वेगळीच छटा आली होती. मी चौथीत असताना जुन्या वह्यांचे पुठ्ठे आणि त्यांना जोडणाऱ्या बाईंडिंग क्लॉथपासून बनवलेलं जादुई पैशाचं पाकीट त्यावेळी वरच्या वर्गात शिकणाऱ्या एका मुलीनं माझ्याकडून पंचवीस पैशांना विकत घेतलं



होतं. तिच्या ओळखीच्या आणखी कोणीतरी दोन वेळा जास्तीचे पैसे देऊन करून घेतलं होतं. ती माझी पहिली कमाई एका कलाकृतीपासून होती. अर्थात काही कळायची क्षमता येण्याअगोदरची. मैदानात विविध रंगी फुलपाखरं आणि चतुर यांच्या मागे पळत ओळखीच्या आणि अगदी अनोळख्या मित्रांसोबत खेळणं, भांडणं आणि मारामाऱ्या करण्यात छान दिवस जात असतानाच हुशार म्हणून चौथी पास झालो. म्हणजे चौथीला बाकीचे विद्यार्थी माझा पेपर पाहतात म्हणून बाईंनी मला कोपऱ्यातल्या लाकडी कपाटावर बसवून पेपर लिहायला लावला होता! तेव्हा मी शाळेत पहिला आलो होतो. शाळा चौथीपर्यंतच असल्यानं वडिलांनी महत्प्रयासानं पाचवीत ठाण्यातील प्रथितयश मो. ह. विद्यालयात ॲडमिशन घेऊन दिली. आणि हुशारपणाला कलाटणी मिळाली. झोपडपट्टीतील इस्त्री न केलेले कपडे घालणाऱ्या, अर्वाच्य गावंढळ भाषा बोलणाऱ्या मला वर्गानं काही स्वीकारलं नाही, आणि मी चक्क नापास झालो. घरच्या आर्थिक परिस्थिती आणि चार लहान भावंडांच्या शिक्षणाचा भार पेलण्यासाठी सोबत नोकरीधंद्याला सुरुवात झाली. इंग्रजीचा आणि माझा छत्तीसचा आकडा असूनही दहावीत प्रथम प्रयत्नात द्वितीय श्रेणीत पास झालो. त्यावेळी मी काढलेली चित्रं आज चाळीस वर्षांनंतरही ड्रॉइंग हॉलमध्ये डिस्प्ले केलेली आहेत. शाळेत ड्रॉईंगमध्ये मिळालेली बक्षिसं आणि इंग्रजीशिवाय शिकता येईल म्हणून ड्रॉइंग टीचरच्या सूचनेनुसार जेजेला प्रवेश घ्यायचा प्रयत्न केला, पण प्रवेश काही मिळाला नाही म्हणून ठाणे स्कूल ऑफ आर्टला फाऊंडेशन कोर्स, रॉबी डिसिल्वा दृककला महाविद्यालय वसई इथे एटीडी आणि रहेजा स्कूल ऑफ आर्ट, वांद्रे इथे जीडी आर्ट असे शिक्षण पूर्ण करत डिप्लोमाला महाराष्ट्रात सातवा आलो आणि जेजेला डीप एएडला प्रवेश मिळून तिथेही खूप सैद्धांतिक विषय असूनही चौथा वगैरे आलो. खूप छोट्याशा चाळीतील खोलीत कुटुंबातील सात जणांना न पुरणारी जागा, आणि नोकरीधंदा करून शिक्षण घेत असल्यामुळे वेळ पुरत नसल्यामुळे तोपर्यंत माझ्या चित्रांना मी न्याय देऊ शकत नव्हतो. पण, नोकरीच्या शोधात शिवाईनगर हायस्कूल, सरस्वती विद्यालय, नौपाडा मिडल स्कूल, या शाळांमध्ये ड्रॉईंग टीचरचा जॉब करत करत ठाणे स्कूल ऑफ आर्टला साहाय्यक अध्यापक म्हणून जॉईन झालो. तिथे खरं माझं म्हणण्यासारखं माझं काम सुरू झालं. कॉलेजच्या विद्यार्थ्यांना दर शनिवारी लॅन्डस्केपला, स्केचिंगला घेऊन जायचो. शिवाय रात्री कॉलेज बंद झाल्यावर आणि मी दिवसभर विविध जॉब केल्यानंतर झोपायला कॉलेजमध्ये यायचो आणि सायंकाळी आठ ते सकाळी सातपर्यंत कॉलेजच्या ऑफिसमध्ये घासून प्रिंट काढायचो. तशी परवानगी मला कॉलेजनं दिली होती. वेळ मिळाला तर थोडंफार झोपायचं, वूडकट आणि लायनो इचिंगमध्ये माझं काम गती घेऊ लागलं. पेस्टल वर्कपण आनंद देऊन जात होतं. शिवाय रात्रभर केलेल्या कामावर सकाळी कॉलेजमध्ये समीक्षात्मक चर्चा होऊन योग्य त्या डेव्हलपमेंट व्हायला सुरुवात झाली. त्यातीलच काही प्रिंट बॉम्बे आर्ट सोसायटी, आर्ट सोसायटी ऑफ आर्टला निवड होऊन प्रदर्शित झाल्या व विकल्याही गेल्या. छान सुरू असलं तरी कॉलेज नॉनग्रॅन्टेड होतं. पगार पुरत नसल्यानं चर्नीरोडच्या इंडियन आर्ट इंस्टिट्यूटला ग्रॅटेड जागेवर टेंपररी म्हणून जॉईन झालो. नंतर जाहिरात आलेल्या जेजे स्कूल ऑफ आर्टच्या पोस्टसाठी अर्ज करून कलाशिक्षक प्रशिक्षण विभागात निवड झाली, पण नियुक्ती नागपूरला मिळाली. कॉलेजच्या डिनचा विद्यार्थ्यांनी खून केलेलं कॉलेज म्हणून अनेक मित्रांनी नागपूरला जाऊ नको असा सल्ला दिला. परंतु, घाबरून आलेली संधी सोडणं माझ्या स्वभावात नव्हतंच. त्यामुळे नागपूरला हंगामी अधिव्याख्याता म्हणून जॉईन झालो. तिथे लॅन्डस्केपला स्पॉट नाहीत म्हणत म्हणत लॅन्डस्केपला सुरुवात झाली आणि महाल, तेलंखेडी, सोनेगाव, आणि आसपासची गावं लॅन्डस्केपसाठी आकर्षण ठरू लागली. लॅन्डस्केपचे टेराकोटाचे कॅम्प विद्यार्थ्यांना घेऊन साकारले जाऊ लागले. माझ्या काही विद्यार्थ्यांना लॅन्डस्केपला बक्षिसंपण मिळाली. सुरुवातीला प्रत्येक वर्षी एकमेकांची डोकी फोडणारे विद्यार्थी हळूहळू प्रत्येक कला ॲक्टिव्हिटीमध्ये हिरीरीने आपला सहभाग देऊ लागले. सोबत अनुभवी अध्यापकांबरोबर काम करता करता संवादातून कधी माझं चित्र शैलीबद्ध झालं कळलंच नाही. साऊथ सेंट्रल झोनच्या कॅम्पमधून टेराकोटा कॅम्पला सुरुवात होऊन, पेठ आणि भद्रावतीला विद्यार्थ्यांच्या कार्यशाळा घेता घेता शिल्पकलाही साकारत गेली. चित्रकलेत महाविद्यालयासमोरच्या दीक्षाभूमीवर दसऱ्याला लोटणारा महाकाय जनसमुदाय आणि तेथील सांस्कृतिक विविधतेतून समाजविविधता आणि स्त्री-पुरुषभेद प्रकर्षानं अधोरेखित होत गेला. आपल्या बालपणापासूनच्या विविधानुभवांच्या फेरतपासणीतून अनेक पैलूंचा आढावा घेत शेवटी स्त्री-पुरुष समानता साध्य करायची असेल तर ती शारीरिक आणि मानसिक पातळीवर सूत्रबद्ध पद्धतीनं स्त्रीला कमकुवत ठेवणारी चौकट मोडूनच शक्य आहे या निष्कर्षाप्रत पोचलो. आणि या चौकटीचे मुख्य कार्यकारणभाव

सापडले, ते स्त्रीच्या नाजूक अलंकरणात्मक घाटणीसाठी लांब केशसंभार आणि मेकअपसह दागिन्यांची त्यांना मिरवण्यासाठी स्त्रीनं स्वखुशीनं स्वीकारलेली आणि सम ाजानं गौरवांकीत केलेली सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, व्यवसायिक चालीरीती आणि बंधनं, असं माझं मत झालं. जी बंधनं अभिमानानं मिरवायची ती झुगारून द्या म्हणून झुगारणंसुद्धा अशक्य कोटीतलं. त्यामुळे काही महत्त्वाचे बदल स्त्रियांच्या जीवनशैलीत अवश्यक वाटल्यानं मी सुरुवात माझ्या चित्रांपासून केली. सर्वप्रथम मी माझ्या चित्रांमध्ये स्त्री-पुरुषांच्या पेहेरावात साधर्म्य आणायला सुरुवात केली. परंतु त्यामधून ईप्सित भाव साध्य होईना. मग शरीरयष्टीत साधर्म्य आणून पाहिलं, पण त्यातूनही समाधानकारक विषय पोचेना आणि त्यादरम्यान माझी भेट दीक्षाभूमीवर भंतेंशी झाली. काही दिवसांपूर्वी जैन केशवपन केलेल्या साध्वी आणि आता संपूर्ण केशवपन केलेल्या



भंतेंना पाहून मला एकदम युरेका युरेकासारखी ट्यूब लागावी असं झालं. आणि मी माझ्या चित्रांमधील स्त्री-पुरुषांच्या डोक्यावरील केस काढून टाकले. आणि ईप्सित साध्य झाल्याची जाणीव झाली. मित्रमैत्रिणी आणि सहकाऱ्यांनी तोंडावर स्वीकार केला तरी मागे मात्र टीकाटिप्पणी सुरू होती. मात्र मला समाधान मिळत होतं. प्रदर्शनांदरम्यान यावर स्त्री-पुरुष विचारवंतांशी साधकबाधक चर्चा होऊन माझ्या संकल्पनेला स्वीकृती मिळत गेली. माझे प्रयोग यशस्वी होत अलंकरणात्मक आणि बोल्ड बदलांच्या जोरावर माझ्या शैलीला मान्यता तर मिळालीच, पण प्रथमदर्शनी एवढा मोठा बदल अनेकांच्या लक्षातसुद्धा येत नाही. हे लक्षात आल्यानंतर मी माझ्या शैलीत स्थिरावत स्पर्धाप्रदर्शनं सुरू ठेवली. स्पर्धांमध्ये फार कमी यश मिळालं. अनेक स्पर्धांमध्ये तर प्रदर्शनास अयोग्य घोषित केलं गेलं. पण वैयक्तिक प्रदर्शनांत कलारसिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत गेला. जिथे संवाद होईल तिथे प्रतिसाद आणि संवाद होत नसेल तेथे हेटाळणी असं काहीतरी सूत्र लक्षात आलं. आणि मी स्पर्धांच्या मार्गातून बाजूला होण्याचा निर्णय घेतला. आज ओघवत्या रेषांनी अंकित मानवाकृती व इतर आकार, मोठमोठ्या रोलरच्या जोरकस फटकाऱ्यांनी रंगलेपन करत होणारी टोननिर्मिती माझ्या चित्रांना इतरांपासून वेगळी ओळख निर्माण करून देते. पण, स्त्री-पुरुष-समानतेच्या मार्गानं मार्गक्रमण करणाऱ्या विषयामुळे ती जास्त वेधक ठरत आहे. माझ्या २००७च्या जहांगीर आर्ट गॅलरीतील प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी प्रफुल्ला डहाणूकर आणि शरयू दोशी ज्या खरं तर नियमित नवीन लागलेले प्रत्येक प्रदर्शन पाहायला येतात तशा आल्या होत्या. पहिल्या गॅलरीत कुठल्यातरी प्रथितयश नामांकित गॅलरीचा स्पॉन्सर शो सुरू होता, त्याचे विधिवत उद्‌घाटन सायंकाळी गॅलरी बंद झाल्यावर होणार होतं. मोठमोठ्या चित्रकारांची चित्रं झळकत होती. ती पाहून, मधल्या गॅलरीतील लॅन्डस्केप पाहून झाल्यावर दोघीही माझ्या दालनात दाखल झाल्या आणि दारातच थबकल्या, बराच वेळ जागेवर उभे राहून संपूर्ण प्रदर्शन पाहू लागल्या, मी ऑकवर्ड वाटून पुढे गेलो, माझा कॅटलॉग घेऊन. मला प्रफुल्लाबाईंनी जवळ घेतलं. ''ही तुझी चित्र आहेत?'' मी हो म्हणालो. ''काय तंत्र वापरलंय?'' मी रोलरनं माझी रंग लावायची पद्धत सांगितली, ''आणि या रेषा?'' मी त्यापण जाड रंग लावून ओला असताना खरवडून काढल्यामुळे मिळणाऱ्या रिझल्टसचे डिटेल्स सांगितले. त्या खूप खुश झाल्या शरयू दोशींना माझ्याजवळ थांबायला सांगून तरातरा बाहेर गेल्या. मला काही कळायच्या अगोदरच मेनन मॅडमना सोबत घेऊन आल्या. तू हे काम पाहिलंस? त्या हो म्हणाल्या. म्हणूनच त्याला गॅलरी दिली ना. उत्तर ऐकून प्रफुल्लाताई गालात हसल्या व म्हणाल्या, अशा कलाकारांसाठी तुम्ही काय करू शकता? मी आणि मेनन मॅडम दोघंही प्रश्नार्थक मुद्रेनं त्यांच्याकडे पाहत बसलो. त्या म्हणाल्या, ''खूप वर्षांनी मी काहीतरी नवीन पाहतेय. याला आपण नाही संधी दिली तर कशी संधी मि ळणार? प्रदर्शन संपलं की तो निघून जाईल नागपूरला. मग कोण पाहणार? येवढ्या उत्कृष्ट कामाला एक्सपोजर कुठून मिळणार? ज्यामध्ये खूप ताकद आहे. आज पहिल्या गॅलरीचं ओपनिंग आहे. सर्व आर्टिस्ट, बायर आणि गॅलरीवाले येणार आहेत, त्यामुळे ती गॅलरी बंद होईपर्यंत ही गॅलरी सुरू राहू दे.'' मेनन म्हणाल्या, ''पण त्यांनी पैसे जास्तीचे भरलेत ओपनिंगसाठी. यांनी नाही भरले.'' प्रफुल्लाबाई अक्षरशः चिडून म्हणाल्या, 'किती भरायचे आहेत? मी आता भरते. पण ही गॅलरी बंद करायची नाही.'' शरयू दोशींनीपण साथ दिली, आणि माझी गॅलरी रात्री दहापर्यंत सुरू राहून, पहिल्यांदा संपूर्ण शो विकला जाऊन माझ्या कामावर; कामाच्या शैलीवर नावीन्यपूर्ण रंगलेपन आणि रेषांवर शिक्कामोर्तब होऊन अनेक ज्येष्ठश्रेष्ठ कलाकारांच्या उत्साहवर्धक प्रतिक्रियांसह आत्मविश्वासबांधणी खऱ्या अर्थानं झाली.

**- मारुती शेळके**

भ्रमणध्वनी : +९१ ९४२२८२२४०४

# प्रकाशनवृत्तांत

## मुग्धा चिटणीस स्मृती कथाकथन स्पर्धेचे विजेते

'ग्रंथाली'ने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एप्रिलमध्ये मुग्धा चिटणीस स्मृती कथाकथन स्पर्धा आयोजित केली होती. परंतु त्याला अपेक्षेपेक्षा खूपच अल्प प्रतिसाद मिळाला. एकंदर चाळीस विद्यार्थ्यांनी त्यात भाग घेतला होता. सर्वच विद्यार्थ्यांनी खूप चांगला प्रयत्न केला. उत्तम कथाकारांच्या कथांबरोबरच स्वरचित कथाही ऐकायला मिळाल्या. कथांमध्ये विषयांचं वैविध्य होतं; तसंच स्वरचित कथांमध्ये आजच्या काळाला अनुसरून विषय निवडले होते. त्यावर भाष्य केलं होतं. नवोदित लेखकांच्या कथेत प्रगल्भता आढळली. सादरीकरणात चढउतार बघायला मिळाले तरी बहुतांश स्पर्धकांनी आपला प्रभाव पाडण्यात यश मिळवलं. उच्चार आणि संवादातील फेक यावर मात्र स्पर्धकांनी अधिक कष्ट घ्यायला हवेत असं वाटलं. प्रथम क्रमांकाचं बक्षीस **सानिका पोटे** हिला मिळालेलं आहे. तिनं शंकर पाटील यांच्या 'दावं' या कथेचं अतिशय प्रवाही कथन केलं आहे. कथेची निवड उत्तम होती. या कथेतील पात्रांचे संवाद, त्या त्या पात्रांचं वेगळेपण तिनं उत्तम रीतीनं सादर केलं. ग्रामीण भाषेची शैली प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात ती यशस्वी झाली.


दोन उत्तेजनार्थ पारितोषिकं देण्यात आली आहेत. **प्रियांका पाटील** हिनं 'त्याच्यातील ती' ही कथा खूप उत्कटपणे सादर केली. या कथेत प्रथमपुरुषी निवेदन असून त्याचा बाज तिनं चांगला राखला. संवादातील आरोहअवरोह चांगले होते. पात्रांचा बदलणारा मूडही तिनं चांगल्या पद्धतीनं प्रस्तुत केला. **किमया तेंडुलकर** हिची 'धर्मिन्दर जैसाच होना' ही स्वरचित कथा, विनोदी अंगानं जाणारी पण कारुण्याची किनार असलेली. हे दोन्ही मूड तिनं चांगले दाखवले. उत्स्फूर्तता आणि स्पष्ट, स्वच्छ उच्चार ही तिची जमेची बाजू.

**ओंकार जितेंद्र पाटील** यानं स्वत:तील व्यंगावर मात करून 'प्रश्नचिन्ह' ही स्वरचित कथा प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला. त्याला दाद म्हणून विशेष उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आलं आहे. या स्पर्धेसाठी मेधा आलकारी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिलं. १५ जुलै रोजी त्याचा निकाल इमेल द्वारे स्पर्धकांना कळवण्यात आला.

●

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## कविता अंतरंगात झिरपणं महत्त्वाचं – प्रवीण दवणे




कविता हा भावनांचा विषय आहे. जीवनातले निरनिराळे प्रसंग, अनुभवच आपण कवितांमधून व्यक्त करत असतो. कविता सुचण्याआधी ती स्फुरणं, तरळणं, जाणवणं, उमगणं आणि अंतरंगात झिरपणं महत्त्वाचं आहे. प्राजक्ताच्या लिखाणात हे सगळं जाणवल्यामुळे तिच्या कविता खऱ्या वाटतात. कुठल्याही वृत्तात किंवा छंदात नसूनही प्राजक्ताच्या कविता वेगळ्या आणि हव्याहव्याशा वाटतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक, कवी, गीतकार, प्राध्यापक प्रवीण दवणे यांनी केले. प्रसिद्ध अभिनेत्री, नृत्यांगना, सूत्रसंचालिका प्राजक्ता माळी लिखित 'प्राजक्तप्रभा' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन १९ जुलै रोजी ठाण्यात पार पडले. यावेळी दिग्दर्शक, लेखक अभिजित पानसे, विजू माने, अभिनेता पुष्कर श्रोत्री, प्लॅनेट मराठीचे संस्थापक अक्षय बर्दापूरकर, 'ग्रंथाली'चे धनंजय गांगल आणि सुदेश हिंगलासपूरकर आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.


पुष्कर श्रोत्री, विजू माने आणि अभिजित पानसे यांनी 'प्राजक्तप्रभा' काव्यसंग्रहातील 'मुंबई-पुणे-मुंबई', 'कला' आणि 'सत्य दिसू दे' या कवितांचे वाचन केले. ग्रंथाली प्रकाशित 'प्राजक्तप्रभा' या काव्यसंग्रहात एकूण ३३ कविता असून मराठीबरोबरच काही हिंदी व एका इंग्रजी कवितेचाही समावेश आहे. लेखक-दिग्दर्शक अभिजित पानसे यांनी प्राजक्ताला शुभेच्छा देताना प्राजक्ताच्या फुलांचा सुगंध मनात कायम दरवळत राहील, असा विश्वास व्यक्त केला.

ओघवत्या भाषेत आणि सच्चेपणाने प्राजक्ताने लिहिलेल्या कविता वाचकांना नक्कीच आवडतील, असा विश्वास अभिनेता पुष्कर श्रोत्री आणि प्लॅनेट मराठीचे संस्थापक, निर्माते अक्षय बर्दापूरकर यांनी व्यक्त केला. प्राजक्ताच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका गीता दुवेदी व कुटुंब पुण्याहून प्राजक्ताला शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. मनोगत मांडताना प्राजक्ता म्हणाली, की 'मी कवयित्री नाही, पण मला आजूबाजूला जे दिसलं, भावलं ते मुक्तछंदात माझ्या कवितांमधून मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. माझ्या कविता प्रेरणेतून नाही तर स्वयंस्फूर्तीतून आल्या आहेत.' या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिका कुलकर्णी यांनी केले.

●

# प्रकाशनवृत्तांत

## या कठीण काळात हलक्याफुलक्या लेखनाची गरज अधोरेखित – अरुण म्हात्रे





ग्रंथाली प्रकाशित, डॉ मृण्मयी भजक लिखित 'चुटकीभर गंमत' ह्या पुस्तकाचे प्रकाशन, आणि 'अमेरिका खट्टी-मीठी' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन सोहळा नुकताच ठाणे येथे संपन्न झाला. ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, ख्यातनाम अभिनेत्री मधुरा वेलणकर-साटम हे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते.

'ग्रंथाली'चे विश्वस्त धनंजय गांगल यांनी दोन्ही पुस्तकांवर प्रकाशक म्हणून भाष्य केले.

मधुरा वेलणकर साटम यांच्या हस्ते अमेरिका खट्टी-मीठी या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन झाले. या पुस्तकातील साठ डॉलरचा आत्मविश्वास, रिपेट्रीएशन अशा काही लेखांचा उल्लेख मधुरा यांनी आवर्जून केला. आपल्या भाषणात त्यांनी स्वत्व जपणे, मराठी भाषा अशा मुद्यांना स्पर्श केला.

कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते 'चुटकीभर गंमत' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. चुटकीभर गमतीचे गोड फुलपाखरू विशेषतः या कठीण काळामध्ये आपल्याला किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी सांगितले.

मोठ्या बोजड साहित्याच्या तुलनेत दोन्ही पुस्तकांतील हलकेफुलके लेख हे मनाला प्रफुल्लित करून जातात असेही ते म्हणाले.

हर्षदा बोरकर यांच्या अभिवाचनाने कार्यक्रमाची रंगत वाढली. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन डॉ. लतिका भानुशाली यांनी केले. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि ग्रंथाली कार्यक्रम संचालक धनश्री धारप यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. मृण्मयी भजक यांनी त्यांच्या मनोगतात, निवेदिका आणि लेखिका म्हणून त्यांचा प्रवास कसा झाला हे सांगत सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.


दृक्‌श्राव्य माध्यमातून मुकुंद मराठे, विनय राजवाडे, उमा दीक्षित यांनी त्यांच्या आयुष्यातील 'गंमत गप्पा' सांगितल्या. साहित्यिक, सांस्कृतिक, क्षेत्रातील अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.



कोविड काळातील निराशाजनक वातावरणात हा छोटेखानी पण हृदय कार्यक्रम एक नवी उमेद देऊन गेला.

●

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## कारगिल विजयदिनानिमित्त 'अशक्य ते शक्य... कारगिल संघर्ष' पुस्तकाचे प्रकाशन



कारगिल विजयदिनाच्या २२व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते २६ जुलै रोजी कारगिल योद्ध्यांचा तसेच हुतात्मा जवानांच्या कुटुंबीयांचा राजभवन येथे सत्कार करण्यात आला.

यावेळी हुतात्मा कॅप्टन विनायक गोरे यांच्या वीरमाता अनुराधा गोरे लिखित 'अशक्य ते शक्य...कारगिल संघर्ष' या पुस्तकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

कारगिल युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करताना राज्यपाल म्हणाले, की भारताला शांती हवी असली तरीही शत्रूराष्ट्रांनी देशाला वेढले आहे ही वस्तुस्थिती विसरता येत नाही.

कारगिल युद्धात भारताची रणनीतीही जिंकली आणि कूटनीतीही जिंकली असे सांगून डोकलाम व गलवान या ठिकाणी चीनने नव्या भारताचे सामर्थ्यवान रूप पाहिले असे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितले. 'अशक्य ते शक्य...कारगिल संघर्ष' हे पुस्तक केवळ युद्धकथा नाही तर तो कारगिलयुद्धाकडे पाहणारा समग्र ग्रंथ आहे असे त्यांनी सांगितले.

राज्यपालांच्या हस्ते महावीरचक्रप्राप्त हवालदार दिगेन्द्र सिंह, हवालदार दीप चंद, घातक पलटणचे हवालदार मधुसूदन सुर्वे, हवालदार पांडुरंग आंब्रे व हवालदार दत्ता चव्हाण, स्क्वाड्रन लीडर राहुल दुबे, कॅप्टन रुपेश कोहली, कॅप्टन विद्या रत्नपारखी, सविता

दोंदे, कर्नल सुशांत गोखले यांच्या आई रोहिणी आनंद गोखले व कर्नल संदीप लोलेकर यांच्या भगिनी कोमल शहाणे यांचा सत्कार करण्यात आला.

लेखिका अनुराधा गोरे यांनी 'अशक्य ते शक्य...कारगिल संघर्ष' हे पुस्तक लिहिण्यामागची प्रेरणा व भूमिका स्पष्ट केली. ग्रंथालीचे धनंजय गांगल व सुदेश हिंगलासपूरकर यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला राज्यपालांनी कारगिल युद्धविषयक चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन केले.

कार्यक्रमाला आमदार मंगल प्रभात लोढा, लोढा फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजू लोढा, अनुराधा गोरे व मुंबई प्रभागाचे प्रमुख एअर व्हाईस मार्शल एसआर सिंह प्रामुख्याने उपस्थित होते. व्हॉइस ऑफ मुंबई व लोढा फाउंडेशन यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हर्षल कंसारा यांनी सूत्र संचालन केले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

●

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## प्राजक्ताला मराठीत लिहावंसं वाटलं याचा आनंद वाटतो – रामदास फुटाणे

''मला चांगलं वाटलं की तू म्हणालीस मी कवयित्री नाही. ही ओळ तुला अनेक गोष्टी शिकवू शकते. प्रत्येक क्षेत्रातलं आपलं खुजेपण जाणवणं आपली उंची वाढवू शकतं.'' अभिनेत्री प्राजक्ता माळी हिचं कौतुक करताना रामदास फुटाणे म्हणाले. पुण्यात नुकतंच अक्षरधारा बुक गॅलरी आयोजित 'प्राजक्तप्रभा' या प्राजक्ताच्या काव्यसंग्रहाचं प्रकाशन प्रख्यात वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. मराठी मागे पडत चालली आहे अशी खंत व्यक्त करताना आपल्या खुमासदार शैलीत ते पुढे म्हणाले, ''मी चित्रपटात आलो तेव्हा आम्ही माझं चित्रीकरण आहे असं म्हणायचो. १९८० नंतर माझं शूटिंग आहे असं म्हणू लागले. गेल्या दहा वर्षांत माझं 'शूट' आहे असं म्हण–तात. पुढे त्यातला 'ट'सुद्धा गळून पडेल! आता सूत्रधारापासून सगळे इंग्रजाळलेले आहेत. मराठी शब्दांपासून दूर जात आहेत. अशावेळी प्राजक्ता मराठीत लिहीत असेल तर ती आनंदाची आणि समाधानाची बाब आहे.''


यावेळी मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, ग्रंथालीचे विश्वस्त शिरीष वीरकर आणि अक्षरधाराचे रमेश व रसिका राठिवडेकर उपस्थित होते. प्रा. जोशी म्हणाले, ''कविता हीच कवीची सार्वभौम सत्ता असते. ग्लॅमरच्या विश्वात राहूनही प्राजक्ता माळी यांना कवितेचे बोट धरावेसे वाटते ही महत्त्वाची बाब आहे. जीवनव्यवहार आणि कलाव्यवहाराच्या घुसमटीत अनेक कलावंतांचे आयुष्य गुदमरून जाते. असे घडू नये यासाठी जाणिवेचा स्तर उंचावणे महत्त्वाचे आहे, याचे भान असणारी प्राजक्ता यांची कविता आहे. ती अंतर्मुख करणारी आहे.'' शिरीष वीरकर यांनी, प्राजक्ताने लिहीत राहावे, ग्रंथालीकडून त्याचे स्वागतच होईल, असे आश्वासन दिले.

प्राजक्ताने आपल्याला कविता कशा सुचल्या आणि आलेल्या अनुभवातून त्या कशा लिहिल्या ते मनोगतात मांडले. तिने कविता सादरही केल्या.

रसिका राठिवडेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आरजे शोनाली यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

●

ग्रंथाली



सहा दशकांची पत्रकारिता

वसंत वासुदेव देशपांडे

वसंत वासुदेव देशपांडे यांचे आत्मकथन

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.



## प्र.नां.चा नाट्यसमीक्षा क्षेत्रात दबदबा निर्माण झाला असता' – दिनकर गांगल




ग्रंथाली प्रकाशित आणि प्र. ना. परांजपे लिखित 'नाटक – काही परीक्षणे काही निरीक्षणे' या पुस्तकाचे, २९ जुलै २०२१रोजी 'ग्रंथाली वॉच' या यूट्यूब चॅनेलवर दिनकर गांगल यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या कार्यक्रमासाठी नाट्यसमीक्षक कमलाकर नाडकर्णी, नाट्य-चित्र कलावंत माधव वझे, लेखक-पत्रकार रविप्रकाश कुलकर्णी, ग्रंथाली संस्थापक दिनकर गांगल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात गांगल म्हणाले, ''प्र.ना. परांजपे यांनी पत्रकारांना आणि ग्रंथव्यवहाराला शिस्त लावली. 'कविता', 'ग्रंथमाला' या साहित्यिक उपक्रमांमुळे त्यांच्याशी स्नेह वाढत गेला. प्र.ना. लिहीत होते तेव्हा जर नाट्यसमीक्षक म्हणून त्यांना मान मिळाला असता, तर कदाचित या सगळ्या लेखनाची वेगळ्या दृष्टीने चिकित्सा झाली असती. पण पुढे परांजपे संयोजनात गुंतले, इंग्रजी भाषांतरकडे आणि वृत्तपत्रविद्या या क्षेत्रात स्थिरावले. तसं झालं नसतं तर नाट्यसमीक्षा या क्षेत्रात त्यांचा एक वेगळा दबदबा तयार झाला असता. महेश एलकुंचवार म्हणतात, की 'प्र.ना. यांची समीक्षा काळाच्या पुढे आहे.' त्यांची समीक्षा वाचल्यावर एलकुंचवार यांचे विधान किती सत्य आहे ते पटले,'' असे मत व्यक्त करून दिनकर गांगल यांनी, त्यावेळी हुकलेली ही कीर्ती आज त्यांना पुन्हा मिळू दे अशी सदिच्छा व्यक्त केली.

'ग्रंथाली'तर्फे हे पुस्तक प्रकाशित होते आहे याचा विशेष आनंद प्र.ना. परांजपे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. ते म्हणाले, शीर्षकात जो 'निरीक्षण' शब्द आहे त्यानुसार पहिल्या भागात ॲरिस्टॉटल काव्यशास्त्र, मेलोड्रामा, संगीत नाटकं, एकांकिका याविषयी निरीक्षणे आहेत तर दुसऱ्या भागात नाट्यप्रयोगांची आणि नाट्यपुस्तकांची समीक्षा आहे. महेश एलकुंचवार यांनी पुस्तकाला दिलेल्या प्रस्तावनेविषयी त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली तर चार-पाच वर्षे मित्र आणि नंतर मैत्रीची फारकत झालेल्या विजय तेंडुलकरांना पुस्तक समर्पित करताना विशेष आनंद होत आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

आपले मनोगत मांडताना रविप्रकाश कुलकर्णी म्हणाले, विजय तेंडुलकर यांच्याशी वैचारिक मतभेद होते तरी प्र.ना. परांजपे यांनी हे पुस्तक तेंडुलकरांना अर्पण केले हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. असे नमूद करून ते पुढे म्हणाले, की साहित्यातील वैचारिक वादांचीही नोंद झाली पाहिजे. कारण असे वाद साहित्यकृतीला समृद्ध करतात.

माधव वझे हे प्र.ना. परांजपे यांच्या समीक्षेविषयी बोलताना म्हणाले, की प्र.ना.हे ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून, वैयक्तिक परिप्रेक्ष्यातून या नाट्यप्रयोगांची आणि नाट्यलेखनाची समीक्षा करतात. पूर्ण तयरीनिनीशी लेख लिहिताना त्यांचा आत्मविश्वास पानोपानी जाणवतो. ते त्रुटी नोंदवून पुढे जातात, पण कोणाचाही अधिक्षेप करत नाहीत. सैद्धांतिक बैठक ऐतिहासिक परिक्षेत्र, सज्जड पुरावे, एक तौलनिक परिमाण आणि वस्तुनिष्ठता अशा गुणांनी युक्त अशी ही समीक्षा वाचनीय तर आहेच, शिवाय ती अभ्यासपूर्ण आहे.

ज्येष्ठ नाट्यसमीक्षक कमलाकर नाडकर्णी आपले मत मांडताना मिस्कीलपणे म्हणाले, ''नाट्यसमीक्षेवरचं पुस्तक प्रकाशित होतंय याचा आनंद नाट्यसमीक्षकला होणारच; पण हे पुस्तक उशिरा छापल्यामुळे माझ्यासारख्या तथाकथित नाट्यसमीक्षकाचे फावले.'' मौलिक समीक्षकाचे कौतुक करायला दिग्गज नाट्यसमीक्षक हवेत पण तेवढ्या ताकदीचे समीक्षक नाहीत ही खंत त्यांनी व्यक्त केली. प्रेक्षकांची आकलन शक्ती सशक्त करणे आणि नाटकाविषयी त्यांची जाण वाढवणे हे समीक्षकचे आद्य कर्तव्य असल्याची जाणीव त्यांनी करून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथाली विश्वस्त डॉ. लतिका भानुशाली यांनी केले तर ग्रंथाली विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी पाहुण्यांना पुष्पगुच्छ आणि पुस्तकपुष्प देऊन त्यांचे स्वागत केले. ग्रंथाली वॉच' या युट्यूब चॅनेलवरून या कार्यक्रमाचे थेट प्रसारण करण्यात आले.

**– डॉ. लतिका भानुशाली**


**ही पुस्तके ग्रंथालीच्या ऑफिसमध्ये सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत.**
**घरपोच मिळवण्यासाठी ०२२-२४२१६०५० या नंबरवर संपर्क करू शकता.**

## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**शिदोरी**
**माझ्या नाट्य-चित्र प्रवासाची**
**कुमार सोहोनी**




**एका चतुरस्र नाट्यकर्मीचा संदर्भसाधन दस्तऐवज**

''कलावंतांनी त्यांची आत्मकथने लिहिली पाहिजेत. त्यांना आलेले कलानुभव आणि त्यांनी केलेले कलाप्रयोग यांच्या नोंदी विस्ताराने करायला हव्यात. यातून त्या कलावंताची जाण, व्यक्तित्व आणि दृष्टिकोन स्पष्ट होतो, जो कलाविष्काराचा आत्मा असतो. तोच भावी पिढीसाठी प्रेरक, मार्गदर्शक दीपस्तंभ ठरू शकतो.'' शिवाजी मंदिरात झालेल्या एका समारंभात प्रा. मधुकर तोरडमल यांनी व्यक्त केलेले हे मनोगत. अशी आत्मकथने आली नाहीत तर ते सर्व अनुभवाचे संचित त्या कलावंतापुरतेच मर्यादित राहील आणि त्याच्यासोबतच लयाला जाईल. भावी पिढी त्या अनुभवांपासून वंचित राहील, हा त्यांच्या मनोगतातील पुढचा भाग होता. त्याची आठवण येण्याचे कारण 'शिदोरी' ही पुस्तकगाथा.

'शिदोरी माझ्या नाट्य-चित्र प्रवासाची' ही कुमार सोहोनी यांची भलीभक्कम अशी अनुभवगाथा, पाहताक्षणीच हाती घेऊन चालण्याचा मोह व्हावा आणि चाळता चाळता थेट वाचण्याचीच ऊर्मी उसळून यावी अशी ही मोहगाथा-मोहिनीगाथा- सोहोनीगाथा! आपण नाटक पाहणारे नाटकवेडे, सिनेमा पाहणारे हौशी रसिक आणि टीव्हीने वेडे केलेले महावेडे. तरीही त्यांच्या अंतरंगाविषयी कुतूहल असणारे उत्सुक जाणकार. नाटक-सिनेमा-मालिका यांचे कुमार सोहोनी यांनी मोकळे केलेले अंतरंग ही आपल्यासाठी मोठी भेट आहे, जेथे उत्सुकतेची सगळी परिमाणे आपोआप उजळून निघतात. कुतूहलाची जागा अनुभवविश्वाने व्यापून जाते, एक समृद्ध समाधानाची तृप्ती सोबतीला येते.

'मा अस् साबरीन', 'अथं मनुस जगन हं' ही नाटके राज्यस्पर्धेत गाजत होती. 'ॲश इज बर्निंग' ही एकांकिकाही खूप गाजली. यात लेखनातले वेगळेपण एक कारण आहेच. परंतु त्यांच्या सादरीकरणामागे असलेले दिग्दर्शकाचे आकलन आणि मेहनतीचे वेगळेपण त्याहून मोठे होते, याचा प्रत्यय त्यावेळी ज्यांनी हे प्रयोग पाहिले त्यांच्या नजरेने तेव्हा टिपला. जो आजही स्मरणात तसाच जपलेला आहे. हे वेगळेपण कुमार सोहोनी या अभिनेता-दिग्दर्शकाचे होते. राज्यनाट्यस्पर्धेत स्वत:चे वेगळेपण सिद्ध केल्यानंतर रंगभूमीवरील व्यावसायिक नाटकांचे दालन त्यांच्यासाठी खुले झाले. तेथेही त्यांनी आपला ठसा प्रत्येक कलाकृतीवर उमटवण्याचाच कसोशीने प्रयत्न केला, मोहर उमटवल्यासारखा. 'अग्निपंख', 'रातराणी', 'कुणीतरी आहे तिथं', 'देहभान', 'मी रेवती देशपांडे' यांसारखी अनेक नाटके कुमार सोहोनी यांचा शिक्का मिरवणारी नाटके म्हणून यशवंत झाली, गौरवप्राप्त ठरली.

सिनेमा आणि दूरदर्शन ही माध्यमे नाटकाहून वेगळी आहेत. रंगभूमीवरील अनुभव गाठीशी असूनही प्रथम एन.चंद्रासारख्या दिग्दर्शकाकडे 'साहाय्यक' म्हणून अनुभवाची शिदोरी गाठीशी घेण्यात स्वत:हून पुढाकार घेतला. त्यानंतरच या क्षेत्रात स्वत:ची कारकीर्द सुरू केली, तेथेही स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले. 'एक रात्र मंतरलेली', 'आहुती', 'पैसा पैसा पैसा' यांसारखे चित्रपट, 'संस्कार', 'किमयागार' यांसारख्या मालिका आणि अशा अनेक कलाकृती याचा प्रत्यय देतात.

कुठलीही कलाकृती सादर करताना तिच्यावर अगोदर खूप अभ्यास करावा लागतो. पात्रांची निवड आणि नेपथ्याची योजना यांचा समन्वय साधण्यासाठी मेहनत आणि कसरत कशी आणि किती करायची, याला तर पारावारच नसतो. परंतु अभ्यास चोख, पात्राची निवड व्यक्तिरेखेला अनुरूप अशीच राहील यासाठीचा ठामपणा. आपल्याला पसंत पडेल तरच पाऊल पुढे टाकायचे हा आग्रह, काम मागण्यासाठी कुणाच्या दाराचे उंबरठे झिजवणार नाही ही मनस्वी वृत्ती, प्रसंगी स्वत:च पदरमोड करण्याची तयारी. यामुळे स्वत:चे वेगळेपण कायम राहिलेले आहे. या वेगळेपणाच्या खुणा प्रत्येक कलाकृतींच्या वेळी जशा अनुभवास आल्या त्यांच्या नोंदी तपशिलासह येथे दिलेल्या आहेत. त्या काळजावर उमटलेल्या आहेत. घोड्यांच्या टापांसारख्या कधी समाधान देणाऱ्या, कधी खंत. डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, सुहास जोशी, अश्विनी भावे, मोहन जोशी अशा रंगभूमी, चित्रपट क्षेत्रातील जवळजवळ सर्व कलावंतांसोबत काम करण्याची संधी मिळाली आहे. रंगभूमीवर, चित्रपट क्षेत्रातील सर्व साहाय्यक ठरणारे तंत्रज्ञ, इतर साहाय्यक यांच्याशी यामुळे निकटचा स्नेह घडला. अभिराम भडकमकर, प्र.ल. मयेकर यांसारखे अनेक नाटककार, त्यांच्या कलाकृती, सोबत केलेल्या कामाची तपशीलवार माहिती येथे वाचायला मिळते. ही आबंटगोड; कधी कडवटही आहे. त्यातून येथील कामाची, व्यवहाराची आणि मनुष्यस्वभावाची दालने खुली झालेली आहेत, त्यात डोकावण्याची संधी आपल्याला मिळते.

कुमार सोहोनी हे एनएसडीचे शिष्यवृत्तीधारक स्नातक आहेत. पंचेचाळीस वर्षे म्हणजेच १९७३पासूनची कारकीर्द, यात एकशेसात कलाकृतींना त्यांचे दिग्दर्शन लाभलेले आहे. राज्यशासनासह नाट्यदर्पण, नाट्यपरिषद व इतर संस्था मिळून जवळपास चाळीसहून अधिक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या कारकिर्दीचा आलेख या गाथेच्या शेवटी जोडलेला आहे.


'शिदोरी' ही गाथा केवळ त्यांच्या नाट्य-चित्रपट क्षेत्रातील अनुभवाचे संचितच नव्हे, तर एक कालखंड, या क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन, संस्कृती, इतिहास, त्यातील बारकावे आणि बदल, कलावंत, तंत्रज्ञ, यांचा साक्षेपी इतिहास आहे, जो अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने आणि तितक्याच प्रवाहीपणे, नितळ व प्रामाणिकपणे लिहिलेला आहे. काही वैयक्तिक घटना वगळता हा संपूर्ण ग्रंथ केवळ आणि नाटक-सिनेमा-मालिका या प्रवासाविषयीच असल्याने याचे संदर्भग्रंथ म्हणून असलेले मोल आत्मचरित्राहून मोठे आहे. विजय कुवळेकर, अभिराम भडकमकर यांचा या क्षेत्रातला अनुभव आणि अधिकार मोठा आहे. त्यांनी लेखक व गाथा यांची घेतलेली नोंद अभ्यासपूर्ण आहे. अशा ग्रंथांकडे पाहण्याची दृष्टी या प्रस्तावनेत आहे.

सतीश भावसार यांची मुखपृष्ठ सजावट म्हणजे आशय आणि कल्पकता यांचा सुंदर मिलाफ!

**मूल्य ६०० रुपये सवलतीत ३५० रुपये**

# ग्रंथपान

**ओंजळभर शिंपले**
**शशिकांत जागीरदार**



**प्रसन्न अनुभवांचे टवटवीत शब्दशिल्प**

''अफवांचे पीक भरघोस येण्यासाठी नापीक जमीनही चालते, अगदी वाळवंटातदेखील ऐकत राहाव्या अशा अफवा म्हणता म्हणता चौदिशांना पसरतात. कुजबुजल्या स्वरात, सगळीकडे सावध नजर टाकत, खांद्यावर विश्वासाचा हात ठेवून सांगितलेल्या अफवेसाठी पसरायला जरा घबराटीचे वातावरण पोषक असते. अफवाओं और ख्वाबोंमें झूठ क्या.. और भला, सच है क्या!''

अनुभवाचे विश्व समृद्ध असेल, आपल्या भवतालाकडे पाहण्याची नजर तयार असेल आणि लिहिता हात सैल असेल तर शब्द-फुले-शंख शिंपलेच नव्हे तर मोतीही सापडतील, ज्यासाठी ओंजळ अपुरी पडेल. शशिकांत जागीरदार यांचा 'ओंजळभर शिंपले' हा संग्रह अशा शिंपल्यांनी नव्हे तर मोत्यांनी गुंफलेला शब्दहार आहे, असे म्हणावे लागेल.

एकेकाळी अरबप्राप्त म्हणजे सोन्याचा धूर निघत असलेली जादूची खाण आहे असा समज सर्वत्र पसरला होता. ज्याच्या-त्याच्या तोंडी दुबई, कुवेत, मस्कत, बाहरीन, आबुधाबी ही नावे विड्याच्या रसासारखी पाझरत होती. नोकरी करायची, पैसा कमावायचा या एकाच ध्येयाने शशिकांत जागीरदार सीनीयर आर्किटक्ट - अरबीमध्ये मुहांदिसअव्वल म्हणून प्रेसिडेंट शेख झाईद-बिन-महयान यांच्या मुहर्रक राजवाड्यांची देखभाल, हा त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा एक भाग ठरला. त्यामुळे या प्रांतात झालेली अनोखी बांधकामे, त्यांच्या रचना, येथील निर्णयप्रक्रिया, समुद्र, वाळवंट, डोंगर, जनजीवन, ऐश्वर्य, संपन्नता, नियम अशा अनेक बाबतींतले प्रत्यक्ष अनुभव, बारकावे, तपशील त्यांना पाहता आले, अनुभवता आले, ती वर्णने येथे आली आहेत.

अनेक कारणांनी विमानप्रवास घडला. हा विमानप्रवास म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचलो, असा नाही. त्यात आलेले प्रसंग, भेटलेल्या-दिसलेल्या व्यक्ती, तिकिटापासून सुरक्षेपर्यंतचा प्रत्येक टप्पा, असा मोठा हवाईप्रवास ते घडवतात तेव्हा ते एकटे नसतात, तर वाचक म्हणून आपणही त्यांच्यासोबत असतो. अमेरिका, बँकाक-सिंगापूर, ऑस्ट्रेलियासारखे जगभरातील अनोखे दर्शन ते घडवतात तेव्हा तो केवळ प्रवासवर्णनाचा भाग नसतो, तो असतो जीवनानुभव, ज्याचे वाचक म्हणून आपण साक्षीदार ठरतो.

वाहतूककोंडीसारखा विषय मोठ्या शहरवासियांना काही नवीन नाही. परंतु सिग्नल, जातीय दंगल, वाहन अपघात यांसारखी कारणे ही नित्याची बाब. परंतु अशी विमानांच्या, बोटीच्या बाबतही असू शकते आणि ती रस्त्यावरील कोंडीपेक्षा किती जीवघेणी असते, याची कल्पनाच केलेली बरी. धमकी आणि अफवा ही प्रकरणे वरवर वैयक्तिक आणि काल्पनिक वाटतात. परंतु तीसुद्धा तशीच कल्पनेपलीकडची असू शकतात हे परिस्थिती आणि भवतालाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने तपासून पाहावीत अशी आहेत. पिरोव्हा, व्हेल, मगरमासे यांच्या शिकारीच्या क्रूर पद्धती, शामू माशाचा श्वास रोखून धरायला लावणारा खेळ वाचत असतानाही अंगावर काटा आणतात.

गजानन जहागीरदार, अभिनेते आणि दिग्दर्शक, डेव्हिड देवभानकर या व्यक्तिरेखा चरित्राचा एक भाग वाटाव्यात इतक्या आपुलकीच्या नात्याने चितारलेल्या आहेत. 'धमकी' आणि 'दोस्तान्याची ऐशीतैशी' या दोन कथांचा यात समावेश आहे.

'ओंजळभर शिंपले' हा शशिकांत जागीरदार यांचा 'कॅलिडोस्कोप'नंतरचा दुसरा संग्रह. या संग्रहात पंधरा लेख आहेत. हे लेख यापूर्वी वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. विमानप्रवास आणि चित्र-रांगोळीचा छंद यांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून दिसून येते. प्रत्येक लेखात आलेले प्रासंगिक वर्णन हे जिवंत आणि प्रत्ययकारी आहे. प्रसन्न आणि टवटवीत फुलांची बाग पाहिल्यानंतर जसे आपणही प्रसन्न होतो, चित्तवृत्ती फुलून येतात, तसा अनुभव हा संग्रह वाचत असताना सतत आपली सोबत करीत राहतो. 'वाळवंटातील जहाज हवाई जहाजाला भारी पडले हेच खरे.' 'आपण जरी नाही विमानातून वर गेलो तरी केलेल्या विमानपर्यटनाच्या आठवणी करून खाली येतच राहतात.' यासारखी श्लेष साधणारी वाक्ये त्यांच्या वेगळ्या शैलीची ओळख करून देतात. 'अबू म्हणजे बेट आणि धाबी म्हणजे पांढरे हरीण. या मृगद्वीपाच्या राजाच्या राजवाड्यात फक्त घोटीव चोवीस कॅरेटच्या सोन्यातलेच जोडकाम चालू शकते' यासारखी संपन्नता दाखवणारी वाक्ये केवळ तेथील नरेशाची संपन्नता दाखवीत नाहीत तर लेखकाच्या प्रगल्भ प्रतिभेचीही दाखवतात. ''ज्याप्रमाणे सर्पदंशावरची लस सर्पाच्या विषापासून तयार करतात तशीच काही युक्तीप्रयुक्ती करून कोकेनची अशी लस बनवावी, की ज्यामुळे अफू आणि कोकेन यांचा निर्वंश होईल.'' हा तळमळीचा आशावाद अंतर्मुख करणारा आहे.

स्वत:चा दरवळणारा गंध असावा तसे निसर्गत: तयार झालेले शिल्प म्हणजे शिंपले. अशा सुंदर शिंपल्याचे उत्तम शिल्प म्हणजे 'ओंजळभर शिंपले' हा संग्रह, वाचकांच्या पसंतीस नक्की उतरेल असा ठाम विश्वास वाटतो.

शीर्षक, आशय यांच्याशी जिव्हाळ्याचे नाते सांगणारे मुखपृष्ठ लेखकाच्या छंदाचा परिचय करून देते.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**

## ग्रंथपान

### प्रभु अजि गमला
**डॉ. स्मिता निखिल दातार**



**सुंदरतेच्या सुमनांवरचे दव चुंबूनी घ्यावे**

''गुलाब हे प्रभूंचं पहिलं प्रेम. मानवी जीवनातल्या सुखदु:खाच्या संमिश्र आठवणीचं सुखद आणि सुगंधी प्रतीक म्हणजे गुलाब. मनमोहक स्वप्न-सौंदर्याच्या आणि दिव्य सुगंध असलेल्या या गुलाबानं अमीरउमरावांच्या रसिल्या जीवनात रंग भरला. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या जीवनात टवटवीतपणाा दिला आणि आज तर गुलाब केवळ थोरामोठ्यांसाठीच नाही तर आपणा सर्वांसाठी सर्वांचाच होऊन राहिला आहे.'' (पृ. ९२)

छंद जोपासणे म्हणजे आवड आणि आनंद यांचा संगम. प्रत्येकाचा तो एक हळवा कप्पा म्हणता येईल ह्रदयातला प्रेमासारखा. त्यासाठी असलेला ध्यास आणि नंतरची पूर्तता यातले अंतर कालमापनाने मोजता येत नाही, मोजले जाते ते त्यासाठी झोकून दिलेले समर्पण. हे समर्पण ज्यांच्या ठायी चिरंतन आहे. त्यांच्या साफल्याची फुले टवटवीत, प्रसन्न, सुगंधी आणि आनंददायी असणारच. साफल्याचा आनंद देणारा एक कल्पवृक्ष म्हणजे रामदास प्रभुगावकर.

रामदास प्रभुगावकरांचा जीवनप्रवास गोवा ते मुंबई असा आहे, त्यापेक्षा एक स्वातंत्र्यसैनिक ते गुलाबप्रभू असा आहे, हे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरते. गोवा ही पोर्तुगीजांचा अंमल असलेली निसर्गरम्य भूमी. पोर्तुगीजांनी केलेला अनन्वित छळ, अत्याचार हे एका बाजूला आणि भारत स्वतंत्र झाला तरी गोवा पारतंत्र्यातच भरडला जात आहे ही दुसरी बाजू. या विरोधात जी आंदोलने झाली, त्यासाठी सर्व प्रकारच्या शिक्षा सहन केल्या, त्याचे एक सक्रिय साक्षीदार म्हणून, एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून रामदास प्रभुगावकर यांची पहिली ओळख.

आयुष्याची पुढील वाटचाल आणि स्वत:ची ओळख निर्माण करणे यासाठी मुंबई हा एक पर्याय अनेकांच्या समोर असतो. प्रभुंनी हाच पर्याय निवडला. मुंबईत पाऊल ठेवले तेव्हा अनेक प्रश्नांचे काटे त्यांच्या वाटेवर स्वागतासाठी हजर होते. परंतु ध्येय, जिद्द, चिकाटी, उपलब्ध पर्यायांची उत्तम सांगड यांच्या जोरावर त्यांनी या काट्यांना फुलांच्या पाकळ्यांनी सजवले, आणि शेवटी काट्यांचीच फुले झाली. आयुष्याला उद्यानाचा आकार आला. मेहनतीच्या घामाला यशाचा सुगंध लाभला. स्वत:ची ओळख निर्माण झाली गुलाबप्रभू, उद्यानप्रभू!

प्रभुगावकर यांच्याकडे असलेली सौंदर्यदृष्टी त्यांच्या यशाची गुरुकिल्ली ठरली. प्रयोगशील वृत्ती नावीन्याच्या शोधाला पूरक ठरली. त्यामुळे गुलाब, उद्याने या विषयांचे पूर्ण शिक्षण गाठीशी नसताना स्वत:चे वेगळेपण सिद्ध करता आले. गुलाबाचे कलम ते गुलाबचे प्रदर्शन हा प्रवास केवळ आपल्यापुरता मर्यादित न ठेवता तो प्रत्येकाला माहीत व्हावा म्हणून भरपूर लेखन केले.

चित्रकलेची आवड असल्याने टेक्स्टाइल डिझाइन हा कलाप्रकार जवळचा ठरला. त्यांनी केलेली वेगवेगळी डिझाइनिंग केवळ त्याला यश देण्यास कारणीभूत ठरल्या असे नव्हे तर प्रसिद्ध कापडगिरणी मालकांचा स्नेह संपादित करण्यासही कारणीभूत ठरली. 'बाटीक' हे वॉलहँगिंग सगळ्यांच्या कुतूहलाचे आकर्षण ठरले. जाहिरातक्षेत्रात नुसती पैशांसाठी कला विकली नाही. माल, त्याचा उपयोग आणि त्यामागे असलेले मानसशास्त्र, यांची कलात्मक गुंफण करून तशी डिझाईन तयार करून दिली. मुंबईसारख्या प्रतिकूल हवामान असलेल्या शहरात गुलाब आणि उद्याने यांची निर्मिती करून शहराच्या सौंदर्यात भर घातली, तसा इथल्या गैरसमजालाही छेद दिला.

प्रभुगावकर हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. 'शब्दुली' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. 'गोमंतशारदा' हा एमएच्या अभ्यासक्रमात असलेला प्रातिनिधिक कवितासंग्रह त्यांनी संपादित केलेला आहे. 'घरोघरी गुलाब' व 'रोझ ग्रोइंग मेड इझी' ही पुस्तके प्रकाशित आहेत. समाजसेवेचे व्रत आणि पर्यावरणाचा संदेश ही त्यांची खास वैशिष्ट्ये होत. अनेक मान्यवर पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे.

रामदास प्रभुगावकर यांचे चरित्रलेखनाचे शिवधनुष्य लीलया पेलले आहे ते डॉ. स्मिता निखिल दातार यांनी. त्या उत्तम लेखिका आहेत. अभिनय आणि सौंदर्यशास्त्रतज्ज्ञ यांचा सुंदर आविष्कार त्यांच्या लेखनातून दिसून येतो. चरित्रासाठी आवश्यक असणारा तपशील आणि संदर्भ यांचा त्यांनी केलेला अभ्यास. विशेषत: गोवामुक्तिसंग्राम आणि त्याकाळी प्रसिद्ध झालेली नियतकालिके, नक्कीच कौतुकास्पद आहे. पुस्तकाची मांडणी प्रकरणनिहाय केली असून त्यांना दिलेली शीर्षके, गुलाबप्रभु, उद्यानप्रभु, रंगगंधर्व यांसारखी केलेली शब्दकळा प्रकरणाच्या शेवटी केलेली कवितांच्या ओळींची सांगता, त्यांच्या कलाकत्मकतेचा, सौंदर्यदृष्टीचा परिचय करून देतात.


मधु मंगेश कर्णिक, डॉ. पी.एस. रामाणी, अशोक पत्की, डॉ. स्वाती पिरामल या मान्यवरांनी चरित्रनायक आणि लेखिका यांच्या गुणांचे सन्मानपूर्वक कौतुक केले आहे. रवी मंडलिक यांनी मुखपृष्ठाचा सुंदर साज चढवलेला आहे.

**मूल्य ४०० रुपये सवलतीत २५० रुपये**



# ग्रंथपान

**शरदाचे चांदणे**
**स्मिता महाजन**



## स्वरचांदण्यांनी भरलेली ओंजळ

''संगीत कला ही एक Performing art आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. ही कला कुठल्याही नीच पातळीवर जाऊ नये यासाठी शास्त्राची किंवा विद्येची जोड आवश्यक आहे. पण ही जोड केव्हा, कुठे, कशी व का द्यायची हे कलाकाराच्या बुद्धिमत्तेवर आणि कौशल्यावर अवलंबून असते आणि या सर्वामागे गुरू नावाची पवित्र संस्था असते हे महत्त्वाचे आहे. ही विद्येची जोड नसेल तर कलाविष्काराचा Balance बिघडून आकारहीन कला पेश केली जाते किंवा नुसते पांडित्य मांडले जाते. दोन्हींचा मध्यबिंदू गाठणे अत्यंत जरुरीचे आहे.''

'शरदांचे चांदणे' हा पं. शरद साठे या गानतपस्वी श्रेष्ठ गायकाचा परिचय आणि त्यांच्या गायनकलेविषयीची निष्ठापूर्वक आस्था असलेला आल्हाददायक आणि प्रसन्न दस्तऐवज त्यांची कन्या स्मिता महाजन यांनी आपल्या हाती सुपूर्द केलेला आहे. पं. शरद साठे हे जवळपास सहा दशकांहून अधिक काळ या कलाक्षेत्रात आपल्या कलेचा आविष्कार फुलवत राहिले. शिष्य, श्रोते, रसिक यांना सुरेल अभिजात संगीताच्या हिंदोळ्यावर, स्वरांच्या मधुर बनात रिझवत राहिले, स्वत: स्वर्गीय सुखाच्या सरींसोबत चिंब न्हात राहिले. अशा थोर कलावंताच्या समृद्ध अनुभवाविषयी, त्यांनी घेतलेल्या निरंतर कलेच्या ध्यासाविषयी, त्यांची झालेली एकूण जडणघडण याविषयी रसिकांना नेहमीच कुतूहल असते. ते सारे अपाल्यासमोर आले तर त्याचे मूल्य मार्गदर्शक आणि प्रेरणा अशा दोन्हीसाठी मोठे ठरते. या सगळ्यांचा साकल्याने केलेला विचार आणि आपल्या वडिलांच्या विषयीचा अभिमान, कलेविषयीचा आदर, यातून हा दस्तऐवजचा ग्रंथ आकाराला आलेला आहे.

पं. शरद साठे यांना तबला, गायन आणि चित्रकला यांची आवड लहानपणापासून होती. ही आवड जोपासण्यात त्यांनी कुठेही कसूर केली नाही. चित्रकलेसाठी-कमर्शियल आर्टसाठी त्यांनी मुंबईच्या जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेतला. मार्केटिंग व अडव्हर्टायझिंग क्षेत्रात स्थिरावण्यासाठी या शिक्षणाचा आधार भक्कम ठरला.

तबल्याची आवड कलेत रूपांतरित करण्यासाठी शिवमरापंत साठ्ये यांच्याकडे शिष्यत्व पत्करले. गायनासाठी इतरांचे अभिजात गायन ऐकण्याची एकही संधी सोडली नाही. त्यामुळे फैयाज खाँसाहेबांच्या गाण्याची मोहिनी अनुकरणीय ठरली. परंतु पुढे पं. डी.व्ही. पलुस्कर, प्रा. बी.आर. देवधर आणि पं. शरश्चंद्र आरोळकर या थोर गुरूंकडे शिष्यत्व स्वीकारले. गायन-संगीत या कलेत गुरुपरंपरेला सर्वोच्च स्थान दिले जाते. आपल्या जीवनात या गुरूंविषयीचा अभिमान आणि गुरू-शिष्य परंपरा यांचे आदरास्थान किती असावे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे पं. शरद साठे. त्यांनी त्यांच्या नोंद करून ठेवलेल्या डायरीनुसार संगीत, संगीताची रसधारा, गुरू-शिष्य परंपरा, गुरुकुल, ग्वाल्हेर घराणे, गायकी, बंदिशी, रागदर्शन असा सर्वांगीण दृष्टिकोन या ग्रंथात उलगडलेला आहे.

गायनासाठी रागात बांधलेल्या बंदिशी गुरूकडून आत्मसात कराव्या लागतात, परंतु आपल्याही बंदिशी त्यांनी स्वत: बांधलेल्या होत्या, त्या या ग्रंथात दिलेल्या आहेत. गायनाची ही कला त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन गेली. अनेक मैफिली, कार्यक्रम, रेकॉर्डिंग, यातून त्यांचा ध्यास किती उच्च पातळीचा होता, याचे दर्शन येथे होते. गुरू म्हणजे विशिष्ट खानदानी परंपरेचा अनुयायी. खानदानी परंपरा म्हणजेच घराणे. घराणे हे एखाद्या गावाच्या नावाने प्रसिद्ध असले तरी त्यांच्या गायकीचे सौंदर्य त्या त्या घराण्यातील दिग्गज गुरूंनी आपल्या शिष्यांना उलगडून दाखवलेले असते. ही या कलाप्रांतातील महत्त्वाची संदर्भीय माहिती लेखिकेने नेमकेपणाने उलगडून दाखवलेली आहे.

पं. शरद साठे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या व्यक्तित्वात असेलेल्या गुणांचा, शिस्तीचा, सर्जनशीलतेचा सुरेख परिचय करून दिलेला आहे. पं. शरद मराठे यांनी वेळोवेळी व्यक्त केलेले विचार इंग्रजीतून आहेत, त्याचा समावेश या ग्रंथात केलेला आहे. त्यांनी जोपासलेल्या या कलाप्रांतातील श्रेष्ठ परंपरेचे जतन करण्याचे फार मोठे काम या ग्रंथनिर्मितीतून झालेले आहे. या श्रेष्ठ कलावंताने स्वत:चे स्वतंत्र जग निर्माण केले. त्याविषयीच्या आठवणी, अनुभव, आप्त, शिष्य, रसिक यांनी वेळोवेळी लिखित स्वरूपात व्यक्त केलेल्या आहेतच. त्यांचा समावेश आवर्जून करण्यात आलेला आहे. त्यांच्या डायरीतील नोंदी हे स्वतंत्र प्रकरण यात आहे.

लेखिका स्मिता महाजन यांनी हा ग्रंथ अधिकाधिक परिपूर्ण होईल, त्याचे संदर्भमूल्य अबाधित राहील यासाठी घेतलेली मेहनत हा ग्रंथ वाचताना स्पष्टपणे दिसून येते. वडिलांविषयी लिहिताना 'उदो उदो' असा भाव न ठेवता 'कलावंत' हीच प्रतिमा समोर ठेवून तिला पूर्णपणे न्याय देण्याचे भान जपलेले आहे. हा चरित्रात्मक कलाप्रवास आहे, तसा साठे घराण्यातील कलापरंपरेचाही परिचय आहे. तो नेटकेपणाने आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने साकारलेला आहे. त्यामुळे एक पूर्ण कला-कालखंड ग्रथित झालेला आहे.

ग्रंथाची सुंदर मांडणी आणि आकर्षक मुखपृष्ठ ही सतीश भावसारांची खास भेट म्हणावी लागेल.

**मूल्य ४०० रुपये सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथाली पुस्तकप्रकाशन




डॉ. मृण्मयी भजक लिखित 'चुटकीभर गंमत' आणि 'अमेरिका खट्टी–मीठी' पुस्तक प्रकाशनसमयी धनंजय गांगल, अभिनेत्री मधुरा वेलणकर, मृण्मयी भजक, कवी अरुण म्हात्रे, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. लतिका भानुशाली






अनुराधा गोरे

अनुराधा गोरे लिखित 'अशक्य ते शक्य' पुस्तकप्रकाशनसमयी मा. एस. आर.सिंह (एअर व्हाइस मार्शल), मा. देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्षनेते), मा. भगतसिंह कोश्यारी (राज्यपाल, महाराष्ट्र), श्रीमती मंजू मंगलप्रभात लोढा आणि श्रीमती अनुराधा गोरे



प्र. ना. परांजपे लिखित 'नाटक काही निरीक्षणे काही परीक्षणे' पुस्तकप्रकाशनसमयी दिनकर गांगल रविप्रकाश कुलकर्णी डॉ. लतिका भानुशाली प्र. ना. परांजपे सुदेश हिंगलासपूरकर धनंजय गांगल कमलाकर नाडकर्णी आणि माधव वझे




अक्षरधारा बुक गॅलरी, पुणे येथे प्राजक्ता माळी यांच्या 'प्राजक्तप्रभा' कवितासंग्रह प्रकाशनसमयी शिरीष चीरकर, मिलिंद जोशी, प्राजक्ता माळी, कवी रामदास फुटाणे आणि रसिका राठिवडेकर

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.